१९३७-२०२६ वर्ष ९०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | शनिवार | दि. २४ ऑक्टोबर २०२६ | अंक १३८ | पृष्ठे १० | किंमत ५ ₹ | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

उरण फाट्यावर धावत्या कारने घेतला पेट

नवी मुंबई : उरण फाटा रस्यावर भरदिवसा धावत्या कारला अचानक भीषण आग लागल्याची घटना शुक्रवारी (दि.२३) घडली. आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केल्याने संपूर्ण कार आगीच्या भक्ष्यस्थानी सापडली. मात्र, आग लागल्याचे लक्षात येताच चालकाने प्रसंगावधान राखत तातडीने कारबाहेर पडल्याने सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. या घटनेची माहिती मिळताच नेरूळ आणि सीबीडी बेलापूर येथील अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने •➤पान २ वर



वेधक

९ लाखांची चोरी करताना जेरबंद

माणगाव : माणगाव तालुक्यातील सार्वजनिक दूरसंचार यंत्रणेच्या सुरक्षिततेला आव्हान देणाऱ्या चोरीच्या प्रयत्नावर माणगाव पोलिसांनी वेळीच कारवाई करत दोन संशयित चोरट्यांना रंगेहाथ पकडले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निजामपूर येथील बीएसएनएल कार्यालयाच्या परिसरात असलेल्या साहित्यावर चोरट्यांची नजर होती. दि.२१ ऑक्टोबर रोजी पहाटे सुमारे ३.३० वाजण्याच्या सुमारास चोरट्यांनी कार्यालयाच्या दरवाजाचे कुलूप कापून आत प्रवेश केला. त्यानंतर तेथील तांब्याच्या तारा कापून नेण्यासह इलेक्ट्रॉनिक बॅटऱ्या चोरण्याचा प्रयत्न सुरू होता. त्यावेळी परिसरात गस्त घालणाऱ्या पोलिसांनी संशयित हालचाली ओळखल्या. •➤पान २ वर

लिफ्टच्या खड्ड्यात पडून मृत्यू

उरण : द्रोणागिरीत टोलेजंग टॉवर उभे राहत आहेत; मात्र, या टॉवरच्या उभारणीत कामगारांच्या सुरक्षेचे तीनतेरा वाजले असतील, तर या विकासाचा उपयोग काय? बिल्डरांच्या इमारतींची उंची वाढत असताना कामगारांच्या सुरक्षेची मात्र उंची जमिनीत गाडली जात असल्याचे चित्र समोर आले आहे. द्रोणागिरी सेक्टर-४७ येथील स्कायलार्क इमारतीच्या बांधकामस्थळी लिफ्टच्या खड्ड्यात पडून विनोद निसाद (४०) या कामगाराचा मृत्यू झाल्याने बांधकाम क्षेत्रातील सुरक्षेचा बोजवारा उघड झाला आहे. सोमवारी (दि.१९) दुपारी ३ वाजण्याच्या •➤पान २ वर

उमटे धरणाच्या दुरुस्तीला ठेकेदाराचा ठेंगा!

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

उमटेधरणाच्याजलवाहिन्यांची गळती, पाण्याची टंचाई आणि एक दिवसाआड पाणीपुरवठ्याचे संकट अशा समस्यांनी हजारो नागरिक त्रस्त असताना, आता दुरुस्तीची जबाबदारी घेतलेल्या ठेकेदारानेच कामातून अंग काढून घेतले आहे. २० लाख १८ हजार रुपयांचा वर्षभराचा ठेका घेतलेल्या शिवसाई कन्स्ट्रक्शनने वैद्यकीय कारण आणि काम परवडत नसल्याचे सांगत काम करण्यास नकार दिला आहे. त्यामुळे आधीच अनियमित पाणीपुरवठ्याचा सामना करणाऱ्या १२ ग्रामपंचायतींमधील ४६ गावे आणि ३३ वाड्यांतील ६५ हजारांहून अधिक नागरिकांच्या पाणीप्रश्नावर पुन्हा टांगती तलवार निर्माण झाली आहे. ठेकेदाराच्या या भूमिकेमुळे जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, संबंधित ठेकेदाराविरोधात कठोर कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने १९७८ साली म्हणजेच ४७ वर्षांपुर्वी अलिबाग तालुक्यातील उमटे आणि मोरोंडे गावाच्या सरहद्दीमधून जाणाऱ्या नाल्यावर उमटे धरण बांधले. त्यानंतर १९९५ साली हे धरण महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून जिल्हा परिषदेला हस्तांतरित करण्यात आले. त्यामुळे गेल्या ३१ वर्षांपासून जिल्हा परिषदेच्या ताब्यात हे धरण आहे. या धरणाची उंची ५६.४० मीटर असून, पाण्याची शेवटची पातळी •➤पान २ वर



> उमटे धरणाच्या बाबतीत जिल्हा परिषद आणि पाणीपुरवठा विभाग सध्या बदनाम आहे. धरणातील साचलेला गाळ काढण्याचे सोडून ज्यामधून फक्त टक्केवारी काढता येईल, अशा कामांच्या निविदा काढून ठेकेदार आणि अधिकारी संगनमताने स्वतःची झोळी भरत आहेत. धरणाच्या बाहेर शेकडो कोटी रुपये खर्च करून टाकलेले पाईप रस्त्याच्या कडेला पाण्याची वाट पाहत आहेत. आवश्यक व गरजेच्या असलेल्या साचलेल्या गाळाचा आणि मुबलक पाण्याचा प्रश्न सोडून जर जिल्हा परिषद वेगळ्या निविदा काढत असेल, तर आम्ही या विरोधात न्यायालयात जाण्याची तयारी केली आहे.
>
> – ॲड. राकेश पाटील, उमटे धरण संघर्ष ग्रुप रायगड

वर्षभराचा २० लाखांचा ठेका न परवडण्याचे कारण

गळती रोखण्याच्या कामाची जबाबदारी महिनाभरातच झटकली

एक दिवस आड पाणी

उमटेधरणाच्यापाणीसाठ्याचे नियोजन तसेच आगामी वर्षातील संभाव्य पाणी टंचाई लक्षात घेत पाणी साठ्याचा काटकसरीने वापर करणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून उमटे धरणाद्वारे पाणी कपातीचे संकट सुरु झाले आहे. उमटे धरणाद्वारे आता एक दिवस आड पाणी पुरवठा केला जाणार असल्याची माहिती जिलहा परिषद पाणी पुरवठा उपविभाग कार्यालयाकडून देण्यात आले आहे. त्यामुळे पाण्याची समस्या आतापासूनच सुरु झाली आहे.

जि.प. अधिकाऱ्यांना अभय कुणाचे?

- पाच वर्षांचा नियम गुंडाळला
- बदल्यांच्या नियमांना जाणीवपूर्वक बगल दिल्याचा आरोप

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्यांसाठी शासनाने निश्चित केलेल्या धोरणात एका विभागात किंवा कार्यालयात काम करण्याच्या कालावधीवर मर्यादा घालण्यात आली आहे. मात्र, काही अधिकाऱ्यांना एकाच विभागात पाच वर्षांपेक्षा अधिक काळ सेवा करुनही बदल्यांबाबत वेगळे नियम लागू केल्याचा आरोप समोर आला आहे. त्यामुळे बदली धोरणाची प्रत्यक्षात अंमलबजावणी होते आहे का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. बदली धोरण अस्तित्वात असताना वरिष्ठ सहाय्यक संवर्गातील अधिकाऱ्यांच्या बदल्या का थांबविण्यात आल्या? कनिष्ठ सहाय्यकांच्या बदल्या होतात, पण वरिष्ठ सहाय्यकांच्या बदल्यांचा प्रश्न आला की प्रशासनाचे हात का आखडतात, नियमांची अंमलबजावणी निवडक पद्धतीने होतेय का? हा प्रश्नही आता समोर आला आहे.



१५ मे २०१४ च्या शासन निर्णयात जिल्हा परिषद कार्यालये आणि पंचायत समिती कार्यालयांतील कर्मचाऱ्यांसाठी एकाच टेबलावर जास्तीत जास्त तीन वर्षे आणि एकाच विभागात जास्तीत जास्त पाच वर्षे काम करण्यासंदर्भातील तरतुदी नमूद आहेत. असे असताना संबंधित संवर्गातील बदल्यांची स्थिती स्पष्ट न होणे, ही प्रशासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी बाब आहे. •➤पान २ वर

बदली धोरण स्पष्ट करा

जिल्हा परिषद प्रशासनाने संबंधित कर्मचाऱ्यांचा सेवाकाल, पदस्थापना, रिक्त पदांची स्थिती आणि बदली आदेशांचा तपशील तपासावा. पात्र कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत नियमानुसार निर्णय घ्यावा आणि बदल्या प्रलंबित असण्यामागील कारणे जाहीर करावीत. शासनाचा नियम पाळायचा की सोयीने बाजूला ठेवायचा, हे प्रशासनाने स्पष्ट करावे. बदली धोरणाच्या अंमलबजावणीबाबत मौन बाळगून प्रश्न सुटणार नाहीत. नियमांची पारदर्शक अंमलबजावणी आणि जबाबदार अधिकाऱ्यांनी खुलासा द्यावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे.

शाळेला बॉम्बने उडवण्याची धमकी

। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।

खारघर येथील विबग्योर शाळा बॉम्बने उडवून देण्याची धमकी ई-मेलद्वारे मिळाल्याने शुक्रवारी (दि.२३) शाळा परिसरात खळबळ उडाली. खबरदारीचा उपाय म्हणून शाळा रिकामी करण्यात आली असून, नवी मुंबई पोलीस, खारघर पोलीस आणि बॉम्बशोधक पथक घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर शाळेच्या परिसरात तपासणी आणि शोधमोहीम सुरू करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी खारघर येथील विबग्योर शाळा बॉम्बने उडवून देण्याची धमकी ई-मेलद्वारे शाळा प्रशासनाला मिळाली. त्यानंतर शाळेत एकच खळबळ उडाली. त्यानंतर नवी मुंबई पोलीस, खारघर पोलीस आणि बॉम्बशोधक पथकाकडून घटनास्थळी धाव घेतली. विद्यार्थ्यांच्या आणि शाळेतील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत शाळा रिकामी करण्यात आली. त्यानंतर बॉम्बशोधक पथकाकडून परिसराची तपासणी करण्यात आली. प्राथमिक माहितीनुसार, ही धमकी अफवा असण्याची शक्यता पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, कोणताही धोका टाळण्यासाठी पोलिसांकडून आवश्यक ती खबरदारी घेतली जात आहे.



एटीएममधून १६ लाखांची चोरी

पनवेल : एटीएम मशीन मधून १६ लाख रुपयांची चोरी केल्याची घटना गुरूवारी (दि.२२) घडली. याबाबत तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, गुरूवारी सकाळी पावणेपाचच्या सुमारास तळोजा एमआयडीसीतील नवनाथ इन हॉटेल शेजारील इमारतीखाली असलेल्या एसबीआय बँकेच्या एटीएम मशीनच्या रूममध्ये एक अनोळखी व्यक्ती गेला.त्याचे तोंड पूर्णपणे झाकलेले होते. त्याने तेथील सीसीटीव्ही कॅमेरावर काळ्या रंगाचा स्प्रे मारला. त्यानंतर त्याने एटीएम मशीनच्या कॅश डिस्पेन्सर मधून १६ लाख १८ हजार ८०० रुपयांची चोरी केली.

पंतप्रधानांना फक्त उद्योगपती दिसतात

माकप नेत्या वृंदा करात यांची टीका

। अकोले । प्रतिनिधी ।

पंतप्रधान मोदी डोळ्यावर चष्मा लावून जेव्हा पाहतात तेव्हा चष्म्यातून त्यांना सामान्य माणूस दिसत नाही. त्यांना अदानी, अंबानी, मोठे उद्योगपती आणि अमेरिका दिसते. त्यांना मजुरांचे, शेतकऱ्यांचे हक्क दिसत नाहीत, देशातील विधवांचे दुःख आणि त्यांचा संघर्ष दिसत नाही. ग्रामसभेचे अधिकारी काढून घेतले जात आहेत, जल, जंगल, जमिनीवर आदिवासींचे हक्क दिसत नाहीत, अशी टीका मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या वृंदा करात यांनी केली.



दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या विविधमागण्यांसाठी अखिलभारतीय किसान सभा, सीटू, जनवादी महिला संघटना आणि 'डीवायएफआय' यांच्या नेतृत्वाखाली अकोले येथे महामुक्काम सत्याग्रह सुरू आहे. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी आयोजित सभेत त्या बोलत होत्या.

लाल बावटा घेऊन सभेला आलेल्या महिलांचा संदर्भ देत वृंदा करात म्हणाल्या, या महिला राज्य सरकारला सांगत आहेत की, ''आम्ही तुमच्या लाडक्या बहिणी नाहीत, तर आम्ही लढावू बहिणी आहोत'' आणि आमच्या एकीच्या बळावर आम्ही आमच्या मागण्या पदरात पाडून घेऊ. •➤पान २ वर







पान १ वरुन

जि.प. अधिकाऱ्यांना अभय कुणाचे?

रायगड जिल्हा परिषदेत बदली धोरणाची अंमलबजावणी करताना कोणते निकष लावले जातात? कोणाचा सेवाकाल पूर्ण झाला आहे? कोणाची बदली प्रलंबित आहे? आणि ती प्रलंबित ठेवण्यामागे नेमकी कोणती प्रशासकीय कारणे आहेत? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने द्यायला हवीत. नियम लागू असतील, तर त्यांची अंमलबजावणी झालीच पाहिजे; आणि एखाद्या प्रकरणात अपवाद असेल, तर त्याचा अधिकृत आधारही स्पष्ट झाला पाहिजे, अशी मागणीही आता जोर धरु लागली आहे.

उमटे धरणाच्या दुरुस्तीला ठेकेदाराचा ठेंगा

४० मीटर इतकी आहे. या मातीच्या धरणाची पाणी साठविण्याची क्षमता ८६ एम.सी.एफ.टी इतकी आहे. धरणामधून व्हॉल्व टॉवर द्वारे पाणी शुद्ध करणाऱ्या टाकीकडे नेऊन तेथून शुद्ध पाणी जमीनीवरील टाकीवध्ये साठविले जाते. त्यानंतर या टाकीमधील पाणी वेगवेगळ्या व्यासाच्या पाईप लाईनमधून गाव वाड्यांना पाणी पुरविले जाते. या धरणामार्फत अलिबाग तालुक्यातील १२ ग्रामपंचायतींमधील ४६ गावे आणि ३३ वाड्यांमधील ६५ हजारहून अधिक नागरिकांना पाणी पुरवठा केला जातो. धरणाजवळील टाकीपासून चौल–नागाव मार्गे आणि अलिबाग–रोहा मार्गे महान फाट्यावर, बोरघर गावाजवळ वितरण नलिका काढण्यात आली आहे. ती महाजने, वावेपासून बेलकडेपर्यंत काढण्यात आली आहे. या गावांना काँक्रीटच्या जमीनीवरील हौद बांधून पाणी पुरवठा नळाद्वारे केला जात आहे. या योजनेमुळे या सर्व गावांना पाणी पुरवठा केला जात असल्याची माहिती जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून देण्यात आली आहे.

मात्र, मागील अनेक महिन्यांपासून पाईप लाईनमधून पाण्याची गळती होण्याची समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे पाण्याची टंचाई संबंधित गावांसह वाड्यांना सतत भेडसावत आहे. अनेकवेळा दोन ते तीन दिवस पाण्याची प्रतिक्षा करावी लागते. ही समस्या सोडविण्यासाठी रायगड जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने अलिबाग तालुक्यातील कुदेपासून आक्षीपर्यंत देखभाल दुरुस्तीसाठी निविदा प्रक्रियेतून माणगावमधील शिवसाई कंस्ट्रक्शन नावाच्या कंपनीला २० लाख १८ हजार १०९ रुपयांचा वर्षभराचा ठेका देण्यात आला. त्यामध्ये गळती काढणे, कामगार घेणे या कामांची जबाबदारी संबंधित कंपनीकडे देण्यात आली. त्यासाठी ९ सप्टेंबरला कार्याध्येश काढण्यात आला. त्यानंतर साधारणपणे १४ ते १५ सप्टेंबरला ठेकेदाराने प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. फणसापूर, महान फाटा आणि रेवदंडा परिसरातील पाईनची गळती काढण्याचे काम करण्यात आले. कामाचा ठेका घेऊन एक महिना उलटून गेल्यानंतर ठेकेदाराने २१ ऑक्टोबरला उमटेचे काम न करण्याचे पत्र ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंता यांना दिले. त्याने वैद्यकिय आणि न परवड्यासारखे कारण देऊन कामाला ब्रेक दिल्याचे पत्रात म्हटले आहे. ठेकेदाराच्या या पत्राने जिल्हा परिषदेमध्ये खळबळ उडाली. मात्र, या पत्राला ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने नोटीसीच्या स्वरुपात उत्तर देत तंबी भरली आहे. परंतु, देखभाल दूरुस्तीचे काम थांबल्यास या भागातील हजारो नागरिकांची परवड होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

उमटे धरणातील देखभाल दुरुस्ती म्हणजे गळती काढणे आणि कामगार घेण्यासाठी वर्षभरासाठी शिवसाई कंस्ट्रक्शनला ठेका दिला आहे. २० लाख रुपयांचे हे काम आहे. मात्र, कंपनीने वैद्यकीय आणि न परवडण्यासारखे कारण सांगून ठेका रद्द करण्याची मागणी केली आहे. परंतु, ठेकेदाराचे हे कारण योग्य नाही. निवीदा प्रकीया राबविताना दिलेल्या निकषानुसारच काम देण्यात आले आहे. त्यामुळे ठेकेदाराविरोधात कडक कारवाई केली जाईल. जिल्हा परिषदेमार्फत असलेले ठेकेही रद्द केले जातील. त्यांच्या पत्राला नोटीस स्वरुपात उत्तर दिले आहे.

– मोहन सरवदे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, रा.जि.प.

जलवाहीनी गळतीचा प्रश्न ऐरणीवर

सुडकोली, बोरघर, रामराज, चिंचोटी, बेलोशी, चौल, रेवदंडा, आक्षी, नागाव इत्यादी ग्रामपंचायतीमधील हजारो नागरिकांना उमटे धरणाद्वारे पाणी पुरवठा केला जातो.पाण्यावर अवलंबून असलेल्या गावांतील नागरिकांना ठेकेदाराच्या पत्राचा फटका बसण्याची भिती व्यक्त करण्यात आली आहे. जलवाहिनीचे होणारे लिकेज वेळीच दुरुस्त न झाल्यास पुन्हा पाण्यासाठी नागरिकांना वणवण करण्याची वेळ येण्याची शक्यता आहे.

पंतप्रधानांना फक्त उद्योगपती दिसतात

देशातील शेतकरी, कामगार, महिला, दलीत, आदिवासी, अल्पसंख्याक हे भाजप–आरएसएस सरकारच्या राजवटीत भरडले जात आहेत. हे सरकार हिंदू–मुसलमान करीत समाजात फूट पडण्याचे काम करीत आहे. मात्र, बहिणींचे हक्क आणि शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेताना हिंदू आहे की मुसलमान आहेत हे पहात नाहीत, अशी टीका करीत धर्मजातीचे राजकारण करण्याच्या सरकारच्या धोरणावर वृंदा करात यांनी टीकास्त्र सोडले. तसेच, इंग्रजांपुढे गुडघे टेकवत ज्यांनी माफी मागितली ते आज आम्हाला देशभक्ती शिकवत आहेत, असा टोला देखील त्यांनी लगावला. देशात १३ कोटी मतदारांची चोरी करीत लोकशाही व्यवस्थेवर हल्ला करण्यात आला आहे. ज्यांची नावे मतदार यादीतून वगळली गेली त्यात सर्वाधिक संख्या महिलांची आणि स्थलांतरित मजुरांची आहे. मागील पाच वर्षांत ११.५ लाख वनजमिनीचे दावे दाखल झाले आहेत. त्यातील निम्म्यापेक्षा अधिक तसेच पडून आहेत. जे मंजूर झाले त्यातही मागितल्यापेक्षा फारच कमी जमीन आदिवासींना दिली गेल्याचे त्यांनी सांगितले.

उरण फाट्यावर धावत्या कारने घेतला पेट

घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन जवानांनी शर्थीचे प्रयत्न करत कारला लागलेली आग आटोक्यात आणली. मात्र, या दुर्घटनेत कार पूर्णपणे जळून खाक झाली.दरम्यान, उरण फाटा मार्गावरील बेलापूर–नेरूळ मार्गावर काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. यावेळी रस्त्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने वाहनचालकांना काही काळ वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला.

९ लाखांची चोरी करताना जेरबंद

पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करत चोरीचा प्रयत्न करणाऱ्या दोघांना रंगेहाथ पकडले. बाळू ऊर्फ किशोर ज्ञानेश्वर नागमार (३०) आणि शाबीर मोहम्मदअली शेख (२३) अशी पकडलेल्या चोरट्यांची नावे असून, या दोघांविरुद्ध खेड पोलीस ठाण्यात यापूर्वीही गुन्ह्यांची नोंद आहे. यावेळी त्यांच्याकडून चारचाकी वाहनासह सुमारे ९ लाख १८ हजार ७५० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केल्याची माहिती रायगड पोलिसांच्या प्रसिद्धिपत्रकातून देण्यात आली आहे.

लिफ्टच्या खड्ड्यात पडून मृत्यू

सुमारास ही दुर्घटना घडली. या घटनेने बांधकाम व्यावसायिकांच्या निष्काळजीपणासह सिडको प्रशासनाच्या देखरेखीवरही गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. मूळचा उत्तर प्रदेशातील महाराजगंज जिल्ह्यातील रहिवासी असलेला विनोद निसाद हा स्कायलार्क इमारतीच्या बांधकामस्थळी लादी कापण्याचे काम करीत होता. दुसऱ्या मजल्यावर काम करीत असताना त्याचा तोल गेला आणि तो थेट लिफ्टच्या खड्ड्यात कोसळला. डोक्याला आणि शरीराला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला.

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

निविदा सूचना

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी येथील वरिष्ठ विभागीय सिग्नल व दूरसंचार अभियंता यांच्या वतीने अनुभवी कंत्राटदारांकडून "कोंकण रेल्वेच्या महाराष्ट्रातील रत्नागिरी क्षेत्रांतर्गत चिपळूण स्थानकावर (फलाट क्र. 1 ते 3), आरवली रोड स्थानकावर (फलाट क्र. 1) तसेच रत्नागिरी आणि चिपळूण स्थानकांवरील पार्सल कार्यालयांमध्ये अतिरिक्त सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, सापे-वामणे स्थानकावरील सीसीटीव्ही कॅमेरे काढून पुन्हा बसविणे आणि संबंधित स्थानकांवर तसेच मडगाव रेल्वे स्थानकातील सीसीटीव्ही नियंत्रण कक्षात दृश्य पाहण्यासाठी सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या सीसीटीव्ही प्रणालीशी अखंड एकत्रीकरण करण्याचे काम." **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-एसजी-टी-07 2026-27 दिनांक 24.10.2026, कामाची अंदाजित किंमत:** रु. 12.69/- लाख (जीएसटी वगळून), **ईएमडी रक्कम:** रु. 25,400/-, **निविदा सादर करण्याची अंतिम तारीख व वेळ:** 14.11.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी कृपया भेट द्या: www.ireps.gov.in

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

ई-लिलाव सूचना

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लि. कडून व्यावसायिक करारांचा ई-लिलाव जाहीर करण्यात येत असून तो आयआरईपीएस ई-निविदा प्रणालीवर खालील वेळापत्रकानुसार प्रकाशित करण्यात आलेला आहे.

अ. क्र.	कराराचे नाव	करारांची / लॉट्सची संख्या	ई-लिलावाची दिनांक व वेळ
1	मडगाव – मंगळुरू सेंट्रल – मडगाव (10107/10108) मेमू ट्रेन तसेच दिवा – सावंतवाडी रोड पॅसेंजर (10105/10106) ट्रेनमध्ये अंतर्गत जाहिरातींचे प्रदर्शन	02	27/10/2026 रोजी 11:00 वाजता
2	दिवा – सावंतवाडी रोड पॅसेंजर (10105/10106), दिवा – रत्नागिरी पॅसेंजर (50104/50103), कोकण कन्या एक्सप्रेस (20112-20111), मांडवी एक्सप्रेस (10104-10103) या ट्रेनच्या बाह्य भागावर जाहिरातींचे प्रदर्शन	03	28/10/2026 रोजी 11:00 वाजता
3	मडगाव येथे पार्सल स्कॅनर	01	28/10/2026 रोजी 11:00 वाजता
4	मडगाव येथे प्रधानमंत्री भारतीय जन औषधी केंद्र (पीएमबीजेके)	01	29/10/2026 रोजी 11:00 वाजता
5	चिपळूण, कणकवली, कुडाळ, करमळी, गोकर्ण रोड, होन्नावर, भटकळ आणि सुरतकल या स्थानकांवर डिजिटल लॉकर बसविणे	08	30/10/2026 रोजी 11:00 वाजता
6	कुडाळ येथे सशुल्क वाहनतळाची सुविधा.	01	30/10/2026 रोजी 11:00 वाजता
7	थिविम व करमळी येथील एफओबी वर जाहिरात फलकांद्वारे जाहिराती, करमळी स्थानक परिसरात व्हिडिओ स्क्रीनद्वारे जाहिरात आणि मडगाव येथे आवाराच्या सीमाभिंतीवर जाहिरात	04	31/10/2026 रोजी 11:00 वाजता
8	माणगाव, कोलाड, आडवली, विलवडे आणि मडगाव या स्थानकांवर भाडे पुनरावृत्ती दर्शक बसविणे.	05	31/10/2026 रोजी 11:00 वाजता
9	कुन्दापुरा, मूकांबिका रोड बैन्दूर, थिविम, थिविम-2, कारवार, करमळी येथे पैसे देऊन वापरण्याची शौचालय सुविधा.	06	03/11/2026 रोजी 11:00 वाजता
10	रत्नागिरी व उडुपी येथे दुचाकी पॅकिंगचा कंत्राट	02	04/11/2026 रोजी 11:00 वाजता
11	रोड अंडर ब्रिज / रोड ओव्हर ब्रिज जवळ महाराष्ट्र आणि कर्नाटक राज्यात होर्डिंग्सद्वारे जाहिरात	04	06/11/2026 रोजी 11:00 वाजता
12	रेल्वे स्थानकांवर जाहिरात फलकांद्वारे जाहिरात, रत्नागिरी, चिपळूण, मडगाव, थिविम, करमळी, कारवार, मुल्की, उडुपी स्थानकांवर होर्डिंग्स तसेच थिवीम येथे व्हिडिओ वॉल	09	07/11/2026 रोजी 11:00 वाजता
13	एसएलआरचे लीजिंग – गाडी क्रमांक 11004, 20112, 10104, 10215, 22907, 56615-II, 12790	07	07/11/2026 रोजी 11:00 वाजता

चौकशीसाठी कृपया संपर्क साधा: 1. श्री. राजेश रेडीज, मोबाईल क्र. 7020553377, 2. श्री. विनय गावंकर, मोबाईल क्र. 9004476129, 3. श्री. मधुकुमार शेट्टी, मोबाईल क्र. 9004476082. अधिक माहितीसाठी कृपया **www.ireps.gov.in** या संकेतस्थळास भेट द्या.

मुख्य वाणिज्य व्यवस्थापक
कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

सिडको
शहरांचे शिल्पकार

जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना निवाड्याबाबत अटी व हरकती प्राप्त करण्याकरिता प्रस्तावित करण्यात येत आहे.

अ. क्र.	संचिका क्र.	गाव व निवाडा क्र.	सर्व्हे क्र.	संपादित क्षेत्र	मंजूर पात्रता (चौ.मी.)	वाटपपत्र देण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती	भूखंडाच्या वाटपाशी संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती	संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्य:स्थिती
							नोड– JNPT द्रोणागिरी	
१	JNPT १५६	जासई १५५, १५५/१५३	१७५/११अ २३६/५ २३९/९	०-१८-० ०-३३-० ०-०२-०	२३७० चौ.मी.	नोड जे.एन.पी.टी. ब्लॉक क्र. ०५, सेक्टर क्र. ०५, भुखंड क्र. २०, क्षेत्र–२३७० चौ.मी.	**श्री. कृष्णा गोविंद कडू (मूळ निवाडाधारक)** **कै. परशुराम नारायण म्हात्रे (मयत) यांचे वारस (वारस दाखला क्र. ८६/२०१६)** १. श्री. विश्वास परशुराम म्हात्रे २. कै. श्रीमती. गंगाबाई परशुराम म्हात्रे (मयत) ३. श्रीमती. कुसुम चंद्रकांत गावंड ४. श्रीमती. सुलोचना गोविंद पाटील **कै. श्रीमती. गंगाबाई परशुराम म्हात्रे (मयत) यांचे वारस (वारस दाखला क्र. ६७/२०२१)** १. कै. विश्वास परशुराम म्हात्रे (मयत) २. श्रीमती. शकुंतला विश्वास म्हात्रे ३. कु. प्रणिता विश्वास म्हात्रे ४. कु. श्रुती विश्वास म्हात्रे ५. कु. आदिती विश्वास म्हात्रे ६. कु. कार्तिक विश्वास म्हात्रे ७. सौ. विनिता महेश म्हात्रे ८. श्रीमती. सुलोचना गोविंद पाटील ९. श्रीमती. कुसुम चंद्रकांत गावंड **कै. बाळाराम नारायण म्हात्रे (मयत दि. २८.०४.२०२१) यांचे वारस (वारस दाखला क्र. १५/२०२२)** १. श्रीमती. अंजनी कृष्णा पाटील २. श्रीमती. सुरेखा उदय पाटील ३. श्रीमती. प्रतिभा संजय ठाकूर ४. श्री. संजय बाळाराम म्हात्रे **कै. दुर्गाबाई पांडुरंग म्हात्रे (मयत) यांचे वारस (वारस दाखला क्र. २८४/२०१८)** १. श्री. सिताराम पांडुरंग म्हात्रे २. श्रीमती. मंजुळा आशोक भोईर **कै. वासुदेव भोका उर्फ भोक्या म्हात्रे (मयत) यांचे वारस (वारस दाखला क्र. २९३/२०१७)** १. श्री. सुरेश मोतीराम म्हात्रे २. श्रीमती. अरुणा मोतीराम म्हात्रे ३. कै. श्रीमती. पार्वती नारायण म्हात्रे (मयत) ४. श्री. मनोज नारायण म्हात्रे ५. श्री. श्रीनिवास नारायण म्हात्रे ६. श्रीमती. मंजुळा महेंद्र गावंड ७. श्री. भालचंद्र भाऊ पाटील ८. श्री. अशोक भाऊ पाटील ९. श्रीमती. सुप्रिया संदिप पाटील १०. श्रीमती. लता श्रीकांत म्हात्रे ११. श्रीमती. जनाबाई शांताराम म्हात्रे **कै. काशिबाई वासुदेव म्हात्रे (मयत) यांचे वारस (वारस दाखला क्र. ९८/२०२१)** १. श्रीमती. जनाबाई शांताराम म्हात्रे **कै. धाया नथू पाटील (मयत) यांचे वारस (वारस दाखला क्र. १२०/२०२१)** १. श्री. खंडू माया पाटील २. श्री. नरेश माया पाटील ३. श्री. गणेश माया पाटील ४. श्री. सुरेश माया पाटील ५. श्री. हरिश्चंद्र माया पाटील ६. श्री. अशोक माया पाटील ७. श्रीमती. चंद्राबाई उर्फ चंद्रावती हरिश्चंद्र पाटील ८. श्रीमती. जयश्री कल्याणी सोनार ९. श्रीमती. बिरसुबाई गजानन पाटील १०. श्री. लहु उर्फ लहुराज गजानन पाटील ११. श्री. मधुकर गजानन पाटील **कै. गजानन धाया पाटील (मयत) यांचे वारस (वारस दाखला क्र. ३६/२०२०)** १. श्रीमती. बिरसुबाई गजानन पाटील (मयत) २. श्री. लहु उर्फ लहुराज गजानन पाटील ३. श्री. मधुकर गजानन पाटील ४. श्री. गोपाळ गजानन पाटील **कै. श्रीमती. पार्वती नारायण म्हात्रे (मयत) व कै. नारायण वासुदेव म्हात्रे (मयत) यांचे वारस (वारस दाखला क्र. ४९/२०२३)** १. श्रीमती. मंजुळा महेंद्र गावंड २. श्री. मनोज नारायण म्हात्रे ३. श्री. श्रीनिवास नारायण म्हात्रे	सक्षम न्यायालयाने घोषित केलेल्या वारसांपैकी पात्र भूधारक **१. श्रीमती. शकुंतला विश्वास म्हात्रे २. कु. प्रणिता विश्वास म्हात्रे ३. कु. श्रुती विश्वास म्हात्रे ४. कु. आदिती विश्वास म्हात्रे ५. कु. कार्तिक विश्वास म्हात्रे ६. सौ. विनिता महेश म्हात्रे ७. श्रीमती. कुसुम चंद्रकांत गावंड ८. श्रीमती. सुलोचना गोविंद पाटील ९. सौ. अंजनी कृष्णा पाटील १०. सौ. सुरेखा उदय पाटील ११. सौ. प्रतिभा संजय ठाकूर १२. श्री. संजय बाळाराम म्हात्रे १३. श्रीमती. मंजुळा आशोक भोईर १४. श्री. सिताराम पांडुरंग म्हात्रे १५. श्री. कृष्णा गोविंद कडू १६. श्री. खंडू माया पाटील १७. श्री. नरेश माया पाटील १८. श्री. गणेश माया पाटील १९. श्री. सुरेश माया पाटील २०. श्री. हरिश्चंद्र माया पाटील २१. श्री. अशोक माया पाटील २२. श्रीमती. चंद्राबाई उर्फ चंद्रावती हरिश्चंद्र पाटील २३. श्रीमती. जयश्री कल्याणी सोनार २४. श्री. लहु उर्फ लहुराज गजानन पाटील २५. श्री. मधुकर गजानन पाटील २६. श्री. गोपाळ गजानन पाटील २७. श्री. सुरेश मोतीराम म्हात्रे २८. श्रीमती. अरुणा मोतीराम म्हात्रे २९. श्री. मनोज नारायण म्हात्रे ३०. श्री. श्रीनिवास नारायण म्हात्रे ३१. श्रीमती. मंजुळा महेंद्र गावंड ३२. श्रीमती. जनाबाई शांताराम म्हात्रे** यांच्या नावे भूखंड वाटपाचे प्रस्तावित आहे. **हक्कसोडपत्राची माहिती :** सदर संचिकेमध्ये हक्कसोडपत्र निरंक आहे. **न्यायालयीन दाव्यांची माहिती:** १) स्पे.दि.मु.क्र. ६१/२०१८ (गणेश धर्मा घरत व इतर विरुद्ध गोवर्धन महादेव घरत व इतर), मा. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), पनवेल: दि. १०/०२/२०१८ रोजी राष्ट्रीय लोकन्यायालयात तडजोड पुरशीसप्रमाणे निकाली. त्यानुसार मौजे शेवा निवाडा क्र. २४२, २४२/I व २४२/II मधील कै. काशीबाई वासुदेव म्हात्रे यांच्या वारस श्रीमती जनाबाई शांताराम म्हात्रे यांना १/४ हिस्सा मिळालेला असून, त्यांची २०० चौ.मी. पात्रता प्रस्तुत संचिकेत प्रस्तावित आहे; उर्वरित पात्रता संचिका क्र. १६९–JNPT मध्ये समाविष्ट आहे. २) एस.सी.एस. क्र. ४२५/२०१७ (मे. पदमप्रिया प्रा. विरुद्ध पार्वती नारायण म्हात्रे व इतर): सिडको प्रतिवादी असून तडजोड पुरशिसप्रमाणे हुकूमनामा पारीत झालेला आहे. मौजे शेवा येथील युनिट क्र. ३२०+३३६ मधील सर्व्हे क्रमांकाबाबत ७५० चौ.मी. भूखंड वादीच्या नावे त्रिपक्षीय करारनामा करून देण्याचे मान्य करण्यात आले आहे. ३) याव्यतिरिक्त संचिकेत व सिडकोच्या Legal Tracking System मध्ये कोणताही दावा अथवा मनाई हुकूम नाही.
		शेवा १५६	१३३/१ १२४/१	०-३४-१ ०-५३-१				
		सावरखार II-V ६०/८३, ६०	७६/५ ८४/१४ ११०/१२ ११७/७ ७३/५ ९९/९	०-०९-० ०-१२-९ ०-०५-८ ०-०६-८ ०-०३-८ ०-१७-५				
		फुंडे ७९/१०५	३९/९B ४६/१A ५०/९A ५८/७A	०-०६-९ ०-०५-१ ०-०५-५ ०-०६-१				
		फुंडे ४०/६१	१९/६/६ १६०/२A १०४/७C ११०/१३C १२९/५A १३३/४A	०-०५-६ ०-०६-९ ०-०४-३ ०-०३-० ०-०७-१ ०-१२-४				
		शेवा ३२०+ ३३६/अ	१५१/२६	०-२२-०				
		शेवा ३२०+ ३३६/ब	१०४/७ १०६/६ १४६/१५ १४६/१६ १४६/१८ १४८/६	०-०४-३ ०-०१-३ ०-१२-० ०-२०-० ०-२५-० ०-०३-४				
		शेवा २४२	९/२ २३/२ २८/४ ४७/९ ४९/२ ४९/५ ५०/२७	०-०२-३ ०-०२-० ०-०१-५ ०-०५-० ०-०८-३ ०-०२-३ ०-००-२				
		शेवा २४२/I	४/१५ २६/१२ १९१/३१	०-०६-० ०-०३-७ ०-०७-०				
		शेवा २४२/II	१२/१९C १८/१ ३३/४	०-२९-० ०-१०-० ०-१०-०				
		शेवा २४२	३३/४पै	०-०२-०				
		एकूण संपादित क्षेत्र		४–३६–२				

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा / हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :– अति.मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (उरण)
सिडको भवन, तळ मजला, भूमि विभाग १२.५०%, सी.बी.डी., बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (जेएनपीए)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/२६९/२०२६–२७

PUBLIC NOTICE

Public at large are hereby informed that our Client intends to enter into a transaction in respect of the immovable property more particularly described in the Schedule hereunder written (hereinafter referred to as the **"Schedule Property")** with its present owner, who has represented and assured our Client that he/she is the lawful and absolute owner of the Schedule Property and is fully entitled and legally competent to transfer and alienate the same. The present owner has further represented and assured our Client that the Schedule Property is free from all encumbrances, charges, liens, claims, disputes, litigations, attachments, acquisitions, and any third-party rights or interests of whatsoever nature.

If any person(s), entity, company, firm, institution (corporate or otherwise) has or claims any right, title, interest, pending litigation, tenancy, mortgage, charge, lien, demand or any other right or interest of whatsoever nature in, upon or in respect of the Schedule Property or any part thereof, the same shall be brought to the notice of the undersigned in writing, along with complete particulars and supporting documentary evidence, within **21(Twenty-One) days** from the date of publication of this Notice. Failing receipt of any such claim or objection within the aforesaid period, our Clients shall proceed on the basis of the claims and representations made by the present owners and shall be at liberty to proceed with the intended transaction in respect of the Schedule Property, subject to verification of title and applicable law. Any claim or objection received after the expiry of the aforesaid period may not be considered for the purpose of the proposed transaction, without prejudice to any rights or remedies available under applicable law.

Schedule of The Property at Village Pohi

All that piece and parcel of immovable property comprising land situated at Village Pohi, Taluka-Karjat, District-Raigad, Maharashtra, more particularly described hereinbelow and belonging to the following present owners, which our clients intend to purchase:

Name	Village	Gat No.	Area
Mr. Mohit Singhal Mrs. Shruti Piyush Jain Mr. Piyush Nandkumar Jain	**Pohi**	**13/2**	**0-33-40**
		13/3	**0-24-30**
Mr. Gaurav Nandkumar Jain Other 7		**14/6**	**0-28-00**
Baliram Ramdas Tandel		**12/1**	**0-53-60**
		12/3	**0-52-60**
		12/4	**0-49-60**
Mohit Singhal	**Pohi**	**13/1**	**0-73-80**
		13/4	**0-31-40**
		14/7	**0-79-00**
		14/6	**0-28-00**
		14/8	**1-80-00**
		14/9	**5-67-00**
		14/11	**0-06-00**
Sadashiv Jadhav And Others	**Pohi**	**12/2**	**0-90-00**
Punyanath Tandel And 2		**14/10**	**1-01-00**
		Total	**14-98-70**

Schedule Of The Property at Village Ware

All that piece and parcel of immovable property comprising land situated at Village Ware, Taluka Karjat, District Raigad, Maharashtra, more particularly described hereinbelow and belonging to the following present owner, which our clients intend to purchase:

Name	Village	Gat No.	Area
Mr. Nandkumar Tarachand Jain	**Ware**	**12/5**	**1-11-00**
		12/6	**0-56-00**
		12/7	**0-42-00**
		Total	**2-09-00**

Date : 24/10/2026
Place : Vashi, Navi Mumbai

ADV. HINDAVI PATIL (MAH/3494/2020)
X- 1080 Akshar Business Park, Plot No-3, Sector-25, Opp. Turbhe Railway Station, Near APMC, Vashi, Navi Mumbai-400 705
Mobile : 9326797200 • E-Mail : legaljustchambers.in

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. नागेवाडी, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. संदेश भीमसेन साळोखे यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे-आर-पॉ)	आकार (रू. पै)
६	१ अ	५-६०-००	४-२५

वरील जमिन मिळकती मध्ये जमिन मालक यांचे मालकीचे असलेले क्षेत्र ०-२०-० हे.आर.पॉ विकत देत आहेत.

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २४/१०/२०२६

ॲड. राकेश भरत भोईर
ऑफीस- कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

पनवेल महानगरपालिका
पर्यावरण विभाग

ध्वनी प्रदूषण व फटाके नियंत्रणाबाबत नागरिकांना आवाहन

मा. मुंबई उच्च न्यायालयाने Suo Motu PIL No. ०१ of २०२६ प्रकरणामध्ये दिलेल्या अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने पनवेल महानगरपालिकेमार्फत नागरिकांना खालील बाबींचे काटेकोरपणे पालन करण्याचे जाहीर आवाहन करण्यात येत आहे.

१. सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडण्यास प्रतिबंध
सार्वजनिक रस्ते, रस्त्याच्या कडेला असलेली ठिकाणे, गल्ली, फुटपाथ व इतर सार्वजनिक ठिकाणी सण/उत्सवाच्या काळात फटाके फोडू नयेत.

२. शांतता क्षेत्रांमध्ये फटाके फोडण्यास विशेष प्रतिबंध
मा. न्यायालये, रुग्णालये, शासकीय कार्यालये, शाळा व इतर शांतता क्षेत्रांच्या परिसरात फटाके फोडू नयेत.

३. ध्वनिवर्धक यंत्रणेबाबत आवश्यक परवानगी व अटींचे पालन करणे.
सार्वजनिक कार्यक्रम, मिरवणुका किंवा इतर कार्यक्रमांमध्ये ध्वनिवर्धक यंत्रणेचा वापर करण्याकरिता सक्षम प्राधिकरणाची परवानगी घेणे व परवानगीच्या सर्व अटींचे पालन करणे आवश्यक राहील.

४. ध्वनी व वायू प्रदूषण टाळा
फटाके व ध्वनिवर्धक यंत्रणेमुळे ध्वनी प्रदूषण तसेच फटाक्यांमुळे वायू प्रदूषण होऊन नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे नागरिकांनी पर्यावरणपूरक पद्धतीने सण/उत्सव साजरे करावेत.

५. फटाक्यांच्या वापराबाबत आवाहन
तुलनेने कमी ध्वनी व कमी उत्सर्जन करणाऱ्या Green Crackers (हरित फटाके) चा वापर करण्यास प्राधान्य द्यावे. Green Crackers (हरित फटाके) म्हणजे तुलनेने कमी प्रदूषणकारी फटाके असून त्यांच्या निर्मितीमध्ये पारंपरिक फटाक्यांच्या तुलनेत प्रदूषक घटकांचे प्रमाण कमी ठेवले जाते.

Green Crackers (हरित फटाके) हे पूर्णपणे प्रदूषणमुक्त नसतात, त्यामुळे त्यांचा वापर करतानाही लागू असलेल्या नियमांचे व वेळेच्या मर्यादांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

तक्रार संपर्क क्रमांक :- ८९६०९१६०९१
ई-मेल :- panvelcorporation@gmail.com

मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करून शांत, सुरक्षित व प्रदूषणमुक्त सण/उत्सव साजरे करण्याच्या अनुषंगाने सर्व नागरिकांनी पनवेल महानगरपालिकेस सहकार्य करावे.

जा.क्र: पमपा/पर्यावरण/३४२६/१५१/२०२६.
दिनांक : २३ ऑक्टोबर २०२६

(स्वाक्षरीत/-)
उपायुक्त (पर्यावरण)
पनवेल महानगरपालिका

जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे पालव, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान श्रीमती तारामती हरिश्चंद्र करमळकर यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट क्रमांक व उपविभाग	क्षेत्र हे. आर	आकार रु. पैसे
कावीर ता. अलिबाग जि. रायगड	८	१.१६.८० पो.ख. ०.१३.७० एकूण १.३०.५०	२९.१३

वर नमुद मिळकतीपैकी विद्यमान मालकांच्या मालकीचे क्षेत्र ०.८१.३० हे.आर, पो.ख. ०.१३.७० हे.आर, एकूण क्षेत्र ०.९५.०० हे. आर, आकार २०.२८ रू.पैसे या मिळकतीपैकी पैकी क्षेत्र ०.७५.०० हे. आर.

तरी वरील मिळकतींच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार कोर्टात दावा, मृत्यूपत्र अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध व बिनजोखमी आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतींचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २४/१०/२०२६

ॲड. विजय अनंत पेढवी
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे पालव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकती मिळकतींचे विद्यमान मालक १) भरत गणपत घरत, २) नंदकिशोर गणपत घरत यांचेकडून विकत घेण्याच्या ठरविलेल्या आहेत. सदर मिळकत निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

मिळकतींचे वर्णन

अ.क्र.	मौजे	गट नंबर	एकूण क्षेत्र (हे.आर.पॉ)	आकार (रू.पै.)
१.	पालव, ता. अलिबाग, जि. रायगड	९/६/अ	क्षेत्र ०.०७.६० पो.ख ०.००.०० एकूण क्षेत्र ०.०७.६०	०.५९
२.	पालव, ता. अलिबाग, जि. रायगड	९/६/ब	क्षेत्र ०.०७.५० पो.ख ०.००.०० एकूण क्षेत्र ०.०७.५०	०.६०
३.	पालव, ता. अलिबाग, जि. रायगड	९/७	क्षेत्र ०.१४.३० पो.ख ०.०१.५० एकूण क्षेत्र ०.१५.८०	१.७५
४.	पालव, ता. अलिबाग, जि. रायगड	९/८/अ	क्षेत्र ०.०४.७० पो.ख ०.००.०० एकूण क्षेत्र ०.०४.७०	०.३४
५.	पालव, ता. अलिबाग, जि. रायगड	९/८/ब	क्षेत्र ०.०४.७० पो.ख ०.००.०० एकूण क्षेत्र ०.०४.७०	०.३८

तरी वरील मिळकतीच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक २४/१०/२०२६

ॲड. विजय अनंत पेढवी
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

निवडक

पळस्पेमधून इसम बेपत्ता

पनवेल : पळस्पे गावातील ब्राह्मण आळी येथील रहिवासी विजय सिताराम साबळे (वय ४५) हे सकाळी साडेअकराच्या सुमारास कामोठे येथील सेक्टर ३५ मधील पिनॅकल रेसीडन्सी, प्लॉट क्रमांक २८ येथून बेपत्ता झाले आहेत. याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विजय साबळे यांचा रंग सावळा असून केस काळे, बांधा मजबूत आणि उंची पाच फूट सात इंच आहे. बेपत्ता होताना त्यांनी नारंगी रंगाचा टी-शर्ट व चॉकलेटी रंगाची पँट परिधान केली होती. त्यांच्या उजव्या हातात लाल रंगाचा धागा असून त्यांच्यासोबत काळ्या रंगाची बॅग होती. त्यांच्याकडे विवो कंपनीचा मोबाईल फोन होता. साबळे यांच्याबाबत कोणाला काही माहिती मिळाल्यास त्यांनी कामोठे पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार ओ.जी.साळुंखे करीत आहेत.

सुधागडात जलसंधारणासाठी ग्रामस्थांचा पुढाकार



पाली : पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत मुरविण्यासाठी सुधागड वनपरिक्षेत्रात वन विभागाच्या पुढाकाराने आणि स्थानिक ग्रामस्थांच्या श्रमदानातून वनराई बंधारे बांधण्यात आले. मजरे जांभूळपाडा, कळंब तसेच घोटवडे या परिमंडळांतील वनक्षेत्रात हा जलसंधारण उपक्रम राबविण्यात आला. वनाधिकारी, वनकर्मचारी आणि ग्रामस्थांच्या संयुक्त प्रयत्नांतून उभारलेले हे बंधारे वनक्षेत्रातील मातीचा ओलावा टिकवून ठेवण्यासाठी उपयुक्त ठरणार आहेत. सुधागडचे वनपरिक्षेत्र अधिकारी विशाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कामे पूर्ण करण्यात आली. संबंधित परिमंडळांतील वनपालांच्या नेतृत्वात वनरक्षक, वनमजूर आणि स्थानिक ग्रामस्थांनी प्रत्यक्ष श्रमदान केले. वनसंपदेच्या संवर्धनासाठी आवश्यक असलेल्या जलसंधारणाच्या कामाला लोकसहभागाची जोड मिळाल्याने वन विभाग आणि ग्रामस्थांच्या सहकार्याचे विधायक उदाहरण या उपक्रमातून समोर आले आहे. वनपरिक्षेत्र कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, वनराई बंधाऱ्यांमुळे वाहून जाणारे पाणी अडवून ते जमिनीत मुरण्यास मदत होते. त्यामुळे मातीतील आर्द्रता वाढण्यास, भूजलपातळी सुधारण्यास आणि वनस्पतींना आवश्यक ओलावा उपलब्ध होण्यास हातभार लागतो. विशेषतः पावसानंतरच्या कोरड्या कालावधीत वनक्षेत्रातील झाडे-झुडपांसाठी हा ओलावा उपयुक्त ठरू शकतो.

खोपोली वाहतूक चौकीत अंधार

|| महिनाभरापासून वीज गायब || सीसीटीव्ही कॅमेरेही बंद

| खोपोली | प्रतिनिधी |

शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी उन्हातान्हात रस्त्यावर उभे राहून कर्तव्य बजावणाऱ्या खोपोली वाहतूक पोलिसांनाच आता मूलभूत सुविधांसाठी संघर्ष करावा लागत आहे. खोपोली वाहतूक चौकीत गेल्या महिनाभरापासून दिवसा वीजपुरवठा होत नसल्याची तक्रार असून, केवळ रात्रीच वीज उपलब्ध होत असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे चौकीतील कर्मचाऱ्यांना उकाड्याचा सामना करावा लागत असून, वीजपुरवठ्याअभावी सीसीटीव्ही कॅमेरेही बंद राहत असल्याचा दावा केला जात आहे. या समस्येबाबत पोलीस प्रशासनाने खोपोली नगरपालिकेचे मुख्याधिकारी आणि नगराध्यक्ष यांच्याकडे तक्रार करूनही अद्याप तोडगा निघालेला नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

खोपोली शहरातील वाहतूक कोंडी नियंत्रणात ठेवणे, वाहनांची वर्दळ सुरळीत करणे आणि नागरिकांच्या सुरक्षित प्रवासासाठी आवश्यक उपाययोजना करणे, अशी महत्त्वाची जबाबदारी वाहतूक पोलीस पार पाडतात.

वाहतूक नियंत्रणासोबतच विविध घटनांवर लक्ष ठेवण्यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे महत्त्वाचे ठरतात. मात्र, दिवसा वीज नसल्याने हे कॅमेरे बंद राहत असल्याची तक्रार आहे. त्यामुळे वाहतुकीवर देखरेख ठेवणे तसेच एखादी घटना घडल्यास त्यासंबंधीचे दृश्य पुरावे मिळविण्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. शहरातील वाहतूक व्यवस्था सांभाळणाऱ्या यंत्रणेलाच अशा अपुऱ्या सुविधांचा सामना करावा लागत असल्याने या समस्येची गांभीर्याने दखल घेण्याची गरज आहे.



दैनंदिन कामकाजावर परिणाम

कडक उन्हातही रस्त्यावर उभे राहून कर्तव्य बजावणाऱ्या या कर्मचाऱ्यांना चौकीत मात्र वीज नसल्याने गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. दिवसभर वीजपुरवठा खंडित राहत असल्याने चौकीतील दैनंदिन कामकाजावरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

वीजसमस्येबाबत पोलीस प्रशासनाने खोपोली नगरपालिकेचे मुख्याधिकारी आणि नगराध्यक्ष यांच्याकडे तक्रार केली आहे. मात्र, महिनाभराचा कालावधी उलटूनही समस्या कायम असल्याने संबंधित यंत्रणेकडून उपाययोजना का करण्यात आलेली नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. पोलीस प्रशासनाच्या तक्रारीनंतरही वीजपुरवठ्याची समस्या सुटत नसेल, तर सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण किती तत्परतेने होत असेल, असा सवालही या निमित्ताने उपस्थित केला जात आहे.

वीजपुरवठ्याची समस्या तातडीने सोडवून वाहतूक चौकीतील सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करावी आणि कर्मचाऱ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

मजुरांचा अभावामुळे शेतकरी हैराण



| मुरुड जंजिरा | प्रतिनिधी |

बळीराजा भात कापणी करण्यात व्यस्त झाला आहे. मात्र, शेतमजुरांच्या कमतरतेमुळे शेतीची कामे खोळंबली असून मजुरांची मनधरणी करुन भात कापणीची सुरुवात मुरुड तालुक्यात झाली आहे.

यावेळी योग्य प्रमाणात पाऊस नसल्याने भात शेती संकटाता आली असून हातात हवे तेवढे धान्य मिळणार की, नाही अशी स्थिती बळीराजाची झाली आहे. परंतु परंपरागत कामे करणारे शेतमजुर अनेक भागातून येणारे मजुरांवर भातपीकांची कापणीसाठी अवलंबून असतात. स्थानिक शेतमजुरांची दिवसेंदिवस कमी होत असलेली संख्येमुळे तालुक्यात शेतमजुरांचा तुटवडा जाणवत आहे.

पंचक्रोशी भागातून येणारे मजुर हे दिवाळीपुर्वी मिळतात जे उपलब्ध होतील त्यांची मनधरणी करून लवकरात लवकर भातकापणीला आटोपून घेण्याच्या प्रयत्नात शेतकरीवर्ग करत आहे. तर काही ठिकाणी मिळेल तेथून मजूर घेऊन भात जोडणीची कामे प्रारंभ केली आहेत.





चित्रलेखा पाटील यांची नवरात्रोत्सव मंडळांना सदिच्छा भेट

महिला भगिनींशी साधला संवाद

| अलिबाग | प्रतिनिधी |

नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांनी आपल्या मतदारसंघातील विविध सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळांना सदिच्छा भेटी देत देवीचे दर्शन घेतले.

यावेळी त्यांनी मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच उपस्थित नागरिक बंधू-भगिनींशी संवाद साधत सर्वांना नवरात्रोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या. नवरात्रोत्सव हा शक्ती, भक्ती, श्रद्धा आणि स्त्रीशक्तीच्या सन्मानाचा उत्सव मानला जातो. या उत्सवाच्या माध्यमातून समाजात एकोपा, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा वृद्धिंगत होतो.

सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळांच्या माध्यमातून धार्मिक परंपरा जपण्याबरोबरच विविध सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. या उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये एकजुटीची भावना अधिक दृढ होत असते.

चित्रलेखा पाटील यांनी मंडळांना दिलेल्या भेटीदरम्यान पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्यांच्या या सदिच्छा भेटींमुळे मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

नवरात्रोत्सवाच्या या पवित्र पर्वात देवीच्या आशीर्वादाने सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी, आरोग्य आणि आनंद नांदो, तसेच समाजात शांतता, बंधुभाव आणि एकोपा कायम राहो, अशा शुभेच्छा यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

या भेटी दरम्यान, अनेक महिला, महिला मंडळाच्या सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

पुलाखाली उतरलेल्या व्यक्तीची सुटका

पनवेल : विचुंबे गावाकडे जाणाऱ्या नवीन पुलाखाली पाण्यात उतरलेल्या एका व्यक्तीची नवीन पनवेल अग्निशमन दल आणि पोलिसांनी संयुक्तरीत्या सुखरूप सुटका केली. या व्यक्तीने पुलावर महिलांची छेड काढल्याचा आरोप झाल्यानंतर परिसरातील नागरिक संतप्त झाले होते. त्यामुळे परिस्थिती चिघळण्याची शक्यता निर्माण झाली होती. घटनेची माहिती मिळताच नवीन पनवेल अग्निशमन केंद्राचे अधिकारी आणि कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन अग्निशमन दलाने पाण्यात उतरलेल्या व्यक्तीला सुरक्षितपणे बाहेर काढले. त्यानंतर सहायक पोलीस निरीक्षक नरेश भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या मदतीने संबंधित व्यक्तीला नवीन पनवेल अग्निशमन केंद्रात आणून पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या बचावकार्यात उप अग्निशमन अधिकारी संदीप पाटील, आकाश दीक्षित, अनिकेत जोगदंड, निमेश पावशे, भावेश महाळुंगे, स्वप्निल ठाकूर आणि महेश घुले यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. अग्निशमन दल आणि पोलिसांनी तत्परतेने केलेल्या कारवाईमुळे संबंधित व्यक्तीची सुखरूप सुटका झाली आणि परिस्थिती नियंत्रणात आणण्यात यश आले.

गॅसचे पेमेंट करण्यास सांगून फसवणूक

नवीन पनवेल : महानगर गॅसचे पेमेंट करण्यास सांगून एक लाख एक हजार नऊशे रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दोघा विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. राकेश चिलूका नवीन पनवेल येथे राहत असून अनोळखी व्यक्तीने त्यांना महानगर गॅस कंपनीचे प्रशासकीय अधिकारी असल्याचे सांगून अकाउंटद्वारे एपीके फाईल पाठवली आणि त्यांना महानगर गॅसचे कनेक्शन एजंट नियुक्त करण्यासाठी पेमेंट करण्यास सांगितले आणि त्यांच्या क्रेडिटकार्डमधून एक लाख एक हजार नऊशे रुपये ऑनलाईन वळती करून घेतले.





प्रथम क्रमांक

१) सौ. रश्मी अपुर्व पाटील, पेझारी
२) श्री. गजानन त्रिंबक म्हात्रे, थळ
३) श्री. योगेश प्रकाश वार्डे, रांजणपाडा-आवास
४) श्री. अनिल नारायण वर्तक, वरसोली
५) श्री. विनोद मेहेता, माणगाव
६) श्री. अजिंक्य शेळके, डोंगरी-मुरुड
७) श्री. पांडूरंग विष्णू घरत, लोणारे-थळ
८) श्री. पांडूरंग आरेकर, मुरुड
९) श्री. प्रथमेश दत्ताराम पाटील, दिवीपारंगी-अलिबाग
१०) श्री. चेतन संजय घरत, वरसोली-अलिबाग

द्वितीय क्रमांक

१) सौ. मितल राजेंद्र नाईक, रेवदंडा
२) श्री. संतोष खडतर, चेरवली-माणगाव
३) श्री. रोशन शिवराम म्हसकर, नार्पोली-पनवेल
४) श्री. प्रकाशदादा ठाकूर, झिराड
५) श्री. राजाराम दामोदर पाटील, डावळे-नागाव
६) श्री. मनोज सदाशिव भवारे, दहिवली-नेरळ
७) सौ. छाया विलास भिडे, पेण
८) मोंढे कुटूंब, मुनवली-अलिबाग
९) श्री. अनंत विष्णू पाटील, रामनाथ-अलिबाग
१०) श्री. समीर सावंत, तळवडे(गोठेघर) अलिबाग

विजेत्यांनी आपले बक्षीस २२ ऑक्टोबर ते २८ ऑक्टोबर २०२६ पर्यंत दु. १२ ते सायं. ४ या कालावधीत कृषीवल कार्यालयातून येऊन घेऊन जाणे.

टीप : विजेत्यांनी येताना आपले फोटो असलेले ओळखपत्र सोबत घेऊन येणे.

पत्ता : कृषीवल कार्यालय, वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग | LiFE Lifestyle for Environment

पर्यावरणपूरक दीपावली २०२६

चला संकल्प करूया,
प्रदूषण मुक्त दीपावली साजरी करूया!
शुभ दीपावली



माननीय उच्च न्यायालय मुंबई यांच्या आदेशान्वये रस्ते, पदपथ, तत्सम सार्वजनिक ठिकाणी फटाके वाजवण्यास बंदी आहे.

- फटाक्यांमुळे हवेचे व ध्वनीचे प्रदूषण होते; ते टाळा.
- फटाक्यांमुळे निर्माण होणाऱ्या वायू व ध्वनी प्रदूषणामुळे आरोग्यास अपाय होतो.
- प्रदूषण टाळण्यासाठी हरित फटाक्यांचा वापर करा.
- शाळा, महाविद्यालय, रुग्णालय, न्यायालय व धार्मिक स्थळे या सारख्या सर्व शांतता क्षेत्रात फटाके वाजवण्यास सक्त बंदी आहे.
- सार्वजनिक कार्यक्रमात लेझर लाईट आणि बीम लाईट वापरण्यास सक्त बंदी आहे.
- कार्यक्रमाच्या ठिकाणी आवाजाची तीव्रता मोजणारे संयंत्र बसवणे बंधनकारक आहे.

संकल्प पर्यावरणपूरक दीपावलीचा ! निश्चय वसुंधरेच्या रक्षणाचा!

हा पाहा परकीय हात

देशात कॉंकरोच जनता पार्टी, डावे आणि काँग्रेस यांची जी आंदोलने झाली त्यामागे परकीय हात असल्याची टीका झाली. नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्यापाठोपाठ परवा मोहन भागवतांनी दसऱ्याच्या भाषणात तसेच सूचित केले. आंदोलन ज्या मुद्द्यांसाठी आहे त्याबद्दल बोलायचे नाही, फक्त त्यामागे परकीय हात आहे किंवा राहुल गांधी किती कुचकामी नेते आहेत अशा दुगाण्या झाडायच्या तमाम भाजपच्या नेत्यांचा उद्योग आहे. प्रत्यक्षात मोदीसाहेबांच्या कारभारात अमेरिका नावाच्या राक्षसी सत्तेच्या परकीय हाताने धुमाकूळ घातलेला आहे. अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्क रुबियो नुकतेच भारतात येऊन गेले. पण ते दिल्लीला न जाता आधी मुंबईत आले व तेथून जामनगरला गेले. जामनगरला अंबानींचा जगातला सर्वात मोठा तेलशुध्दीकरण कारखाना आहे. रुबियो यांचे मुकेश अंबानींशी चर्चा करताना व कारखान्यात फिरतानाचे फोटो प्रसिध्द झाले. जामनगरला भेट देण्यापूर्वी रुबियो यांनी भारत हा तेलशुद्धीकरणातील महाशक्ती असल्याची तारीफ केली. ही सगळी प्रशंसा इतक्यासाठीच चालू होती की, भारताने आणि रिलायन्सने आता व्हेनेझुएला या देशाकडून अधिक तेल खरेदी करावे अशी अमेरिकेची इच्छा आहे. व्हेनेझुएलामध्ये यंदाच्या जानेवारीत अमेरिकेने आपल्या सैनिकांना घुसवून त्या देशाच्या अध्यक्षांना भल्या पहाटे अटक केली आणि अमेरिकेत नेले. आता त्यांच्यावर खटला चालू आहे. व्हेनेझुएलाचे अध्यक्ष हे निकोलास मदुरो हे कम्युनिस्ट व चीनला अनुकूल असल्याने ट्रम्प यांना सलत होते. वास्तविक ते निवडून आलेले अध्यक्ष होते. त्यांच्या भानगडी, भ्रष्टाचार किंवा अत्याचार यांच्याविरुध्द लढायचे असेल तर व्हेनेझुएलातील जनतेचा अधिकार आहे. पण त्यांच्या वतीने ट्रम्प यांना असे परक्या देशाच्या हद्दीत घुसून कारवाई करण्याचे अधिकार नाहीत. पण व्हेनेझुएनलावर ट्रम्प यांचा डोळा होता तो त्याच्याकडच्या तेलासाठी. जगातील सर्वाधिक तेलाच्या साठ्यांपैकी एक त्या देशात आहेत. इराणवर निर्बंध आणल्यापासून चीनने मोठ्या प्रमाणात व्हेनेझुएलातनच तेल खरेदी चालू ठेवली होती. ट्रम्प यांनी लष्करी कारवाई केल्यावर तिथल्या तेल धंद्यावरच कबजा केला आणि आता त्याच्याच मार्केटिंगसाठी ते भारताला वेठीला धरत आहेत.

भारतावरील दबाव

विविध ठिकाणी आढळणाऱ्या क्रूड किंवा कच्च्या तेलाच्या दर्जात फरक असतो. व्हेनेझुएलातील तेल हे जड आणि अधिक फॉस्फरसयुक्त असते. त्यावर प्रक्रिया करून पेट्रोल, डिझेल इत्यादी करण्यासाठी थोडी वेगळी यंत्रणा लागते. अमेरिकेतील तेलशुध्दीकरण प्रकल्पांमध्ये अशा प्रकारची यंत्रणा कमी आहे. तिथे मुख्यतः अरब देशातील व स्वतः अमेरिकेचे तेल शुध्द केले जाते. ते वेगळ्या प्रकारचे आहे. त्यामुळे आता अमेरिका आणि ट्रम्प भारताच्या गळ्यात पडत आहेत. रिलायन्सने व भारताने व्हेनेझुएलाचे अधिकाधिक तेल खरेदी करावे असा त्यांचा दबाव आहे. तसे झाले की दोन गोष्टी होतील. सध्या व्हेनेझुएलातील तेलाला कमी उठाव आहे. तो वाढेल. त्यातून अमेरिकेला पैसे मिळतील. तिथे अधिक खाणी खोदण्यासाठी ते वापरता येतील. दुसरे म्हणजे या अधिकच्या तेलामुळे जगात सध्या तेलाचे भाव वाढले आहेत ते खाली येण्याला मदत होईल. कालच क्रूड तेलाचे भाव ११२ डॉलर प्रतिबॅरल इतके झाले. एक वर्षापूर्वी हेच भाव ७० डॉलर प्रतिबॅरल होते व अगदी अलिकडपर्यंत १०५ वर येऊन थांबले होते. पण आखातातील युध्द थांबण्याचे नाव नाही. अमेरिकेत संसदेच्या मध्यावधी निवडणुका आहेत. ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाचा त्यात पराभव होईल असे सध्याचे चित्र आहे. तसे झाले तर अध्यक्षपदाच्या उरलेल्या कारकीर्दीत ट्रम्प यांनी काहीही निर्णय घेतले तरी संसदेमध्ये विरोधी बहुमत असल्याने त्यांना अडवले जाईल. ट्रम्प यांनी इराणचे युध्द अमेरिकेवर लादले अशी बहुसंख्य अमेरिकी लोकांची भावना आहे. सध्या अमेरिकेत डिझेलचे भाव कडाडले असून एकूणच महागाईही वाढली आहे. यामुळे ट्रम्प यांच्या विरोधात प्रचंड नाराजी आहे. या स्थितीत ट्रम्प यांना इराणवर सध्या तरी हल्ले करणे शक्य नाही. इस्रायलमध्येही निवडणुकांचे वातावरण आहे. याचा फायदा घेऊन इराणने पोसलेल्या हुथी दहशतवाद्यांनी सध्या सौदी अरेबियावर हल्ले सुरू केले आहेत. कालच या हल्ल्यामध्ये एक भारतीय इसम ठार झाला. सौदी हा अमेरिकेचा मित्र. पण ट्रम्प काही या मित्राच्या मदतीला येण्यास तयार नाहीत. जगातील सर्वात मोठी तेल कंपनी असलेल्या सौदीच्या अरामकोच्या तेल शुध्दीकरण प्रकल्पांवर आणि कार्यालयांवरही बॉंबहल्ले झाले आहेत. यामुळे तेलाचे उत्पादन थांबले आहे. त्याचा परिणाम म्हणून जगभरात तेलाचे भाव वाढले आहेत.

..आणि हरदीप पुरींचा फोटो

याचा परिणाम म्हणून भारताच्या तेल आयातीचे बिल प्रचंड वाढले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा तेल आयातीवर तब्बल ४७ टक्के अधिक खर्च झाल्याची आकडेवारी नुकतीच प्रसिध्द झाली आहे. हा आकडा आणखीनच वाढत जाणार आहे. सध्या तेलाचे भाव ११२ असले तरी ते १२५ च्या पलिकडे जातील असा वेळी जाणकारांचा इशारा आहे. या स्थितीत खरे तर ज्यांच्याकडून स्वस्तात मिळेल तेथून तेल घेण्याचे स्वातंत्र्य भारताला असले पाहिजे. पण ट्रम्पला ते मंजूर नाही. यापूर्वी रशियाकडून तेल खरेदी करू नये असे फर्मान त्यांनी काढले होते. लगेच आपण त्याची अंमलबजावणी केली. त्याच वेळी चीनने मात्र हे तेल घेणे चालूच ठेवले हे लक्षात ठेवायला हवे. याउलट राष्ट्रभक्तीच्या गप्पा मारणाऱ्या व विरोधकांना परकीय तालावर नाचत असल्याचा आरोप करणाऱ्या मोदींनी मात्र गपगुमान ट्रम्प यांची मागणी मान्य केली. रशियाकडचे तेल घेणे कमी झाले. आता डिझेलचे भाव वाढल्यावर खुद्द ट्रम्प यांनीच रशियाकडून तेल खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे मग लाजेकाजेस्तव भारतावरचेही याबाबतचे निर्बंध हटवण्यात आले आहेत. भारतावर लागू केलेले १०० टक्के आयातशुल्क स्थगित होईल अशी घोषणा नुकतीच झाली. पण तेही केवळ दोन महिन्यांसाठी स्थगित असेल असा खुलासा करण्यात आला. वास्तविक रशिया असो की व्हेनेझुएला यांच्याकडून पूर्वी आपल्या गरजेच्या हिशेबात आपण हवे तसे तेल घेत होतोच. सार्वभौम राष्ट्र म्हणून कोणाकडून किती व कधी तेल घ्यायचे हे ठरवण्याचा अधिकार आपलाच असायला हवा. पण ट्रम्प हा अधिकार मानायला तयार नाहीत. आणि वाईट गोष्ट अशी की, ट्रम्प यांच्या या मनमानीला आव्हान देण्याला मोदी तयार नाहीत. तशी हिंमत आजतागायत त्यांनी दाखवलेली नाही. रुबियो दिल्लीत न येता परस्पर जामनगरला जातात आणि आदेशवजा सूचना करतात हे सर्वच अपमानास्पद आहे. पण विरोधकांच्या आंदोलनामागचे परकीय हात शोधणाऱ्या मोदी सरकारला हे लाजिरवाणे आहे असे वाटत नाही. कहर म्हणजे लहान मुलींना वेश्या म्हणून पुरवणाऱ्या एपस्टिन नावाच्या नराधमासोबत आपले तेलमंत्री हरदीपसिंग पुरी यांच्या भेटीचे छायाचित्र अमेरिकेने नेमके याच काळात प्रसिध्द केले. भारताची आणि कदाचित मोदींच शेंडी आपल्या हातात आहे असे सांगण्याचे हा प्रयत्न आहे. हे छायाचित्र खरे असेल तर मोदींच्या भारताचे काही खरे नाही असे म्हणावे लागेल.

विचार

निवडणूक आयोग आणि राजकीय पक्ष

निवडणूक आयोगाच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करणे पारदर्शकतेच्या दृष्टीने आवश्यक आहे; पण संस्थेची विश्वासार्हता नष्ट करणारे आरोप करणे योग्य नाही. सध्या विरोधी पक्ष आयोगाविरोधात आंदोलने करत आहेत. सर्वोच्च न्यायालयाने बिहारमधील 'एसआयआर' प्रक्रिया वैधानिक ठरवली आहे. त्यामुळे या वादाचा निकाल रस्त्यावरच्या घोषणांपेक्षा संविधान आणि न्यायव्यवस्थेच्या कसोटीवर लागणे अधिक महत्त्वाचे आहे.

लोकशाहीमध्ये निवडणूक हा केवळ मतदानाचा एक दिवस नसतो. मतदार यादी तयार होण्यापासून मतमोजणीपर्यंतची प्रत्येक प्रक्रिया लोकशाहीच्या विश्वासाशी जोडलेली असते. म्हणूनच निवडणूक आयोगाच्या कामकाजावर राजकीय पक्षांनी उपस्थित केलेले प्रश्न ऐकले गेले पाहिजेत; पण त्याचबरोबर आयोगावर आरोप करणाऱ्यांनीही पुरावे, कागदपत्रे आणि घटनात्मक प्रक्रियेचा आधार घेतला पाहिजे. सध्या निर्माण झालेला निवडणूक आयोगाबाबतचा वाद नेमका याच सीमारेषेवर उभा आहे. भारतीय संविधानाच्या कलम ३२४ नुसार निवडणुकांचे अधीक्षण, निर्देशन आणि नियंत्रण निवडणूक आयोगाकडे आहे, म्हणजेच आयोगाला निवडणूक प्रक्रियेबाबत व्यापक घटनात्मक अधिकार दिले आहेत. आयोग ही सरकारच्या एखाद्या खात्याप्रमाणे रोजच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली काम करणारी संस्था नाही. त्यामुळे सत्ताधारी असो वा विरोधक; कोणत्याही पक्षाला आयोगाच्या निर्णयावर नाराजी व्यक्त करण्याचा अधिकार असला, तरी आयोगाच्या स्वायत्ततेचे भान ठेवणे ही त्यांचीही घटनात्मक जबाबदारी आहे. सध्याच्या वादाचे केंद्र आहे, मतदारयादीचे 'स्पेशल इंटेसिव्ह रिव्हीजन'. विरोधी पक्षांच्या मते मतदारयादीच्या पुनरीक्षणाच्या प्रक्रियेत मतदारांची नावे मोठ्या प्रमाणावर वगळली जाण्याचा धोका असून प्रक्रिया पुरेशी पारदर्शक नाही. याउलट सर्व निर्णय कायदेशीर अधिकारांच्या चौकटीत असून संस्थेतील वेगवेगळी मते, निरीक्षणे ही कोणत्याही संस्थेतील चर्चेचा भाग असू शकतात, 'एसआयआर' बाबतचे निर्णय पूर्ण आयोगाच्या मंजुरीने घेतले असल्याचेही आयोगाने म्हटले आहे.

मतदारयादीतील बदलांच्या प्रक्रियेवर प्रश्न उपस्थित झाल्यानंतर आयोगाने आपल्या मतदारयादीच्या सॉफ्टवेअरचे पुनरावलोकन करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यासह स्वतंत्र तज्ज्ञांचा समावेश असलेली समितीही नेमली. म्हणजेच या प्रकरणात दोन बाबी वेगळ्या ठेवाव्या लागतील. एक म्हणजे राजकीय आरोप आणि दुसरी म्हणजे त्या आरोपांची वस्तुनिष्ठ तपासणी. विरोधकांनी आरोप केले म्हणून आपोआप सत्य ठरत नाहीत; त्याचप्रमाणे आयोगाने आरोप फेटाळले, म्हणून प्रश्न संपतही नाहीत. लोकशाहीला दोन्ही बाजूंच्या दाव्यांपेक्षा पुराव्यांची गरज असते. विशेष म्हणजे 'एसआयआर'च्या वैधतेवर यापूर्वी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली आहे. २७ मे २०२६ च्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने बिहारमधील 'एसआयआर' प्रक्रियेला 'रिप्रेझेंटेशन ऑफ द पीपल ॲक्ट, १९५० आणि संविधानातील कलम ३२४ यांच्या चौकटीत वैधानिक आधार असल्याचे मान्य केले. न्यायालयाने आयोगाला मतदारयादीच्या अचूकतेसाठी विशेष पुनरीक्षण करण्याचा अधिकार असल्याचे स्पष्ट केले. त्याच वेळी प्रक्रियात्मक संरक्षण आणि नागरिकांना उपलब्ध असलेल्या दाद मागण्याच्या मार्गांवरही भर देण्यात आला. या पार्श्वभूमीवर एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो, तो म्हणजे आयोग चुकीचा कारभार करत असल्याचा एखाद्या पक्षाचा दावा असेल, तर रस्त्यावर उतरणे हा पहिला मार्ग असावा का? याचे उत्तर सरळ 'हो' किंवा 'नाही' असे देता येणार नाही.

शिवाजी कराळे

आंदोलन हा लोकशाहीतील वैध मार्ग आहे. शांततापूर्ण निदर्शने करणे, जनमत तयार करणे, सरकार आणि घटनात्मक संस्थांवर सार्वजनिक दबाव आणणे हा नागरिकांचा आणि राजकीय पक्षांचा अधिकार आहे. त्यामुळे आयोगाविरोधात आंदोलन झाले म्हणून ते आपोआप चुकीचे ठरत नाही; पण एखाद्या निर्णयाच्या वैधतेचा प्रश्न उपस्थित केला जातो, तेव्हा न्यायालयीन मार्गाचा वापर करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. मतदार यादीबाबत नागरिकांना आणि राजकीय पक्षांना दावा-हरकत नोंदवण्याची प्रक्रिया उपलब्ध आहे. बूथ लेव्हल एजंटच्या माध्यमातून राजकीय पक्ष मतदार यादी तपासू शकतात. नाव वगळल्यास संबंधित प्रशासकीय आणि अपीलीय यंत्रणांकडे दाद मागता येते. निवडणूक आयोगानेही चुकीची नावे वगळली जाऊ नयेत यासाठी नोटीस, घरभेटी, कारण नोंदवणे, मसुदा मतदारयादी प्रसिद्ध करणे आणि दावे-हरकतींची संधी अशा प्रक्रियात्मक संरक्षणांचा उल्लेख केला आहे. त्यापुढे उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाचा दरवाजा खुला आहे. आयोगाचा निर्णय संविधानविरोधी, कायद्याच्या विरोधात किंवा मनमानी असल्याचा दावा असेल तर न्यायालयीन पुनरावलोकन हा घटनात्मक मार्ग आहे. सध्या मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यपद्धतीवर आणि देशव्यापी 'एसआयआर' वर प्रश्न उपस्थित करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने पुढील आठवड्यात ऐकून घेण्याचे मान्य केले आहे. या याचिकेत आयोगाच्या निर्णय प्रक्रियेबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांची न्यायालयीन छाननी होणार आहे. यामुळे सध्याच्या आंदोलनाला आणखी एक महत्त्वाचा संदर्भ मिळतो.

रस्त्यावर आंदोलन आणि न्यायालयीन लढाई हे परस्परविरोधी मार्ग नाहीत. राजकीय पक्ष आंदोलन करू शकतात आणि त्याच वेळी न्यायालयात आपले पुरावे मांडू शकतात; परंतु आंदोलनाच्या राजकीय भाषणात आणि न्यायालयात सादर होणाऱ्या पुराव्यात फरक पडता कामा नये. जनतेसमोर केलेला आरोप जर न्यायालयीन प्रक्रियेत टिकत नसेल, तर त्यातून केवळ राजकीय ध्रुवीकरण वाढते. आयोगासाठीही हा प्रसंग तितकाच कसोटीचा आहे. राजकीय पक्षांनी प्रश्न विचारले, की आयोगाने फक्त 'आम्ही घटनात्मक संस्था आहोत' असे सांगून विषय संपवणे पुरेसे नाही. स्वायत्ततेसोबत पारदर्शकता आणि उत्तरदायित्वही दाखवावे लागते. विशेषतः मतदार यादीसारख्या संवेदनशील विषयात कोणाचे नाव का वगळले, किती नावे वगळली, कोणत्या कारणांवरून वगळली, किती हरकती आल्या आणि त्यापैकी किती मान्य करण्यात आल्या, याची स्पष्ट माहिती सार्वजनिक केली, तर संशयाला मोठ्या प्रमाणावर आळा बसू शकतो. अलीकडच्या वादात आयोगाच्या अंतर्गत निर्णय प्रक्रियेबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत. काही अहवालांमध्ये दोन निवडणूक आयुक्तांनी काही निर्णयांवर आक्षेप घेतल्याचे नमूद झाले आहे. आयोगाने मात्र संबंधित पत्रव्यवहाराचा वेगळा संदर्भ असल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे या दाव्यांपैकी कोणता दावा तथ्याधारित आहे, हे ठरवण्याचे काम राजकीय मंचापेक्षा अधिकृत चौकशी आणि न्यायालयीन परीक्षणाला सोपवणेच योग्य ठरेल. इथे आणखी एक नाजूक मुद्दा आहे. संस्थेवर टीका आणि व्यक्तीवर वैयक्तिक हल्ला यात फरक असला पाहिजे.

आयोगाच्या निर्णयावर कठोर टीका करता येते. निर्णय चुकीचा असल्याचे सांगता येते. प्रक्रिया बदलण्याची मागणी करता येते; पण पुरावा नसताना एखाद्या आयुक्तावर पक्षपातीपणा, संगनमत किंवा हेतुपुरस्सर कारवाईचे आरोप करणे ही चुकीची बाब आहे. अशा आरोपांमुळे केवळ संबंधित व्यक्तीची नव्हे, तर संपूर्ण संस्थेची विश्वासार्हता प्रभावित होते. तितकेच महत्त्वाचे म्हणजे सत्ताधारी पक्षानेही या वादाकडे राजकीय विजय-पराजयाच्या चष्म्यात पाहू नये. आज विरोधक आयोगावर प्रश्न उपस्थित करत आहेत. उद्या परिस्थिती उलटू शकते. निवडणूक आयोगाची विश्वासार्हता ही कोणत्याही एका पक्षाची मालमत्ता नाही. आज आयोगावर विरोधकांचा विश्वास नसेल आणि उद्या सत्ताधाऱ्यांनाही त्याच संस्थेवर प्रश्न उपस्थित करण्याची वेळ आली, तर दोन्ही वेळा लोकशाहीची हानी होते. म्हणूनच सध्याच्या वादात दोन्ही बाजूंनी काही मूलभूत गोष्टी मान्य करणे गरजेचे आहे. राजकीय पक्षांना आयोगावर प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. आयोगावर आपल्या निर्णयांचे स्पष्टीकरण देण्याची जबाबदारी आहे. नागरिकांना आपली मतदार म्हणून नोंद सुरक्षित आहे की नाही, हे जाणून घेण्याचा अधिकार आहे आणि अंतिमतः न्यायालयाला आयोगाच्या निर्णयांची कायदेशीरता तपासण्याचा अधिकार आहे. लोकशाहीमध्ये संस्थांवर अंधविश्वास नको आणि संस्थांवर अंधअविश्वासही नको. आज राजकीय पक्ष रस्त्यावर आहेत. उद्या हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयासमोर असेल. या दोन्ही प्रक्रियांमध्ये जनतेचा एकच प्रश्न असला पाहिजे, मतदारयादी अधिक अचूक, पारदर्शक आणि सर्वसमावेशक कशी होणार?

अंतिमतः संघर्ष निवडणूक आयोग विरुद्ध राजकीय पक्ष असा नसावा. तो मतदाराच्या अधिकाराचे संरक्षण आणि निवडणूक प्रक्रियेवरील सार्वजनिक विश्वास टिकवण्याचा असला पाहिजे. निवडणूक आयोगाची स्वायत्तता टिकली पाहिजे; पण त्याच वेळी आयोगाच्या प्रत्येक निर्णयावर घटनात्मक आणि न्यायालयीन कसोटी लागू होणेही आवश्यक आहे. राजकीय पक्षांनी रस्त्यावर उतरण्याआधी न्यायालयीन आणि प्रशासकीय मार्गांचा पुरेपूर वापर करावा आणि आंदोलन केले, तर पुराव्यांवर आधारित, शांततापूर्ण आणि लोकशाहीच्या चौकटीत असावे. आयोगानेही टीकेला राजकीय हल्ला मानण्याऐवजी त्यातून निर्माण झालेल्या शंकांना अधिकाधिक माहितीच्या माध्यमातून उत्तर द्यावे.

चर्चा आजची

कचरा समस्या सुटणार कधी?



वाढत्या शहरीकरणाबरोबरच कचरा समस्याही त्याच वेगाने वाढत चालली आहे. आज कचऱ्याचे प्रमाण इतके वाढले आहे की, त्याच्या जागेचा प्रश्न निर्माण झाला आहे. कचराभूमीसाठी पुरेशी जागा मिळत नाही, त्यामुळे कचऱ्याचा उठाव वेळेत होत नाही. या वाढत्या कचऱ्यामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याचा धोका वाढल्याने शहराच्या आसपास असलेल्या ग्रामपंचायतींना कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी नियोजन करावे लागणार आहे.

बऱ्याच गावांच्या रस्त्यांच्या कडेला तसेच वेशीवर कचऱ्याचा ढिगारा दिसून येतो. या कचऱ्याच्या दुर्गंधीचा त्रास येणा-जाणाऱ्या नागरिकांना होत असतो. तसेच या कचऱ्यामुळे आरोग्याचा प्रश्नही गंभीर होताना दिसत आहे. बऱ्याचशा गावात घंटागाडीची सोय उपलब्ध नाही. काही गावांमध्ये घंटागाडी येते मात्र ती नियमितपणे येत नाही. परिणामी घरात कचरा तसाच साचून राहतो. आणि मग सकाळी चालायला जाताना किंवा कामावर जाताना बरेचसे नागरिक कचरा रस्त्यात फेकून देतात. त्यामुळे आज आपल्याला सगळीकडे कचरा अस्तव्यस्त विखुरलेला दिसून येत आहे. त्यामुळं सगळीकडे दुर्गंधी पसरलेली आहे. काही वेळा कचरा हा जमिनीत गाडला जातो. पाऊस पडल्यानंतर जमिनीवरच्या पाण्यासोबत तो कचरा देखील मिसळला जातो आणि पाणी दूषित होते. त्यामुळे रोगराई पसरण्याचा मोठा धोका कचऱ्यामुळे निर्माण होतो.

आपण अनेक ठिकाणी 'येथे कचरा टाकू नये' असे सूचना फलक लावलेले दिसतात. तर बरीच ठिकाणी कचरा उघड्यावर नये, यासाठी सीसीटीव्ही कॅमेरे लावलेले असतात. परंतु, हे सर्वच उपाय फोल ठरताना दिसून येतात. फलक लावलेल्या ठिकाणीच मुद्दामहून कचरा टाकलेला दिसून येतो. तर काही ठिकाणचे हे सूचना फलकच त्या कचऱ्याचा ढिगाऱ्याखाली दडून जातात. काही सूचना फलक बेशिस्त नागरिकांकडून काढून टाकले जातात. आणि कचऱ्याची समस्या जैसे थेच राहते.

अंतरा पारंगे

आजच्या कचऱ्याचे वाढते प्रमाण लक्षात घेता प्लास्टिक हा प्रमुख घटक त्यात दिसून येतो. सरकारने प्लास्टिकवर बंदी आणली आहे. मात्र अनेक ठिकाणी प्लास्टिकचा खुलेआम वापर सुरू असल्याचे दिसत आहे. आज प्लास्टिकचा अतिवापर ही गोष्ट कचरा वाढीसाठी कारणीभूत ठरली आहे. जिकडे तिकडे प्लॅस्टिकच्या पिशव्या आपल्याला फेकलेल्या पाहायला मिळतात. प्लास्टिकचे विघटन होण्यास १००-२०० वर्ष लागतात. हे माहित असूनही प्लास्टिकचा वापर सर्रासपणे सुरूच आहे. बाजारात कुठलीही वस्तू खरेदी केली की दुकानदार त्या वस्तू प्लॅस्टिकच्या पिशवीत भरून देतो. तर अशा बऱ्याच वस्तू, अन्नपदार्थ, कपडे आधीच प्लॅस्टिकमध्ये पॅकिंग केलेल्या असतात. हा प्लास्टिक कचरा आपण घरी आणतो. बर बहुतेक जण ओला किंवा सुका कचरा हा वेगवेगळा ठेवत नाही. आपल्या घरगुती कचऱ्यातही प्लास्टिकचे प्रमाण जास्त असते. पूर्वी ग्रामीण भागातील नागरिक कचरा आपल्या शेतात नेऊन टाकायचे किंवा जाळायचे. त्यामुळे शेतजमीनही सुपीक व्हायची. मात्र आता कचऱ्यात प्लास्टिकचे प्रमाण जास्त असल्यामुळे ते जमिनीत कुजत नाही आणि जाळले तर उलट शेतजमीन नापीक होण्याची भीती असते. मग हा कचरा सार्वजनिक, मोकळ्या ठिकाणी किंवा रस्त्याच्या कडेला कुठेतरी टाकला जातो. वाऱ्यामुळे हा कचरा सर्वत्र होतो. तर अन्नाच्या शोधात पक्षी, जनावरे कचरा अस्ताव्यस्त करतात. कचऱ्यातील अन्नपदार्थ खाताना नकळत या प्राण्याच्या पोटात प्लास्टिक जाते. त्यामुळे त्यांचे आरोग्य बिघडते तर बऱ्याचदा ते दगावले जातात. दिवसेंदिवस शहर तसेच ग्रामीण भागातील कचऱ्याची समस्या उग्र होत चालली आहे. कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था नसल्याने कचऱ्याचा उठाव वेळेत होत नाही. साचून राहिलेल्या कचऱ्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. थोडक्यात काय तर कचरा व्यवस्थापनाचे अनेक प्रयत्न होत असले तरी आजही आपण पुरेशा गांभीर्याने त्याकडे पाहत नाही हेच यातून दिसून येते.

नव्या युगाची नागरी विचारसरणी अमलात आणत नाही तोपर्यंत कचरा व्यवस्थापन होऊच शकत नाही. आपण बाजारातून कचरा सफाईचं यंत्र विकत आणू शकतो, पण ते वापरण्याची मानसिकता नसेल तर कचरा आपोआप साफ होत नाही. ती मानसिकता सर्वच पातळीवर विकसित करण्यात आपण कमी पडत आहोत. बदलते हवामान, साथीचे आजार आणि यातच कचऱ्याची समस्या वाढत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. येणाऱ्या काही काळात हा कचऱ्याचा प्रश्न आणखी गंभीर रूप धारण करू शकतो. यासाठी जिल्हा परिषद आणि संबंधित ग्रामपंचायतींना यावर वेळीच पर्याय शोधण्याची गरज आहे.

कचरा व्यवस्थापन नीट होत नसल्याने आज अनेक शहरे, गावं कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली आली आहेत. मुळात निसर्गात कोणताच कचरा नसतो. कचरा हा आपणच करत असतो. आपण आपले घर स्वच्छ ठेवतो; परंतु बाहेरचा परिसर स्वच्छ ठेवायचा आपल्याला विसर पडतो. यासाठी फक्त प्रशासनाला दोष न देता आपण स्वतःहून यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

लोकसंसद

देशाचा सन्मान सर्वोपरी!

जपानमध्ये सुरू असलेल्या आशियाई पॅरा गेम्सदरम्यान भारतीय जलतरणपटू मोहम्मद शम्स आलम शेख याच्यावर हॉटेलमधील महिला कर्मचाऱ्याच्या लैंगिक छळाचा आरोप झाल्याने त्याला भारतात परत पाठविण्यात आल्याची घटना सर्व भारतीयांसाठी अत्यंत लाजीरवाणी आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळालेल्या खेळाडूकडून अशा प्रकारचे वर्तन घडणे ही केवळ वैयक्तिक पातळीवरील चूक नसून देशाच्या प्रतिष्ठेला काळिमा फासणारी बाब आहे. आज भारत सर्वच क्षेत्रांत महासत्ता बनण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. जागतिक शांततेसाठी आशेचा किरण म्हणून जग भारताकडे पाहत असताना, अशा घटनांमुळे देशाची प्रतिमा मलिन होते. देशासाठी अभिमानास्पद कामगिरी करण्याची जबाबदारी असताना देशाला मान खाली घालायला लावणारे कृत्य कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय ठरू शकत नाही. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून आरोप सिद्ध झाल्यास संबंधित खेळाडूवर कठोर कारवाई झालीच पाहिजे. इतकेच नव्हे, तर त्याच्या प्रशिक्षणासाठी आणि खेळासाठी सार्वजनिक निधीतून झालेल्या खर्चाची नियमानुसार वसुली करण्याचाही विचार व्हावा. देशाच्या पैशातून मिळालेल्या संधींचा उपयोग देशाची प्रतिष्ठा उंचावण्यासाठी व्हायला हवा, ती धुळीस मिळवण्यासाठी नव्हे! खेळाडू कितीही प्रतिभावान असला, तरी त्याला कायद्यापेक्षा किंवा नैतिक मूल्यांपेक्षा मोठे मानता कामा नये. देशाचा सन्मान सर्वोपरी आहे. देशाची प्रतिष्ठा धोक्यात आणणाऱ्या कोणालाही केवळ खेळाडू असल्यामुळे सहानुभूती किंवा विशेष सवलत मिळता कामा नये!

– अनिकेत शेटे, पुणे

दिनविशेष

जागतिक पोलिओ दिन

आज २४ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक पोलिओ दिन म्हणून साजरा केला जातो. पोलिओ मुक्तीसाठी मोलाचे योगदान देणारे शास्त्रज्ञ जॉन सॉल्क यांचा आज जन्मदिवस. जॉन सॉल्क आणि त्यांच्या टीमने पोलिओची पहिली लस शोधून काढली म्हणून त्यांचाच जन्मदिन जागतिक पोलिओ दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय जागतिक आरोग्य संघटनेने घेतला. आजच्या दिवसाकडे पोलिओशी दिलेल्या यशस्वी लढ्याचे प्रतीक म्हणून पाहिले जाते. जागतिक आरोग्य संघटनेने १९९८ सालापासून पल्स पोलिओची मोहीम हाती घेतली. जानेवारी व फेब्रुवारी महिन्यातील रविवार पोलिओ रविवार म्हणून साजरा केला जातो. पोलिओ रविवारच्या नंतरच्या आठवड्यात ० ते ५ वयोगतील बालकांना घरोघरी जाऊन पोलिओचा डोस पाजला जातो. त्यासाठी व्यापक प्रमाणावर जनजागृती केली जाते. जागतिक आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शनाखाली आपल्या आरोग्य यंत्रणेने भारतातून पोलिओ मुक्तीसाठी अथक प्रयत्न केले. अमिताभ बच्चन, मोहम्मद कैफ इत्यादी व्यक्तींनीही दूरचित्रवाणीवरून जनजागृती केली. शासन, प्रशासन, आरोग्य यंत्रणा यांच्या अथक प्रयत्नातून आज भारत पोलिओ मुक्त झाला आहे. २७ मार्च २०११ या दिवशी जागतिक आरोग्य संघटनेने भारत पोलिओ मुक्त झाल्याची घोषणा केली. अर्थात सव्वाशे कोटी लोकसंख्या असलेल्या आपल्या देशाला पोलिओ मुक्त करणे ही वाटते तितकी सोपी गोष्ट नव्हती. सुरवातीला तर पालक आपल्या बालकांना पोलिओ डोस देण्यास तयारच होत नसे. आपल्या बालकांना पोलिओ डोस पाजण्यास पालक निरुत्साही होते. लोक घरातून बाहेरच पडत नसत. पालकांचा निरुत्साह असला तरी आरोग्य खात्यातील कर्मचारी हिरमुसले नाही. त्यांनी त्यांचे काम चालूच ठेवले. एखादे व्रत हाती घेतल्या प्रमाणे देशातील आरोग्य कर्मचारी पोलिओ मुक्तीसाठी झटत होते. आरोग्य कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांना लवकरच यश मिळाले. १९९९ साली पोलिओच्या तीन विषाणूंपैकी दुसरा विषाणू नष्ट झाला मात्र पहिल्या आणि तिसऱ्या प्रकारचा विषाणू अजूनही कार्यरत होता. उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, बिहार या राज्यात दूषित पाण्यामुळे जुलाब,उलट्यांचे प्रमाण अधिक असल्याने तिथे तोंडावाटे दिलेली लस उपयुक्त ठरत नव्हती. तेंव्हा वैद्यकीय संशोधकांनी मुरदाबाद या गावात पोलिओची एक गुणी लस म्हणजे १,२,३ विषाणूंची लस वेगवेगळी प्रत्येक जन्मलेल्या बाळास दिली. मात्र देशातील सगळ्या बालकांपर्यंत असा कार्यक्रम पोहचवणे अशक्य होते. त्यानंतर पुन्हा त्यात संशोधन करण्यात आले. सर्वांना उपयुक्त अशा लसीची मात्रा तयार झाल्यानंतर देशात पोलिओ मुक्तीची मोहीम वेगाने राबवण्यात आली. त्याचा परिणाम म्हणजे आज पोलिओमुक्त मुक्त भारत



अशी आपली ओळख बनली आहे. भारत जरी पोलिओमुक्त झाला असला तरी जगातून पोलिओचे अजूनही समूळ उच्चाटन झाले नाही. आफ्रिका खंडातील काही देशात तसेच आशिया खंडातील पाकिस्तान, अफगाणिस्तान, सीरिया या देशात अजूनही पोलिओचे रुग्ण आढळून येतात. या देशातूनही पोलिओ लवकरच हद्दपार होईल आणि जग लवकरच पोलिओमुक्त होईल अशी आशा करूया.

– श्याम ठाणेदार

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल

राखेतून उभारणार महामार्ग



● ६.१७ कोटी मेट्रिक टनचा करार

। मुंबई । प्रतिनिधी ।

महाराष्ट्रातील द्रुतगती महामार्गाच्या बांधणीसाठी औष्णिक विद्युत केंद्रांमधून निर्माण होणाऱ्या राखेचा वापर करण्यात येणार आहे. तब्बल ६.१७ कोटी मेट्रिक टन राखेचा वापर करून विदर्भातील प्रमुख महामार्ग उभारण्यात येतील. त्यासाठी महानिर्मिती आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) यांच्यात सामंजस्य करार झाला आहे. ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या उपस्थितीत या करारावर शिक्कामोर्तब झाले. त्यामुळे आता राखेचा वापर पायाभूत सुविधांच्या विकासासाठी होणार आहे.

महानिर्मितीसोबत झालेल्या करारासाठी एमसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड, महानिर्मितीचे संचालक (प्रकल्प) अभय हरणे, कार्यकारी संचालक (पर्यावरण) डॉ. नितीन वाघ, एमएसआरडीसीचे महाव्यवस्थापक (पर्यावरण) नरेंद्र टोके आदी उपस्थित होते. या करारामुळे महानिर्मितीच्या कोराडी, खापरखेडा आणि चंद्रपूर औष्णिक विद्युत केंद्रांमधील राखेचा वापर द्रुतगती महामार्गांसाठी आणि महत्त्वाच्या पायाभूत विकासासाठी करण्यात याईल. या सामंजस्य करारामुळे औष्णिक विद्युत केंद्रांतील जुन्या राखेचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होण्यास मदत होणार असून, दीर्घकालीन राख साठवणुकीशी संबंधित पर्यावरणीय व कार्यान्वयन जोखीम कमी होण्यास हातभार लागणार आहे.

तसेच, राज्यातील पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी राखेच्या शाश्वत वापराची व्यवस्था निर्माण होईल. हा करार ३१ मार्च २०३२ पर्यंत किंवा संबंधित प्रकल्प पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत वैध राहणार आहे. दोन्ही संस्थांच्या सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने कराराची मुदत वाढविता येणार आहे.

या महामार्गांचा समावेश

औष्णिक विद्युत केंद्रातील ६.१७ कोटी मेट्रिक टन राखेचा वापर द्रुतगती महामार्ग बांधण्यासाठी होईल. यामध्ये नागपूर परिसरातील प्रकल्पांसाठी कोराडी किंवा खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातून, तर चंद्रपूर परिसरातील प्रकल्पांसाठी चंद्रपूर केंद्रातून राख उपलब्ध करून दिली जाईल. यामध्ये नागपूर-गोंदिया द्रुतगती मार्गासाठी २.०९ कोटी मेट्रिक टन राख वापरली जाईल. तर भंडारा गडचिरोली द्रुतगती मार्गासाठी १.१४ कोटी मेट्रिक टन, नागपूर-चंद्रपूर द्रुतगती मार्गासाठी २.७९ कोटी मेट्रिक टन, नवेगाव मोरे-सुरजागड खनिज वाहतूक मार्गासाठी ०.१५ कोटी मेट्रिक टन राख वापरण्यात येईल.

स्वतंत्र त्रिपक्षीय करार होणार

प्रकल्पनिहाय राखेचे प्रमाण, उचल वेळापत्रक, राखेचा स्रोत, वाहतूक व्यवस्था आणि आर्थिक साहाय्याच्या अटी निश्चित करण्यासाठी संबंधित औष्णिक विद्युत केंद्र, एमएसआरडीसी आणि अधिकृत कंत्राटदार किंवा संबंधित संस्थेदरम्यान स्वतंत्र त्रिपक्षीय करार करण्यात येणार आहेत.

निवडक



भक्तिमय वातावरणात देवीला निरोप

कोलाड : रोहा तालुक्यातील गोवे येथे श्री शिवशंभू युवा मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेला नवरात्रोत्सव भक्तिमय वातावरणात पार पडला. नऊ दिवस चाललेल्या या उत्सवात धार्मिक कार्यक्रमांसह विविध मनोरंजनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गोवे येथील शिवशंभू युवा मंडळाच्या वतीने दरवर्षी नवरात्रोत्सवाचे आयोजन केले जाते. यंदाही विधिवत घटस्थापना करून देवीची पूजा-अर्चा करण्यात आली. नऊ दिवसांच्या उत्सवात रात्री रास-गरबा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. उत्सवाच्या शेवटच्या तीन दिवसांत फॅन्सी ड्रेस स्पर्धा, संगीत खुर्ची यांसह विविध मनोरंजनात्मक खेळ घेण्यात आले. या उपक्रमांना युवक-युवती, लहान मुले-मुली आणि महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दसऱ्याच्या दिवशी विविध स्पर्धांमध्ये विजयी स्पर्धकांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. बुधवारी (दि.२१) भक्तिमय वातावरणात देवीला निरोप देण्यात आला.

तरुणी बेपत्ता

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतून जिनत बादशाहा शेख (२५) ही तरुणी बेपत्ता झाली आहे. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून तिचा शोध सुरू आहे. जिनत शेख ही वावंजे, ता. पनवेल, येथील रूम क्रमांक १०३ मध्ये राहत असून ती नोकरी करते. तिचा चेहरा उभट, बांधा मध्यम, रंग गोरा, डोळे काळे आणि केस काळे व कुरळे आहेत. तिची उंची सुमारे साडेचार फूट आहे. बेपत्ता होताना तिने लाल रंगाचा टॉप, लेगिन्स आणि पायात गुलाबी रंगाच्या सँडल घातल्या होत्या. तिला हिंदी, मराठी आणि इंग्रजी भाषा बोलता येतात. जिनत शेख हिच्याबाबत कोणाला काही माहिती मिळाल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे तपास अधिकारी पोलीस हवालदार उदय वसंत भगत यांच्याशी ८१०८३३००६० या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.



शेतकऱ्यांनी फळपीक विमा योजनेत सहभागी व्हावे

■ कृषी अधिकारी कार्यालयाचे आवाहन

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

नैसर्गिक आपत्ती, प्रतिकूल हवामान आणि हवामानातील अनिश्चित बदलांमुळे फळपिकांच्या उत्पादनावर होणारा परिणाम लक्षात घेता, शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण मिळावे या उद्देशाने सन २०२६-२७ या वर्षासाठी पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत मुरूड तालुक्यातील पात्र काजू, आंबा, नारळ व सुपारी उत्पादक शेतकऱ्यांनी विमा योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन मुरूड तालुका कृषी अधिकारी नरळे व सहाय्यक कृषी अधिकारी मनोज कदम यांच्या वतीने करण्यात आले आहे.

या योजनेत भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत अधिसूचित फळपिकांसाठी विमा संरक्षण उपलब्ध करून दिले जाते. संबंधित फळपीक, त्याचा विमा कालावधी, विमा संरक्षित रक्कम आणि योजनेच्या अधिकृत अटींनुसार पात्र शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ घेता येऊ शकतो.

उपलब्ध माहितीपत्रकानुसार, काजू व आंबा पिकांसाठी विमा अर्ज भरण्याची अंतिम तारीख ३० नोव्हेंबर २०२६, तर नारळ व सुपारी पिकांसाठी ३१ ऑक्टोबर २०२६ अशी नमूद करण्यात आली आहे. विमा योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी संबंधित कृषी विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधून पात्रता आणि लागू नियमांची खात्री करावी.

अर्जासाठी कागदपत्रे

फळपीक विमा योजनेचा अर्ज भरताना शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रे तयार ठेवावीत. यामध्ये संबंधित फळपिकाची नोंद असलेला अद्ययावत ७/१२ उतारा, शेतकऱ्याचे आधार कार्ड, फार्मर आयडी, संबंधित फळबागेसोबत जिओ-टॅगिंग केलेला छायाचित्र पुरावा, स्वयंघोषणापत्र तसेच आधारशी संलग्न बँक खात्याचे तपशील व बँक पासबुक यांचा समावेश आहे.

उन्हेरे शाळेत कन्यापूजन सोहळा

पाली : रायगड जिल्हा परिषद शाळा उन्हेरे आदिवासी येथे नवरात्री कालावधीच्या औचित्याने शाळेतील विद्यार्थिनींचे कन्यापूजन अत्यंत उत्साहात आणि आनंददायी वातावरणात पार पडले. याप्रसंगी कन्यापूजन करून विद्यार्थिनींना सफरचंद, पेन, वही, पाऊच व इतर शैक्षणिक साहित्याची भेट देण्यात आली.

यावेळी रिओप्लास्ट प्रा. लि. कंपनीचे मॅनेजर सुखविंदर सिंग कोहली उपस्थित होते. त्यांच्यासोबत शिक्षक राम संकाये, शिक्षिका रुपाली अंबिके, हेमा साखरे यांचीही प्रमुख उपस्थिती होती. याचप्रमाणे, पाली पोलीस स्टेशनवरून शाळेला भेट देण्यासाठी आलेल्या पोलीस कॉन्स्टेबल प्रणाली चव्हाण आणि पोलीस कॉन्स्टेबल प्राजक्ता शिंदे या देखील कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होत्या.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या वतीने मुख्याध्यापक राम संकाये यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे शब्दसुमनांनी सहर्ष स्वागत केले. उपक्रमाच्या यशस्वीतेबद्दल पालक व ग्रामस्थांकडून शाळेचे कौतुक केले जात आहे.

कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

● सन्मान सोहळ्यांमुळे समाजहिताची प्रेरणा: योगिता कुटे

। म्हसळा । प्रतिनिधी ।

समाजाच्या जडणघडणीत महिलांचे योगदान अनमोल असून, विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव केल्याने समाजात सकारात्मक विचारांची पेरणी होते. अशा सन्मान सोहळ्यांमुळे इतर महिलांनाही समाजहितासाठी पुढाकार घेण्याची प्रेरणा मिळते, असे प्रतिपादन पोलीस उपअधीक्षक योगिता कुटे यांनी केले.

श्री रविप्रभा मित्र संस्था, रायगड यांच्या सातव्या वर्धापन दिनानिमित्त विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर म्हसळा येथे आयोजित 'नवदुर्गा स्त्री गौरव पुरस्कार २०२६' सोहळ्यात त्या बोलत होत्या. या सोहळ्यात म्हसळा तालुक्यातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करून सामाजिक स्तरावर वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या नऊ कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला.



महिलांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या योगदानाला समाजासमोर आणणे आणि नव्या पिढीसमोर प्रेरणादायी आदर्श उभे करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. पोलीस उपअधीक्षक योगिता कुटे आणि म्हसळा नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्षा राखी करंजे यांच्या हस्ते पुरस्कारार्थी महिलांना सन्मानित करण्यात आले. साडी, सन्मानचिन्ह, कुंकवाचा करंडा, दुर्गामातेची प्रतिमा, पेन आणि पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप होते.

यावेळी योगिता कुटे म्हणाल्या की, अनेक ठिकाणी पदाधिकारी आणि मान्यवर सन्मान स्वीकारताना दिसतात; मात्र श्री रविप्रभा मित्र संस्थेने कोणताही गाजावाजा न करता अत्यंत नम्रतेने आणि आपुलकीने महिलांचा गौरव केला. संस्थेची ही कार्यपद्धती निश्चितच कौतुकास्पद आहे. या पुरस्कारामुळे सन्मानित महिलांसह इतर महिलांनाही सामाजिक कार्यासाठी नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

महिलेचा विनयभंग

पनवेल : वारंवार मेसेज करून महिलेचा छुपा पाठलाग केल्याप्रकरणी अनस सुफियान मुल्ला याच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने खऱ्या आणि बनावट सोशल मीडिया खात्यांचा वापर करून पीडित महिलेला वारंवार संदेश पाठवले. तसेच तिचा छुपा पाठलाग केला. तिच्या मैत्रिणीशी ओळख करून देण्याच्या बहाण्याने आरोपीने संबंधित महिलेबाबत माहिती मिळवण्याचा प्रयत्न करून तिला संदेश पाठवले. या प्रकारामुळे महिलेने पोलिसांत तक्रार दाखल केली.

मद्यपीचा पोलिसांवर हल्ला

■ अंमलदार जखमी
■ आरोपी ताब्यात

। पनवेल । प्रतिनिधी ।

सार्वजनिक ठिकाणी रस्त्यावर बसून मद्यपान करण्यास मज्जाव केल्याचा राग आल्याने एका मद्यपीने कर्तव्यावर असलेल्या पोलिसांशी हुज्जत घालत त्यांच्यावर हल्ला केला. ही घटना खारघर सेक्टर ७ येथे घडली. या हल्ल्यात एक पोलीस अंमलदार जखमी झाला असून, खारघर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे.

डीन डेविड रमेश (२९) असे आरोपीचे नाव आहे. पोलीस नाईक शशिकांत पाटील आणि पोलीस शिपाई चौरे हे खारघर सेक्टर ७ परिसरात गस्तीवर होते. त्यावेळी डीन रमेश रस्त्यावर मद्यपान करत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. पोलिसांनी त्याला मद्यपान करण्यास मज्जाव केला असता, त्याने पोलिसांशी वाद घालत पोलीस नाईक शशिकांत पाटील यांच्यावर हल्ला केला. या घटनेत एक पोलीस अंमलदार जखमी झाला आहे. याप्रकरणी खारघर पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील कारवाई सुरू केली आहे.

आंबोली येथे वनराई बंधाऱ्याची उभारणी

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

पावसाचे पाणी अडवून त्याचा शेतीसाठी उपयोग करण्यासह भूजल पुनर्भरणाला चालना देण्याच्या उद्देशाने तालुका कृषी अधिकारी कार्यालय आणि ग्रामपंचायत आंबोली यांच्या संयुक्त विद्यमाने आंबोली येथे नदीवर वनराई बंधाऱ्याची उभारणी करण्यात आली. सहाय्यक कृषी अधिकारी मनोज कदम यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थांनी उत्स्फूर्तपणे श्रमदान करून या उपक्रमात सहभाग घेतला.

वनराई बंधाऱ्याच्या उभारणी दरम्यान सहाय्यक कृषी अधिकारी मनोज कदम यांनी बांधकामाबाबत आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन केले. यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी शुभम सपकाळ यांच्यासह नितीन गुंड, नरेश वारगे, ओंकार सारले, मुनीक पाटील, अनंत पाटील आणि स्थानिक ग्रामस्थांनी प्रत्यक्ष श्रमदान केले. कृषी विभाग व ग्रामपंचायतीच्या समन्वयातून हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला.



भूजल पुनर्भरण, शेतीला होणार फायदा

वनराई बंधारा ही कमी खर्चात स्थानिक साधनसामग्रीच्या मदतीने पाणी अडविण्याची उपयुक्त जलसंधारण पद्धत आहे. पावसाळ्यात नदी-नाल्यांतून वाहून जाणारे पाणी काही काळ अडविल्यामुळे स्थानिक जलसाठा वाढण्यास मदत होते. भूगर्भीय परिस्थिती अनुकूल असल्यास या पाण्याचे जमिनीत मुरण्याचे प्रमाण वाढून विहिरी आणि बोअरवेलच्या भूजल पुनर्भरणास हातभार लागू शकतो. तसेच परिसरातील शेतीसाठी पाण्याची उपलब्धता सुधारण्यास मदत होऊ शकते.

श्रमदानातून पाणी बचतीचा संदेश

पाण्याचे योग्य नियोजन आणि जलस्रोतांचे संवर्धन ही काळाची गरज आहे. शासकीय यंत्रणा, ग्रामपंचायत आणि ग्रामस्थ यांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास गावपातळीवर जलसंधारणाची कामे प्रभावीपणे राबविता येतात. या उपक्रमामुळे श्रमदानाचे महत्त्व आणि नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संवर्धनाची जाणीव अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे.

हलगर्जीपणा केल्यास विभाग नियंत्रकांवर कारवाई | परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश

बसस्थानकांवरील अस्वच्छता खपवून घेणार नाही!

। मुंबई । प्रतिनिधी ।

एसटी बसस्थानकांवरील प्रसाधनगृहांची स्वच्छता राखण्यात हलगर्जीपणा झाल्यास संबंधित विभाग नियंत्रकांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल. प्रवाशांना स्वच्छ, निरोगी आणि आरोग्यदायी सुविधा उपलब्ध करून देणे ही महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची मूलभूत जबाबदारी आहे. तरी स्वच्छतेच्या बाबतीत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असे निर्देश परिवहन मंत्री तथा महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिले.



एसटी महामंडळाच्या मुख्यालयात आयोजित स्वच्छता आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला महामंडळाचे विभागप्रमुख, प्रादेशिक व्यवस्थापक आणि विभाग नियंत्रक उपस्थित होते.

एसटी महामंडळ प्रवाशांकडून दोन रुपये स्वच्छता अधिभार आकारते. या अधिभाराच्या बदल्यात प्रवाशांना स्वच्छतेच्या किमान सुविधा उपलब्ध होणे अपेक्षित आहे. त्यामुळे बसस्थानकांवरील प्रसाधनगृहे स्वच्छ ठेवणे आणि प्रवाशांच्या आरोग्याची काळजी घेणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे, असे परिवहन मंत्री सरनाईक यांनी सांगितले. बसस्थानकांवरील प्रसाधनगृहांमध्ये स्वच्छतेच्या कामात कोणत्याही प्रकारची कुचराई होता कामा नये. प्रवाशांच्या रास्त अपेक्षा पूर्ण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी अधिक दक्षतेने काम करावे, असे निर्देशही त्यांनी दिले.

प्रसाधनगृहांची तपासणी बंधनकारक

बसस्थानकांवरील प्रसाधनगृहांची नियमित तपासणी करावी, स्वच्छतेच्या कामावर सातत्याने लक्ष ठेवावे आणि संबंधित कंत्राटदार संस्थांकडून करारातील अटींनुसार स्वच्छता करून घ्यावी, असे निर्देश परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिले. तसेच, स्वच्छतेची जबाबदारी केवळ कंत्राटदारांवर सोपवून चालणार नाही. आपल्या कार्यक्षेत्रातील बसस्थानकांवर नियमित स्वच्छता राखली जात आहे की नाही, याची खातरजमा संबंधित अधिकाऱ्यांनी स्वतः करणे आवश्यक आहे. प्रवाशांना स्वच्छ सुविधा उपलब्ध करून देण्यात कसूर झाल्यास संबंधित विभाग नियंत्रकांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

'दर्जेदार सुविधा द्या'

एसटी ही सर्वसामान्य जनतेच्या दैनंदिन प्रवासाचा महत्वाचा आधार आहे. त्यामुळे सुरक्षित आणि सुखकर प्रवासासोबतच स्वच्छ बसस्थानके व आरोग्यदायी सुविधा उपलब्ध करून देण्यास महामंडळाने प्राधान्य द्यावे. प्रवाशांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी प्रशासनाने अधिक संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने काम करावे, असे आवाहन मंत्री सरनाईक यांनी केले.

जाहीर नोटीस

सर्व संबंधितास या जाहिर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, माझ्या आशिलांनी खाली परिशिष्टमध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीसंदर्भात जमिन मिळकतीचे विद्यमान मालक १) मजीद सितमया दळवी, २) मुफत हुनमियाँ दळवी व ३) कै. शहनाज निसार डबीर मयत तर्फे वारस १. निसार डबीर (पती) २.ताज्जमुल निसार डबीर (मुलगा) ३.मुवीन निसार डबीर (मुलगा) ४. तब्बसुम निसार डबीर (मुलगी) यांचा अविभक्त हिस्सा विकत घेण्याचे ठरविले आहे. त्यानुसार बोलणी पुर्ण होवून उक्त मालकांनी दिनांक २५/०३/२०१४ रोजी माझ्या आशिलांचे वडील कै.आयुब इस्माईल नाईक यांच्या सोबत साठेकरार करून दिला असून, दिनांक ०२/०५/२०१८ नोंदणीकृत झालेला आहे. माझे आशिल हे कै. आयुब इस्माईल नाईक यांचे कायदेशीर वारस असून, उक्त साठेकरारानुसार त्यांचे हक्क माझ्या अशिलांना प्राप्त झालेले आहेत.

तसेच सदर व्यवहार पुर्ण करण्याकरिता उक्त मालकांनी दिनांक २५/०३/२०१४ रोजी कधीही रद्द न होणारे कुलमुखत्यारपत्र नोंदणीकृत दस्त क्रमांक २१६/२०१४ माझ्या आशिलांचे वडील कै.आयुब इस्माईल नाईक यांच्या सोबत लाभांत करून दिलेले आहे. उक्त साठेकरार व कुलमुखत्यारपत्र हे दोन्ही दस्त आजपर्यंत कोणत्याही प्रकारे रद्द, रद्दबातल व रद्द करण्यात आलेले नसून ते पूर्णत: अस्तित्वात असून संबंधितांवर बंधनकारक आहेत.

सबब, उक्त मालक, त्यांचे वारस किंवा त्यांच्या वतीने अन्य कोणीही सदर मिळकतीचा अथवा तिच्यातील कोणत्याही हिश्श्याचा विक्री, गहाण, बक्षीस, भाडेपट्टा, अदलाबदल, विकसन करार, कुलमुखत्यारपत्र अथवा अन्य कोणत्याही प्रकारे व्यवहार हस्तांतरण किंवा बोजा निर्माण करू नये, तसेच कोणीही अशा प्रकारचा व्यवहार करू नये. माझ्या आशिलांना अंधारात ठेवून त्रयस्थ व्यक्तींसोबत असा कोणताही व्यवहार झाल्यास तो माझ्या आशिलांवर बंधनकारक व माझे आशिलांच्या हक्कावर बाधा आणणारा असणार नाही.

माझ्या आशिलांनी साठेकराराची विशिष्ट पुर्तता, मनाई हुकुम तसेच अन्य सर्व कायदेशीर हक्क व उपाय राखून ठेवले असून, वरीलप्रमाणे उल्लंघन झाल्यास संबंधितांविरूद्ध योग्य ती दिवाणी व फौजदारी कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

तसेच सदर मिळकतीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, दावा, हरकत किंवा बोजा असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत आपल्या हक्कांच्या पुराव्यादाखल कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह लेखी स्वरूपात कळवावे. मुदतीनंतर आलेल्या हरकतीची दखल घेतली जाणार नाही.

जमिन मिळकतीचे परिशिष्ट

मौजे	स.नं.	क्षेत्र (हे. आर)	आकार (रू.पै)
सुरई ता.मुरूड	९	०-२०-८	३.५७

सदर मिळकतीमधील मालकांचा अविभक्त हिस्सा या नोटीसचा विषय आहे.

अलिबाग
दिनांक : /१०/२०२६

अॅड. प्रशांत रामचंद्र म्हात्रे
जिल्हा न्यायालय
अलिबाग, रायगड

अलिबाग नगरपरिषद ता. अलिबाग, जि. रायगड
फेर ई-निविदा सूचना क्रमांक (११)
सन २०२६-२७ (चौथी वेळ)
अमृत २.० अभियान

अलिबाग नगरपरिषद जिल्हा रायगड मुख्याधिकारी अलिबाग नगरपरिषद यांचेकडून बांधकाम विभाग अंतर्गत योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ब-१ नमुन्यातील अलिबाग नगरपरिषद हद्दीतील मॅन्ग्रोव्ह परिसराचे पुनरूज्जीवन, विकास व सुशोभिकरण करणे या कामाकरीता फेर ई-निविदा प्रणालीद्वारे दिनांक २४/१०/२०२६ ते ०२/११/२०२६ पर्यंत मागवित आहेत.

टिप- वरील निविदेमध्ये (०१) कामे समाविष्ट असून कामाची संपूर्ण माहिती खालीलप्रमाणे संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

https://www.mahatenders.gov.in

स्वा/-
मुख्याधिकारी
अलिबाग नगरपरिषद जि. रायगड

जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे भुते, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत, मिळकतीचे विद्यमान श्रीमती रिमा स्वप्नील माळी यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट क्रमांक व उपविभाग	क्षेत्र हे. आर	आकार रु. पैसे
भुते ता. अलिबाग जि. रायगड	२३/७/क	क्षेत्र ०.२८.०० पो.ख. ०.१२.०० एकूण ०.४०.००	०.४५

वर नमुद मिळकतीपैकी विद्यमान मालकांच्या मालकीचे क्षेत्र ०.१४.०० हे.आर, पो.ख. ०.०६.०० हे.आर, एकूण क्षेत्र ०.२०.०० हे. आर, आकार ०.२३ रू.पैसे

तरी वरील मिळकतींच्या संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे अॅडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकती निर्वेध व विनजोखमी आहे. असे समजून आमचे अशिल सदर मिळकतींचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : २४/१०/२०२६

अॅड. विजय अनंत पेढवी
श्रीकृपा, मु.नांदाईपाडा, पो. झिराड,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मो.नं. ९८२२१८६७४०

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे कोंदिवडे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे मालक श्यामराव भिकोबा ढमाले यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्रफळ हे. आर.	आकार रु. पै.
४५	२/अ/१	१-०८-८०	९-९४

सबब सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकाबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २४/१०/२०२६

ॲड.सी.बी.ओसवाल
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड -४१०२०१.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे कडाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे मालक नीता नरेंद्र भावसार यांचेकडून विकत घेणेचे ठरविले आहे.

सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्रफळ हे. आर.	आकार रु. पै.
२९	४/अ/६	०-५७-००	६-२२

सबब सदर मिळकतीच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, ताबेकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.


वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतीचे मालकाबरोबर पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २४/१०/२०२६

ॲड.सी.बी.ओसवाल
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर-निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड -४१०२०१.

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्या दागिने- ..., ... बांगड्या, बाजुबंद. ...टीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांचे सुचनेनुसार मी खाली नमूद केलेल्या (सदर मिळकती) मिळकतीचे विद्यमान मालक यांचा मालकी हक्क हितसंबंध निर्वेध असल्याबाबत तपास/खात्री करणेची प्रक्रीया चालु केली आहे. माझे अशिलांनी विद्यमान मालकांकडुन सदर मिळकत खरेदी घेण्याचे ठरवले आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे चिंचवली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील

मालकाचे नाव	भूमापन व उपविभाग क्रमांक	क्षेत्र	आकार रू. पै.
श्री. राजाराम लक्ष्मण गावंड	१७/१/अ	०१-१३-०० हे.आर.चौ.मी. (शेती मिळकत)	१८.०९
श्री प्रविण प्रभाकर गावंड	१७/१/ब	५४-३०-०० आर.चौ.मी. (बिनशेती मिळकत)	५४३

वर नमूद सदर मिळकतींमध्ये कुठल्याही व्यक्ती/व्यक्तींचा, कंपनीचा, मर्यादित दायित्व भागिदारी संस्था, भागिदारी संस्था, वित्तीय महामंडळ, बिगर बँकींग वित्तीय महामंडळ, पतसंस्था इत्यादी कोणाचाही हिस्सा, दावा, हरकत, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, परस्पर सामंजस्याचा करार, करार, हुकुम नामा, वारसाहक्क, अदलाबदल दस्त, हक्कसोड पत्र, कौटुंबिक व्यवस्था, बोजा, हरवलेल्या दस्तांमार्फत, ताबा कब्जा दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा कोणत्याही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांच्या प्रमाणित सत्यप्रतींसह पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- २४/१०/२०२६

ॲड. रविंद्र वि. ओक
'गुरूकृपा'', अलिबाग
अर्बन बँकेशेजारी, महर्षी कर्वे
रोड, मु.पो.ता.अलिबाग,
जि. रायगड.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे किहीम, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. प्रकाश सूर्यकांत लिंबळे व २) श्री. राजेंद्र गोविंद नार्वेकर यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	सर्व्हे नं.	क्षेत्र (हे. आर)	आकार (रु. पै.)
किहीम	२९२	०-४१-६०	९.४०
		पो.ख. ०-११-४०	
		०-५३-००	

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क- हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २४/१०/२०२६

सही/-
ॲड. गणेश गोविंद पाटील
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा सोसायटी,
यूनियन बँकेसमोर, ब्राह्मण आळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे वाघोडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. लालचंद गंगाधर पाटील यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	सर्व्हे नं.	क्षेत्र (हे. आर)	आकार (रु. पै.)
वाघोडे	१८/१/ब/३	१-४६-००	२.३१
		पो.ख. ०-२९-००	
		१-७५-००	

पैकी दक्षिण दिशेकडील ० हे. ७९ आर एवढे क्षेत्र (सदर मिळकत)

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्कांची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, रस्त्याच्या वहिवाटीचा निरंतर हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क- हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख : २४/१०/२०२६

सही/-
ॲड. गणेश गोविंद पाटील
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा सोसायटी,
यूनियन बँकेसमोर, ब्राह्मण आळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे लोणारे, ता.अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णनाची जिरायत जमिन मिळकत ही कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून व त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व कब्जेदार श्री.दिलीप अनंत घरत, अशोक अनंत घरत, शशिकांत अनंत घरत सर्व रा.लोणारे व माझे अशिलांच्या दरम्यान झालेली आहे.

संदर्भित मिळकत ही पूर्णतः निर्वेध, बोजाविरहीत व बिनजोखमी असल्याबाबचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालक व कब्जेदाराने माझ्या अशिलांना दिला आहे. या उपरही सदर मिळकतीत अन्य कोणाच्याही कसल्याही तऱ्हेने हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास तसेच गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, वहिवाटहक्क, फरोक्तखत, असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या कालावधीत लेखी पुराव्यानिशी माझी खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल निम्नलिखीत मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
लोणारे ता.अलिबाग जि.रायगड	३०/२	०-०७-४० ०-०२-०० (वरकस) ०-०९-४० एकूण	०.३१

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २३/१०/२०२६

ॲड.सुधाकर पी.प्रभू
प्रभू निवास, शेषनाथ
वाडेकर रोड, अलिबाग, जि.रायगड
मो नं.९८२२७९६८३०

जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी खाली नमूद केलेली शेतजमिन मिळकत जमिन मिळकतीचे मालक श्री. चेतन वेलजी देधीया यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेण्याचे निश्चित केले आहे.

गावाचे नाव	भुमापन क्र. व उपविभाग	क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी	आकार रू . पै.
मौजे भालीवडी, ता. कर्जत, जि. रायगड	४१/१	०.८६.२० यापैकी २० गुंठे क्षेत्र	४.४४

वरील वर्णनाच्या शेत जमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबधीत व्यक्ति किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरूपात खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ०७ दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही असे समजून विक्रीचा व्यवहार पुर्ण केला जाईल याची नोंद घ्यावी.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : २४/१०/२०२६

ॲड. उमेश आनंद भगत
अधिवक्ता
मु. पो. चिंचवळी ता. कर्जत
जि. रायगड
मो. नं. ९०४९४८६८०५

जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी दिलेल्या माहिती व सुचनेवरून सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. विश्वनाथ गणपत थळे, रा. फुफादेवीपाडा, सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांचा मौजे फुफादेवीपाडा, ता. अलिबाग सर्व्हे नं.६/२/२, क्षेत्र ०-०७-४३ हे. आर, आकार १-५६ रु. पैसे या मिळकतीमध्ये अविभाज्य हिस्सा असून सदर मिळकतीमध्ये त्यांचा गणेश धर्माजी थळे यांने तीन व्यापारी गाळे आमचे अशिलांचे मदतीने बांधलेले असून त्यांचा ग्रामपंचायत घर क्र. १०९९ अ १०९९ ब व १०९९ क असा असून सदरचे गाळे परस्पर गणेश धर्माजी थळे यांनी त्रयस्थ ईसमांस विकणेस काढलेले आहेत असे आमचे अशिलांस खात्रीलायकरित्या समजलेले आहे. सदर गाळ्यामध्ये आमचे अशिलांचा अविभाज्य हिस्सा आहे. हि परिस्थिती लक्षात घेवून कोणीही सदर मिळकतीबाबत कोणताही खरेदी विक्री वा अन्य व्यवहार गणेश धर्माजी थळे यांस बरोबर करु नये त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे. असा कोणताही व्यवहार कोणीही केल्यास तो व्यक्ती सदर गाळ्याचा प्रामाणिक खरेदीदार होणार नाही व भविष्यातील कोर्ट कचेरी सदर व्यक्ती जबाबदार राहील. हे कळावे.

अलिबाग,
दि. २३-१०-२०२६

सही/-
ॲड. आर. बी. कोसमकर
चिरायु, ब्राम्हण आळी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड

रायगड जिल्हा परिषद, अलिबाग
निविदा सूचना क्रमांक ९ (२०२६-२७)
(दुसरा पुकार)

मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग हे खाली नमूद केलेली वाहने आहे त्या स्थितीत निविदा मागवून विक्री करणेसाठी मोहोरबंद निविदा दि. २३/१०/२०२६ ते दि. ३०/१०/२०२६ दुपारी ३.०० वाजेपर्यंत मागविण्यात येत आहेत.

कोरे निविदा फॉर्म (नियम व अटी आणि शेड्यूल बी सह) रक्कम १०००/- भरून दि. २३/१०/२०२६ ते दि. २८/१०/२०२६ पर्यंत सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत सामान्य प्रशासन विभाग, रायगड जिल्हा परिषद, कुंटेबाग, अलिबाग येथून उपलब्ध होतील.

निश्चित केलेल्या उच्चतम किंमतीच्या (अपसेट प्राईज) च्या आधारावर संबंधित निविदा धारकाने सादर केलेली रक्कम वाहनांची अंतिम किंमत निश्चित करणेत येईल.

अ. क्र.	वाहनाचा प्रकार	वाहनाचा क्रमांक	वाहन निरिक्षणासाठी ठेवण्यात आलेले ठिकाण	इसारा रक्कम
१	२	३	४	५
१	मारूती ब्रेझा	MH०६BU८९७८	पंचायत समिती, पोलादपूर	२०००/-
२	टाटा टिगोर	MH०६BU६०२७	कुंटेबाग, अलिबाग	२०००/-
३	टाटा टिगोर	MH०६BU६०२९	कुंटेबाग, अलिबाग	२०००/-
४	टाटा टिगोर	MH०६BU६०३१	कुंटेबाग, अलिबाग	२०००/-
५	टाटा टिगोर	MH०६BU६०२८	कुंटेबाग, अलिबाग	२०००/-

कोणतेही कारण न देता एक वा सर्वच निविदा नाकारण्याचा अधिकार खालील सही करणार यांना राखून ठेवण्यात आलेला आहे.

सही/-
नेहा भोसले (भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
रायगड जिल्हा परिषद अलिबाग

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे लोणारे ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जिरायत जमिन मिळकत ही कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून व त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व कब्जेदार १.वत्सला वसंत घरत २.निवास वसंत घरत ३.प्रणिता प्रशांत म्हात्रे ४.स्नेहल सुबोध माळी ५.संजीवनी संजय पाटील ६.जान्हवी जयेंद्र नाईक ७.नंदा रघुनाथ घरत ८.मनिषा मुरलीधर तुर्वाटकर ९.संतोष रघुनाथ घरत १०.अविनाश रघुनाथ घरत ११.कल्पना किशोर पाटील १२.ललिता सुरेश दुबळा १३.कांचना काशिनाथ घरत १४.निलेश काशिनाथ घरत १५.सायली सुनिल नाईक, १६. समृद्धी दिलीप म्हात्रे १७.निता भरत कवळे १८.आशा अनंत घरत, सर्व रा.लोणारे व माझे अशिलांच्या दरम्यान झालेली आहे.

संदर्भित मिळकत ही पूर्णतः निर्वेध, बोजाविरहीत व बिनजोखमी असल्याबाबचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालक व कब्जेदाराने माझ्या अशिलांना दिला आहे. या उपरही सदर मिळकतीत अन्य कोणाच्याही कसल्याही तऱ्हेने हक्क, अधिकार व हितसंबंध असल्यास तसेच गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, वहिवाटहक्क, फरोक्तखत, असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या कालावधीत लेखी पुराव्यानिशी माझी खात्री पटवून द्यावी.

विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल निम्नलिखीत मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन

मौजे	भूमापन क्र व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
लोणारे ता.अलिबाग जि.रायगड	३०/१/इ	०-१७-७० ०-००-५० (पो.ख.) ०-१८-२० एकूण	४.३१

ठिकाण : अलिबाग
दिनांक : २३/१०/२०२६

ॲड.सुधाकर पी.प्रभू
प्रभू निवास, शेषनाथ
वाडेकर रोड, अलिबाग, जि.रायगड
मो नं.९८२२७९६८३०

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली शेती मिळकत सदर मिळकतीचे मालक कै. विमला सुहास बांदेकर यांचे वारस पूजा सुहास बांदेकर, स्नेहल सुहास बांदेकर, पालकन आशिष बदलनी आणि सुहास काशिनाथ बांदेकर यांचेकडून खरेदी घेण्याचे निश्चित केले आहे. वर नमूद व्यक्तींनी मिळकतीवरील त्यांचे मालकी हक्क, हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा आमचे अशिलांना दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे कोळगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील

भूमापन	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकारणी रू.पै.
५५/१	००-२१-००	२.८७
५६	००-०२-५०	००.४१

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही वारसाहक्क, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, हे सर्वास कळावे.

दिनांक : २३/१०/२०२६

ॲड. रविंद्र वि. ओक
'गुरूकृपा', अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे कोठींबे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत तिचे मालक श्री. परश्या सित्या कातकरी (मुकणे) यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्रफळ (हे. आर)	आकार (रू. पै.)
१४	१/अ/२/क	०-८७-००	०=६५

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त चार्ज लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २३/१०/२०२६

ॲड. महेश मोतीराम घारे
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे खार पेढांबे, ता. अलिबाग येथील खालील वर्णनाची मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. गुरुनाथ काशिनाथ पाटील यांच्याकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	गट नं.	क्षेत्र (हे. आर.)	आकार (रु. पै.)
खार पेढांबे	८४	०-४१-००	५.१९
		पो. ख. ०-०४-५०	
		०-४५-५०	

सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष तावेकब्जाची असून ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमचे अशिलांस दिला आहे. मात्र, तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन, कुळ हक्क, ताबा, जाणे-येणेचा मार्ग या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास वर नमुद मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे, असे गृहित धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वास कळावे.

अलिबाग
ता. २४/१०/२०२६

ॲड. विधान अरविंद पाटील
रा. वत्सला, टिळक रोड, स्टेट बँकेसमोर,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं.९४२२३७५११५

जाहीर सूचना

तमाम जनतेस सदर नोटिसीद्वारे कळविण्यात येते कि, माझ्या अशिलांच्या सूचनेवरून, आम्ही १) शैलेश पांडुरंग चव्हाण, २) रामप्रसाद नंदलाल जायस्वाल, ३) शरद मोहन पंडित यांच्या खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या स्थावर मिळकतीबाबत हक्क व अधिकारांची चौकशी आणि पडताळणी करीत आहे.

खालील नमूद केलेल्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा अथवा कोणत्याही बँक आणि किंवा वित्तीय संस्था आणि किंवा प्राधिकरण यांचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठेकरार, विक्री, हस्तांतरण, अदलाबदल, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, अभिहस्तांतरण, वाटप, पोटगी, मृत्यूपत्र अखत्यारपत्र, बोजा, लिन, एकाधिकार, करार, हक्कसोड, वारसा, उत्तराधिकार, सुविधाधिकार, न्यास, कुळाने भाडे व पोट-भाडेदारी, भोगवटा, कब्जा, कुटुंब व्यवस्था/तडजोड, कोणत्याही न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश, करार/करारनामे, भागिदारी, विकास अधिकार, प्रकल्प व्यवस्थापन करारनामा, विकास व्यवस्थापन करारनामा, हक्कविलेख दस्तऐवज अनामत करण्याचे ज्ञापन, किंवा अन्य काही असेल तर त्याद्वारे कोणत्याही स्वरूपाचे कोणतेही दावे, आक्षेप, अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, शेअर आणि किंवा मागणी असेल तर त्यांनी निम्नस्वाक्षरीकर्त्यांना या जाहीर सुचनेच्या जाहिरातीच्या तारखेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत त्याच्या दस्ताऐवजी पुराव्यासह लेखी स्वरूपामध्ये ज्ञात होण्यासाठी कळविणे आवश्यक आहे. अन्यथा माझे अशिल सदर मालमत्तेमधील असे अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, दावा, शेअर आणि/किंवा मागणी यांचा अधित्याग, परित्याग, अधित्यजन आणि/किंवा परीत्यजन करण्यात आल्याचे आणि/किंवा सोडून देण्यात आल्याचे गृहीत धरून मालमत्तेच्या प्रस्तावित खरेदीची कार्यवाही करतील आणि सदर मालमत्तेच्या संबंधातील अधिकार, हक्क, लाभ, हितसंबंध, दावा, शेअर आणि/ किंवा मागणी अस्तित्वात नसल्याचे मानण्यात येईल.

यात यावर संदर्भित केलेले परिशिष्ट
(मिळकतीचे वर्णन)

मौजे	भूमापन क्र. व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)	मालकाचे नाव
(नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड	८८०	एकूण क्षेत्र ०.४७.३० पैकी ०.१७.००	१०.७५	शैलेश पांडुरंग चव्हाण, रामप्रसाद नंदलाल जायस्वाल, शरद मोहन पंडित

अलिबाग,
दि. २१/१०/२०२६

ॲड. अमित विष्णु राऊळ
मु. सातिर्जे, पो.मापगांव, अलिबाग-रायगड
मो.नं. ८४३३७९५२५५/८६९८०००२३८

जाहीर सुचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे कावीर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली नमुद केलेल्या वर्णनाच्या शेतजमिन मिळकती, श्री. तुळशीराम हाशा वरसोलकर, राहणार अलिबाग कोळीवाडा, मेटपाडा, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीची असून, सदरील शेतजमिन मिळकती सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदर शेतजमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. तरी ज्या व्यक्ती/ संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वास कळावे.

मिळकतीचे वर्णन

मोजे	भूमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर)	आकार (रु. पैसे)
कावीर ता. अलिबाग,	९०	०-१९-३० ०-०३-५० पो.ख. ०-२२-८० एकूण	४-५०
कावीर ता. अलिबाग	९१	०-९७-२० ०-१३-८० पो.ख. १-११-०० एकूण	११-९३

सदरील गट नं. ९१ ह्या जमिन मिळकतीपैकी ०-४७-२० (हे. आर.) ही जमिन मिळकत.

दिनांक : २३/१०/२०२६.

सही/-
(ॲड. प्रदीप प्रभाकर गावंड)
बी. एस. सी. एल. एल. बी.,
संकल्पसिद्धी अपार्टमेन्ट, तळमजला,
के. ई. एस. हायस्कूल जवळ, ब्राम्हण
आळी, अलिबाग ता. अलिबाग, जि. रायगड.

जाहीर नोटीस

रे.मु. नं. १७/२०१९

मा. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कर्जत, जि. रायगड यांच्या न्यायालयात

नि १०३/ड
ने.ता. १४/१२/२६

सौ. बेबी भास्कर निमने,
पूर्वाश्रमीची बेबी शांताराम जाधव,
वय सज्ञान, व्यवसाय शेती,
रा. बांधिवली, ता. कर्जत, जि. रायगड ...वादी
विरुद्ध
श्री. पंढरीनाथ शांताराम जाधव व इतर १८ ... प्रतिवादी

याद्वारे सदर दिवाणी दाव्यातील सर्व संबंधितांना तसेच प्रतिवादी क्र. १६ श्री. अमरदीप भूपेंद्रनाथ गंभीर, रा. गंभीर निवास, हिरानंदानी गार्डन, पवई मुंबई ४०००७६ व प्रतिवादी क्र. १७ मे. कसारा गोल्फ कोर्स अँड रिसॉर्ट प्रा.लि. तर्फी श्री. अंकुश मारुती गोपाळे, रा. नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१ यांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, वरील नमूद रे. मु. नं. १७/२०१९ हा दिवाणी दावा वादी यांनी मौजे वांजळे, ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे नं. ४०/५, ४५/१, ९६, ९७/१, ९७/२, ९९, १०१, १३५, १३८/१, १४० व १६२/१ या मिळकतींच्या अनुषंगाने मा. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कर्जत यांच्या न्यायालयात दाखल केलेला असून, सदर दावा मा. न्यायालयासमक्ष प्रलंबित आहे.

सदर दाव्याच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र. १ ते १५ व १८ यांना न्यायालयीन प्रक्रियेनुसार समन्स बजावण्यात आलेले आहेत. तथापि, प्रतिवादी क्र. १६ श्री. अमरदीप भूपेंद्रनाथ गंभीर व प्रतिवादी क्र. १७ मे. कसारा गोल्फ कोर्स अँड रिसॉर्ट प्रा.लि. तर्फी श्री. अंकुश मारुती गोपाळे यांना समन्सची विधिवत बजावणी होणे शक्य झालेले नाही. प्रतिवादी क्र. १६ व १७ यांना सदर दिवाणी दाव्याची, त्यातील मागणीची तसेच सदर दाव्याच्या अनुषंगाने मा. न्यायालयासमक्ष सुरू असलेल्या न्यायालयीन कार्यवाहीची विधिवत माहिती व्हावी, त्यांना आपली बाजू मांडण्याची संधी प्राप्त व्हावी आणि नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार त्यांना सदर कार्यवाहीची माहिती देण्यात यावी, या उद्देशाने मा. न्यायालयाच्या आदेशान्वये सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. १६ व १७ यांनी सदर जाहीर नोटीसची विधिवत दखल घेऊन, मा. न्यायालयाने निश्चित केलेल्या दिनांक १४/१२/२०२६ या तारखेस सदर दाव्याच्या अनुषंगाने मा. न्यायालयासमक्ष स्वतः अथवा त्यांच्या विधिवत नियुक्त अधिवक्त्यामार्फत उपस्थित राहून आपले म्हणणे/बचाव मांडावा व आवश्यक ती कायदेशीर कार्यवाही करावी.

प्रतिवादी क्र. १६ श्री. अमरदीप भूपेंद्रनाथ गंभीर व प्रतिवादी क्र. १७ मे. कसारा गोल्फ कोर्स अँड रिसॉर्ट प्रा. लि. तर्फी श्री. अंकुश मारुती गोपाळे यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यानंतरही मा. न्यायालयासमक्ष हजर राहून आपली बाजू मांडली नाही, तर त्यांच्या अनुपस्थितीत सदर दाव्याची पुढील कार्यवाही कायद्यानुसार तसेच मा. न्यायालयाच्या आदेशानुसार पुढे चालविण्यात येईल आणि त्याबाबत कोणतीही स्वतंत्र नोटीस अथवा समन्स बजावण्याची आवश्यकता राहणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी. सदर जाहीर नोटीस ही मा. न्यायालयाच्या आदेशान्वये प्रतिवादी क्र. १६ श्री. अमरदीप भूपेंद्रनाथ गंभीर व प्रतिवादी क्र. १७ मे. कसारा गोल्फ कोर्स अँड रिसॉर्ट प्रा. लि. तर्फी श्री. अंकुश मारुती गोपाळे यांना अंतिम स्वरूपाची सार्वजनिक सूचना/माहिती म्हणून प्रसिद्ध करण्यात येत असून, त्यांनी सदर नोटीसीची गांभीर्याने दखल घ्यावी.

आज दिनांक १७/१०/२०२६ रोजी आमचे स्वाक्षरी व शिक्क्यानिशी दिले.

सही/-
कनिष्ठ लिपिक
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, कर्जत

सही/-
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, कर्जत

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **अलिबागमधील आर्किटेक्चर आणि इंटिरियर डिझायनिंग** ऑफिसकरीता ऑटो कॅड ड्राफ्टसमन हवा आहे. संपर्क : ९७६२७७७९७५
- **नागाव येथील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी** खालील पदांसाठी स्टाफची आवश्यकता आहे : रिसेप्शनिस्ट २ जागा, रेस्टॉरंट कॅप्टन १ जागा, हाऊसकीपर फक्त पुरुष (२ जागा), इंडियन चायनीज कुक १ जागा, मोरी - १ जागा, वेटर - १ जागा. इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते संध्याकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा किंवा वर मेसेज करावा. संपर्क क्रमांक: ७५५९१८४६१२
- **प्लंबिंग व पाईपलाईन कामासाठी हेल्पर पाहिजेत.** संपर्क : हजारे एंटरप्रायजेस मारूती नाका, अलिबाग- रायगड ९८२२००१८५३
- **जागा भाड्याने हवी आहे.** मुख्य गोंधळपाडा, अलिबाग येथे सुमारे २०० चौ. फूट गाळा, सलग्न बाथरूमसह भाड्याने हवा आहे. संपर्क : ७७९८८३३७७७
- **S.T. स्टँड जवळ, अजंठा लॉंच ऑफिसच्या वर, पहिल्या मजल्यावरील** 1BHK फ्लॅट भाड्याने देणे आहे. संपर्क : ९५५२१८३७६१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१



राशीभविष्य

- **मेष** : सणाच्या खरेदीचा उत्साह राहील. दूरच्या प्रवासाचे बेत ठरतील. विद्यार्थ्यांना स्पर्धांमध्ये यश मिळेल.
- **वृषभ** : कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील. व्यवसायात बऱ्यापैकी उलाढाल राहील. आप्तस्वकीयांची भेट होईल.
- **मिथुन** : विवाहाच्या प्रयत्नात अनुकूलता राहील. सुवार्ता कानी येईल. गृहसजावटीवर अधिक भर राहील.
- **कर्क** : महत्त्वपूर्ण भेटीचे योग आहेत. चैनीवर अधिक खर्च होईल. धार्मिक स्थळांच्या यात्रेने आनंद लाभेल.
- **सिंह** : उत्साहवर्धक घटना घडतील. चांगला पैसा हाती आल्याने सणाचा उत्साह वाढेल. बाकी चिंता नसावी.
- **कन्या** : आर्थिकदृष्ट्या उत्कर्षाच्या संधी लाभतील. अनुभवींचा सल्ला कामी येईल. गुंतवणूक विचारानं करा.
- **तूळ** : भाग्योदयाचा कालावधी आहे. नव्या संकल्पनांना मूर्त रूप येईल. स्थावर प्रश्नातून योग्य मार्ग निघेल.
- **वृश्चिक** : प्रलंबित कामांना गती मिळेल. व्यवसायात मनाजोगी उलाढाल होईल. स्वमताग्रह टाळायला हवा.
- **धनु** : जुनी येणी वसूल होतील. डोळ्यांच्या तक्रारी संभवतात. क्रीडा, शिक्षण या क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **मकर** : इतरांकडून अधिक अपेक्षा बाळगू नका. कलाकारांना उत्तम संधी लाभतील. सणाचा आनंद राहील.
- **कुंभ** : कौटुंबिक अडचणी दूर होतील. भाग्योदयकारक घटना घडतील. नव्या योजना विचारानं स्वीकाराव्या.
- **मीन** : खर्च वाढला तरी प्राप्ती तशीच राहील. भागीदारी व्यवसायात काळजी घ्यावी. प्रकृती सांभाळावी.

भटकंती

सोलो ट्रॅव्हलिंग करताना...

एकटीनं फिरायचं धाडस करण्याच्या विचारात असाल तर यावेळी कोणती काळजी घ्यायला हवी, याविषयी... फिरायचं ठिकाण ठरल्यानंतर हॉटेल बुकिंग करताना सावध रहा. या ठिकाणाला भेट देणारे नातेवाईक, मित्र यांच्याकडून माहिती घ्या. सुरक्षित हॉटेलची निवड करा. तुम्ही ज्या ठिकाणी फिरायला जाताय तिथे आधी कुणी गेलं नसेल किंवा माहिती विचारायला वेळ नसेल तर ऑनलाईन सर्च करा. संबंधित हॉटेलविषयी लिहिलेली मतं वाचा. अशी माहिती नसेल तर त्या ठिकाणी राहू नका. तुम्ही ज्या खोलीत राहताय ती खोली आतून नीट बंद होते ना हे तपासून घ्या. रात्रीचा आणि पहाटेचा प्रवास टाळा. गर्दीच्या वेळची तिकिटं बुक करा. विमान, बस, ट्रेनची तिकिटं बुक करताना वेळा तपासून घ्या. बॅग्ज नीट लॉक करून ठेवा. रात्रीच्या प्रवासादरम्यान विशेष काळजी घ्या. एखाद्या रात्री हॉटेलमध्ये राहणार नसाल तर हॉटेल कर्मचाऱ्यांना याबाबत सांगू नका. तुमच्या खोलीत चोरी होऊ शकते. फोनची बॅटरी संपणार नाही याची काळजी घ्या.

२४ ऑक्टोबर

दिन विशेष

१९१० : अभिनेत्री लीला पेंढारकर यांचा जन्म.
१९३५ : पत्रकार आणि लेखक मार्क टुली यांचा जन्म.
१९७६ : अभिनेत्री मल्लिका शेरावत यांचा जन्म.
२०१३ : आपल्या जादुई आवाजाने तब्बल पाच दशके हिंदी चित्रपट संगीतात ठसा उमटवणारे ज्येष्ठ गायक मन्ना डे ऊर्फ मन्नादा यांचे निधन.
२०१६ : सायरस मिस्त्री यांची टाटा समूहाच्या चेअरमन पदावरुन हकालपट्टी.

रंजक

अशी बनली पादत्राणे

हिमयुगाच्या काळापासून म्हणजेच जवळपास ५०,००,००० वर्षांपूर्वी पादत्राणांचा पहिला प्रयोग केला गेला असावा असं संशोधक सांगतात. नंतर मानमरातब, समाजातील पत, अधिकार अधोरेखित करण्यासाठी पायात पायताण घालण्याची पद्धत सुरु झाली. म्हणजेच कनिष्ठ श्रेणीतील लोक पादत्राणं घालू शकत नसतं. सर्वप्रथम गवतापासून पादत्राणं बनवली गेली असं इतिहास सांगतो. ग्रीक संस्कृती मध्ये चालणं, धावणं या क्रिया सुकर घडण्यासाठी पादत्राणांचा सोल, कुशनिंग यावर बरंच संशोधन झालं असावं. रोमन साम्राज्यात प्राण्यांच्या कातड्यांपासून पादत्राणं बनवली जायची. एक गंमत ऐकायचीये... चीनी महिलांचे पाय खूप लहान असतात. या लहान पायांमुळेच त्या तुरुतुरु चालतात. मुलींचे पाय लहानच रहावेत यासाठी चीनमध्ये मुलींसाठी खूप घट्ट पादत्राणं बनवली जात असत. अशी पादत्राणं घालून चालणं खूपच कष्टप्रद असायचं पण सौंदर्याचं लक्षण असणारे छोटे पाय मिळवण्याच्या हेतूने मुलींना जाणीवपूर्वक तशीच पादत्राणे घालायला दिली जात असत.

आरोग्यमंत्र

उपवास करताय?

शरीराचं आणि मनाचं शुद्धीकरण करण्यासाठी उपवास करणं हा एक सोपा मार्ग आहे. अनेकजण आठवड्यातले अथवा महिन्यातले काही दिवस उपवास करतात. बरेचदा सलग काही दिवस उपवास केला जातो. अशा वेळी आहाराचे काही नियम पाळायला हवेत. याविषयी...



❊ उपवास काळात दूध, दुग्धजन्य पदार्थ, फळं असे पदार्थ खाण्याला प्राधान्य द्यायला हवं. ❊ सतत उपवास केल्यामुळे आहारातलं डाळी तसंच धान्याचं प्रमाण बरंच कमी होतं. डाळींमधून शरीराला प्रथिनं मिळतात. विविध शारीरिक क्रियांसाठी प्रथिनांची गरज लागते. त्यामुळे शरीराला या घटकांची कमतरता भासू नये यासाठी दुग्धजन्य पदार्थांवर भर द्यायला हवा. ❊ आहारात सुका मेवा, दही, पनीर असे पदार्थ असावेत. ❊ तेलकट आणि तुपकट पदार्थ टाळावे. उपवासाचे तेलकट पदार्थ वर्ज्य करणं योग्य. बटाटा आणि केळ्याचे वेफर्स, चिवडा असे पदार्थ खाऊ नयेत. त्याऐवजी भाजलेल्या आणि उकडलेल्या पदार्थांवर भर द्यावा. केळं खाता येईल. तसंच मर्यादित प्रमाणात बटाटा खाता येईल. ❊ पोटाशी संबंधित विकार टाळण्यासाठी भरपूर पाणी प्या. दिवसभरात आठ ते दहा ग्लास पाणी प्यायला हवं. ❊ दुधीसारख्या भाज्या खाता येतील. ❊ उपवास काळात दिवसभर उपाशी राहू नये. फळं, फळांचे रस घेत रहावे. ❊ उपवासाच्या दिवशी अतिरिक्त प्रमाणात साबुदाणा न खाणं चांगलं. त्याऐवजी रताळं, उकडलेल्या शेंगा खाव्या.

पंचांग

शनिवार, २४ ऑक्टोबर २०२६
पराभवनाम संवत्सर शके १९४८, अश्विन शु. १३, चंद्रराशी : मीन, नक्षत्र : उ. भाद्रपदा, योग : व्याघात, सूर्योदय ६.३८, सूर्यास्त ६.०८

फॉरवर्ड्स

ये जिंदगी है जनाब...

जीना सिखाये बगैर मरने नही देती...!

टेक्नो टॉक

देशातील अनेक शहरांमध्ये लोकांना ५ जी कनेक्टिव्हिटी मिळू लागली आहे. परंतू, आता भारताने ६जी आणण्याची तयारी सुरू केली आहे. सुपर हाय स्पीड वायरलेस ब्रॉडबँड तंत्रज्ञान भारतात येईल. भारतात व्यावसायिक वापरासाठी हे जवळजवळ तयार आहे, परंतु संपूर्ण देशभरात पोहोचण्यास थोडा वेळ लागेल. २०३० पर्यंत लोकांसाठी उपलब्ध होईल, अशी अपेक्षा आहे. यामध्ये वेगवान ब्रॉडबँड स्पीड मिळेल. याचे नेटवर्क आर्टिफिशियल इंटेलिजन्सद्वारे चालवले जाईल. यामुळे लोकांना त्यांच्या गरजेनुसार वेग आणि नेटवर्क मिळेल.

करिअरवाटा

अर्ज लिहीताना

नोकरीसाठी अर्ज लिहिताना तो आकर्षक असल्याची दक्षता घेतली जाते. मात्र या नादात बरेचदा त्याच त्याच शब्दांचा आणि वाक्यांचा वापर केला जातो. मात्र दररोज शेकड्यामध्ये अर्ज वाचणाऱ्या लोकांना हे शब्द वाचून कंटाळा आलेला असतो. म्हणूनच अर्जामध्ये काही शब्दांचा वापर जाणीवपूर्वक टाळावा. उदाहरणार्थ 'इनोव्हेटिव्ह' हा शब्द कधीही वापरू नये. या शब्दाचा चावून चोथा झाला आहे. 'पॅशनेट' हा देखील असाच एक शब्द आहे. बहुसंख्य उमेदवारांच्या अर्जामध्ये हा शब्द वाचल्यामुळे संबंधितांना अजीर्ण झालेलं असतं. याच वर्गातील दुसरा शब्द 'मोटिव्हेटेड'. नोकरीसाठी अर्ज करताय तेव्हा तुम्ही या दिशेनं मोटिव्हेट झालेले आहात हे वेगळं सांगण्याची आवश्यकता नाही. वारंवार वापरल्यानं या शब्दावरील तुमचा अर्ज घसरण्याचीच शक्यता जास्त आहे. तुमच्याकडे वेगळं 'व्हिजन' आहे हे आवर्जून सांगण्याची आवश्यकता नाही. व्हिजन असल्याचं दिसावं लागतं. ते सांगून समजत नाही. ते सिद्ध करूनच दाखवावं हे बरं आणि शेवटचा शब्द आहे 'चांगलं नेटवर्किंग स्किल'. या शब्दाचा उल्लेख करण्याचीही आवश्यकता नाही.



खेचाखेची

बॅलन्स

बँकेत बंड्याने एका म्हाताऱ्याला धक्का दिला. म्हातारा तोल जाऊन पडता पडता वाचला. आजूबाजूचे लोक त्याच्या मदतीला धावले.

एकाने विचारलं, 'काका, कसा काय तोल गेला तुमचा?'

म्हातारा रागाने लाल होत बंड्याकडे बोट दाखवून म्हणाला, 'या गाढवाला माझा बॅलन्स चेक कर म्हणून सांगितलं तर याने मला धक्का दिला!'

वेगळं काही

मेंढ्यांची शाळा!

काही शाळांमध्ये विद्यार्थीसंख्या वाढवण्यासाठी बरेच प्रयत्न केले जातात. फ्रान्समध्येही एक शाळा वाचवण्यासाठी भन्नाट उपाय करण्यात आला. या देशातल्या क्रेत्स ऑन बेलडॉन नावाच्या शहरातली ही एक प्राथमिक शाळा आहे. शाळेत फक्त २६१ विद्यार्थी शिक्षण घेत असून इथले काही कक्ष बंद होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे शाळेत विद्यार्थीभरतीची मोहीम हाती घेण्यात आली. या शाळेत मेंढ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. १५ मेंढ्या या शाळेतल्या वर्गांमध्ये बसणार आहेत. प्रवेशासाठी स्थानिक मेंढपाळाने मेंढ्या पुरवल्या आहेत. या मेंढ्यांचा जन्मदाखलाही शाळेत सादर करण्यात आला.

संगोपन

मुले एकलकोंडी नकोत

सध्याच्या विभक्त कुटुंबपद्धतीमध्ये एकलकोंडेपणा वाढत असून एकेकटी मुलं स्मार्टफोन, टीव्ही, कॉम्प्युटर यासारख्या गॅझेट्समध्ये अडकून पडताना दिसतात. असं असताना मुलांना सामाजिक जीवनात यश मिळावं यासाठी पालकांना विशेष प्रयत्न करावे लागतात. त्यासाठी सर्वप्रथम मुलांना सोशल बनवणं गरजेचं ठरतं. लोकांशी हसून बोलणं, हात मिळवणं, गप्पा मारणं, स्वत:ला आत्मविश्वासपूर्वक सादर करणं या गोष्टी मोठेपणी अत्यंत उपयोगी पडत असतात. म्हणूनच लहानपणापासूनच याची सवय लागली पाहिजे. त्यासाठी पालकांनी मुलांना वेगवेगळ्या कार्यक्रमांना नेलं पाहिजे. कौटुंबिक स्नेहसंमेलनांना मुलांसह उपस्थित राहायला पाहिजे. सोशल होण्यासाठी मुलांना शालेय कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊ द्या. मित्रमैत्रिणींसोबत रमू द्या. त्यांना शाळेच्या सहलींना पाठवा. भावंडांसोबत भटकंतीला पाठवा. यामुळे ती इतरांशी जुळवून घ्यायला शिकतील. आपल्याकडच्या वस्तू वाटायला शिकतील. त्यांना सहजीवन काय असतं ते समजेल. भविष्यात त्यांना या सगळ्याचा लाभ होईल. एकूण काय तर, मुलं एकलकोंडी आणि स्वत:पुरता विचार करणारी होणार नाहीत याची काळजी पालकांनीच घ्यायला हवी.



सुडोकू १६५

		५			३		४	६
३		४	५					
९					१		७	
८	३	६			५			१
				३				
२			६			८	५	३
	९		१					२
					७	५		९
१	२		३			६		

टीप -

❊ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह्र ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.


❊ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

❊ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत

सुडोकू १६४ चे उत्तर

३	१	८	४	६	७	९	२	५
७	९	६	१	५	२	३	४	८
२	५	४	३	९	८	७	१	६
८	३	७	६	१	५	४	९	२
९	२	१	७	८	४	५	६	३
६	४	५	२	३	९	१	८	७
१	८	३	९	७	६	२	५	४
४	६	९	५	२	३	८	७	१
५	७	२	८	४	१	६	३	९

शब्दकोडे क्रमांक १६५



आडवे शब्द :-

१) अनावर राग येणे (वा.प्र.)
८) अकरावी रास
९) गर्दभ
१०) पर्ण
११) कत्तल
१३) डोक्यावर हळूच मारलेली चापट
१५) उसनवार
१६) देशाचे नाणे
१७) शरीर
१९) मृत्तिका
२०) हिंदीत शरीर
२१) सर्वस्व
२४) नगण्य किंमत
२५) हरीणाची शिकार
२८) आश्चर्य
३०) मनाची घालमेल, तडफड
३१) कर्णेंद्रिय
३२) एक अधिक एक चतुर्थांश
३३) चलाख, हुषार
३५) आंबट, गोड चवीचे काटेरी फळ
३७) हस्त
३८) रानरेडा
४०) धुंदी, कैफ
४१) घर
४२) फोडणीचे वरण
४३) पुन्हा
४४) छाया
४५) देवाण घेवाण(हिं.)
४६) पायाने अधु असलेली
४७) विद्या
४९) रव्याचा एक गोड पदार्थ
५१) गाजावाजा
५२) एकश्वासरोग
५४) विळखा, मिठी
५५) सिंह
५७) दृष्टीभेट
६०) मनालाटोचणारे दु:ख

उभे शब्द :-

१) झीज सोसण्याची पराकाष्ठा करणे
२) दाट, निबिड, खोल
३) वात्रट
४) लहान बाळाचा पाणी मागण्याचा शब्द
५) दुर्दशा
६) अतिशय खरडपट्टी काढली (वा.प्र.)
७) वडिलांची बहीण
८) कर्णभुषण
११) निरुपाय
१२) सोन्याचे हरिण
१४) पडणे
१८) वाहन
१९) मनुष्य
२२) नंतर
२३) श्रीमंत
२६) येरझार, जाणे-येणे, हेलपाटा
२७) यज्ञ
२९) वाईट सवय
३२) कांबळी विणणारी जमात
३४) तृषित
३६) सदोदित
३९) अर्धा नारळ, गुडघ्याचे वर्तुळाकार हाड
४१) चुन्याचे पाणी
४२) हुकूमा, आज्ञा
४३) पान
४४) लाक्डाची एक उत्कृष्ठ जात
४६) उपकार
४७) अर्धवर्तुळाकार
४८) एक गड्डा भाजी
५०) अरण्य
५१) हत्तींचा राजा
५२) हिंदीत भेग, दुही
५३) मऊ
५४) सत्वांश
५६) ढीग
५८) जन्म
५९) एक गळीत धान्य
६२) बारा वर्षाचा काळ
६५) पुरुष

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर

	म	त	दा	न		बं	द		का	ष्ट		आ	का	श
प		ब		र		द	वा	खा	ना		स	व	ल	त
ट	ण	क		क	स	र		ने		वा	न	र		ता
प			का		म		व	सु	दे	व		ण		र
ट	र	फ	ल		र	ज		मा	ठ		व		डं	का
	म	त		का		ल	ह	री		द		नि		
न		क	न	क			जा		पा	री		वा	ट	प
स	त	ल	ज		क	त	र	बे	त		श	र		क्षी
ता	ल		रा	ज	वा	डा		स	क	ट	नि	क	ट	
	वा	टा		ल्ला		ग	म	न		क	वा		व	क्ष
ज	र		म	द	त		दि		स	ट	र	फ	ट	र
ड		म	धु			सु	रा		पा	क			वी	
	हा		क	र	व	त		पा	ट		ज	प	त	प
आ	र	पा	र		ल्ग		ना	च		भा		र		ठ
ले		रा		वि	ना	य	क		ज	न	न	म	र	ण



रंगबहार

शरद कोरडे

अभिनेत्री मधु कांबीकर, सखी माझी लावणी!

चार दशके मराठी रंगभूमी, लोकनाट्य व मराठी तसेच हिंदी चित्रपटात आपल्या अभिनयाने व नृत्यनैपुण्याने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारी अभिनेत्री मधु कांबीकर यांचे १२ ऑक्टोबर रोजी निधन झाले. आपल्या अभिनय व नृत्य कारकिर्दीत त्यांनी सुमारे ७० मराठी व हिंदी चित्रपटांतून भूमिका केल्या.१२ मराठी लोकनाट्य व नाटकांतून भूमिका केल्या. त्यांना महाराष्ट्र शासनाचा व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचा सर्वोत्कृष्ट अभिनयाचा पुरस्कार मिळाला होता. मधू कांबीकर यांचा जन्म २८ ऑगस्ट १९५३ रोजी बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील माळेगाव या गावी कोल्हाटी समाजात झाला. शिक्षण फार झाले नाही. वडील लोकनाट्य व तमाशांत कामे करीत असत. वडिलांबरोबर लहानपणापासून त्या लोकनाट्यांत कामे करू लागल्या. त्यांचे प्राथमिक शिक्षण अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील कांबी या गावी झाले. पुढे कला विश्वात त्या कांबीकर हेच नाव लावू लागल्या. कांबी गावापासून सुरू झालेला मधु यांचा कलाप्रवास अनेक अडचणी, संकटे व मानहानी सहन करीत सुरू होता. वडिलांसोबत त्यांनी अनेक नाटके, तमाशे पाहिले होते. त्यावेळी खेडोपाडी असे अनेक कार्यक्रम होत असत, त्यातूनच त्यांच्या अभिनय कारकिर्दीची जडणघडण सुरू झाली.

मधू कांबीकर यांनी पुण्यात बाळासाहेब भोसले यांच्याकडून कथ्थक नृत्याचे शास्त्रीय शिक्षण घेतले . नृत्य गुरु पांडुरंग घोटीकर व लावणी सम्राज्ञी लक्ष्मीबाई कोल्हापूरकर यांच्याकडे त्यांनी लावणीचे धडे घेतले.

प्रथम तमाशाच्या फडात चाळ बांधल्यानंतर लावणी नृत्याचे एक एक धडे शिकत त्यांनी त्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

अस्सल खानदानी लावणी व तिची परंपरा यांचा अभ्यास केला व ही कला आम जनतेसमोर मांडण्याचा अखंड प्रयत्न केला. लावणीच्या चहात्या वर्गाला



लावणीचा इतिहास

त्यांतील मुख्य नृत्यांगनाची भूमिका केली व अनेक नवीन नर्तिकांना त्यांनी या कार्यक्रमाद्वारे एकत्रित केले व लावणीची महती वाढविली.

नटवर्य प्रभाकर पणशीकर यांच्या 'नाट्यसंपदा' या संस्थेतर्फे अनिल बर्वे लिखित 'पुत्रकामेष्टी' या नाटकांत प्रथम मधु कांबीकर यांना एक महत्त्वाची भूमिका दिली..

एका लोकनाट्य कलाकाराला मराठी रंगभूमीवर आणण्याचे काम पणशीकरांनी केले. या नाटकासाठी मधू कांबीकर यांना 'नाट्यदर्पण' चा लक्षवेधी अभिनेत्रीचा पुरस्कार प्राप्त झाला. या नाटकांत प्रभाकर पणशीकर , अशोक समेळ व सुधा करमकर यांच्या भूमिका होत्या. त्यांत मूल होण्यासाठी दुसऱ्या स्त्रीचे गर्भाशय भाड्याने विकत घेणे व त्यानंतर अशा स्त्रीच्या मातृत्वाच्या भावना जागृत झाल्यावर, त्या समयी उद्भवलेल्या सम स्येवर हे नाटक आधारित होते. त्यांतील





'छंदिका' नामक मूळ मुरळी असलेल्या गणिकेचे काम मधू कांबीकर यांनी केले. पदार्पणातच त्यांच्या अभिनयाचे दखल घेण्यात आली व त्यानंतर त्यांनी अनेक मराठी नाटकांत कामे केली.

मधू कांबीकर यांनी प्रथम दगा, सौभाग्यदान, रानपाखरे, देवापुढे माणूस, ह्योच नवरा पाहिजे, सतीची पुण्याई आदी मराठी चित्रपटांतून छोट्या छोट्या भूमिका केल्या. दादा कोंडके यांच्या 'ह्योच नवरा पाहिजे' या चित्रपटांतील 'आला थंडीचा महिना' हे गीत

मधु कांबीकर यांच्यावर चित्रित झाले होते. त्यानंतर १९८२ साली त्यांनी प्रथम 'राघू मैना' या मराठी चित्रपटात नायिकेची भूमिका केली. या चित्रपटात नाना पाटेकर व मधू कांबीकर ही जोडी होती. हा चित्रपट राजदत्त यांनी दिग्दर्शित केला होता. वसंत सबनीस यांच्या 'तमासगीर' या नाटकावरून हा चित्रपट करण्यात आला होता. या चित्रपटाची कथा, पटकथा वसंत सबनीस यांनीच लिहिली होती. त्यानंतर याच वर्षी 'शापित' हा विश्वविनायक, माझा छकुला, घे भरारी, मुंबईचा डबेवाला, आदी चित्रपटात महत्त्वाच्या भूमिका केल्या. इतकेच नव्हे तर त्यांनी काही हिंदी चित्रपटातही भूमिका केल्या. नायक गोविंदा यांचा 'शोला शबनम' सातवा आसमान, हम दोनो, यशवंत, तुने मेरा दिल ले लिया, आदी चित्रपटात भूमिका केल्या. मधू कांबीकर यांनी प्रथम नायिकेची भूमिका केलेला चित्रपट 'राघू मैना' या चित्रपटाचा नायक नाना पाटेकर होता. नानाने नंतर हिंदी चित्रपटांतही मधू कांबीकर यांना कामे मिळवून दिली. त्यात 'हम दोनो' व 'यशवंत' या चित्रपटाचा नायक नाना पाटेकर होते. नाना पाटेकर हे मधू कांबीकर यांना खूप आदराने वागवीत असत. त्यांच्या 'हम दोनो' व 'यशवंत' या चित्रपटात त्यांनी नानाच्या आईचे काम केले

शेतीवरील कामगारांच्या व त्यांच्या महिलांच्या शोषणाच्या, अन्यायाच्या विषयावर वरील हा चित्रपट अरविंद देशपांडे यांनी दिग्दर्शित केला होता. पण पुढे त्यांच्या आजारपणामुळे राजदत्त यांनी तो चित्रपट पूर्ण केला. या चित्रपटात यशवंत दत्त, मधु कांबीकर, कुलदीप पवार, सुहास भालेकर, शहाजी काळे आदी कलाकारांनी कामे केली होती. या चित्रपटाला राष्ट्रीय चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपटाचे पारितोषिक मिळाले. त्यानंतर महाराष्ट्र राज्य चित्रपट महोत्सवात या चित्रपटांतील सर्वोत्कृष्ट नायिका म्हणून मधू कांबीकर यांचा सन्मान करण्यात आला. पुढे मधु कांबीकर यांनी बिन कामाचा नवरा, एक होता विदूषक, झपाटलेला, मुक्ता, कुंकू, कामेष्टी', आदी मराठी नाटकांतून त्यांनी उत्कृष्ट अभिनय केला. डिसेंबर २०१६ मध्ये मुंबईच्या यशवंत नाट्य मंदिरांत झालेल्या 'लावण्यसंगीत' या कार्यक्रमांमध्ये नृत्य सादर करताना त्या बेशुद्ध पडल्या व तेथूनच त्यांना हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. मेंदू रक्तस्राव व गाठी झाल्याचे निदान करण्यात आले. त्यांच्यावर हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रियाही करण्यात आली. त्यानंतर त्यांना अर्धांगवायूचा झटकाही आला. तेव्हापासून त्या रंगभूमीपासून दूर झाल्या. सुमारे दहा वर्षे त्या अंथरुणात खेळून होत्या. १२ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांचा देहांत झाला. लावणीसम्राज्ञी, लावणीला सखी मानणारी मधू कांबीकर लावणीवर रुसून देवाघरी गेली. **

'मोठेपणा'चा 'सोहळा'

नवे कपडे, घरभर दरवळणाऱ्या पक्वान्नांचा सुगंध, मित्रांचा दंगा आणि मनात कित्येक दिवसांपासून रंगवलेली स्वप्ने! बालपणीच्या एखाद्या खास दिवसाची तयारीच इतकी भन्नाट असते की, आनंदाला जणू पंख फुटतात. पण याच आनंदाच्या सोहळ्यात जेव्हा मोठे होण्याची चाहूल मिसळते, तेव्हा तो दिवस केवळ उत्सव राहत नाही, तर आयुष्यभर जपून ठेवावी अशी आठवण बनतो. अभिनेत्री सोनाली बेंद्रे हिच्या 'सोहळा' या मराठी चित्रपटातून अशाच निरागस, हळव्या आणि मनाला भिडणाऱ्या बालविश्वाची सफर घडते. या चित्रपटाद्वारे सोनालीने पहिल्यांदाच निर्माती म्हणून मराठी चित्रपटसृष्टीत पाऊल ठेवले आहे.

१६ ऑक्टोबर रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित झालेला हा चित्रपट बालपणातून किशोरवयाकडे जाणाऱ्या एका मुलाच्या भावविश्वाची गोष्ट सांगतो.

या कथेचा नायक आहे पाश्या. अवघ्या १३ वर्षांचा मुलगा! त्याच्यासाठी स्वतःचा सोहळा म्हणजे आनंदाची पर्वणी. नवे कपडे, गोडधोड पदार्थ, नातेवाईकांची लगबग आणि मित्रांसोबतची धमाल यांची तो कित्येक महिन्यांपासून आतुरतेने वाट पाहत असतो. पण या सगळ्या उत्साहात त्याला सर्वाधिक ओढ असते ती वडिलांच्या चपला



पहिल्यांदा घालण्याची!

महाराष्ट्रातील काही समुदायांमध्ये प्रचलित असलेल्या या परंपरेला मोठे होण्याच्या प्रवासात प्रतीकात्मक महत्त्व आहे. वडिलांच्या चपलांमध्ये पाय घालताना पाश्या नकळत बालपणाच्या उंबरठ्यावरून पुढच्या टप्प्याकडे वाटचाल करतो. चप्पल तीच, पण त्यातून मिळणारी जाणीव मात्र नवी! ग्रामीण जीवनातील ऊब, कुटुंबातील नाती, मैत्रीची धमाल आणि वयानुसार बदलणारी समज यांचे चित्रण या कथेत पाहायला मिळते. दिग्दर्शक सैकत बागबान यांनी एका तेरा वर्षांच्या मुलाच्या नजरेतून मोठे होण्याचा हा प्रवास उलगडला आहे.

पाश्याच्या जगाशी पहिल्याच भेटीत भावनिक नाते जुळल्याचे सोनाली बेंद्रेने सांगितले आहे. साध्या वाटणाऱ्या प्रसंगांमध्येही आयुष्यभर लक्षात राहणाऱ्या आठवणी दडलेल्या असतात, हे या चित्रपटाचे वैशिष्ट्य आहे. प्रवीण डाळिंबकर, देवदत्त प्रशांत गोणे, वर्षा मालवडकर, वैष्णवी संजय घोडके आणि ॲलेसँड्रा व्हेलन मेरेडिझ हे कलाकारही यात महत्त्वाच्या भूमिका साकारत आहेत. मोठे होण्याची चाहूल नेहमी मोठ्या घटनांमधूनच मिळते असे नाही; कधी ती वडिलांच्या चपलांमधून, घरच्यांच्या कौतुकातून किंवा मित्रांच्या खोडकर चिडवण्यातूनही जाणवते. पाश्याच्या आनंदात स्वतःचे बालपण शोधताना प्रेक्षकांच्या चेहऱ्यावर हसू फुलू शकते, तर एखादी जुनी आठवण डोळ्यांच्या कडा ओलावू शकते.

आंतरराष्ट्रीय कलाकार दिन

कलेचा गौरव करताना कलाकाराच्या जगण्याचीही जाणीव ठेवूया!

एखादे चित्र पाहताना पावले क्षणभर थबकतात, एखादे गाणे मनाच्या कोपऱ्यात घर करते, नाटकातील एखादा संवाद काळजाला भिडतो, तर एखादे छायाचित्र न पाहिलेल्या जगाची दारे उघडते. कलाकृतीचा हा अनुभव आपल्याला समृद्ध करतो. पण त्या अनुभवामागे असलेली कलाकाराची तपश्चर्या, त्याने घेतलेले कष्ट, केलेले निरीक्षण आणि जपलेली संवेदनशीलता आपण किती वेळा जाणून घेण्याचा प्रयत्न करतो? २५ ऑक्टोबरच्या आंतरराष्ट्रीय कलाकार दिनानिमित्त मला याच नात्याचा विचार करावासा वाटतो.

आंतरराष्ट्रीय कलाकार दिनाची सुरुवात २००४ मध्ये कॅनडातील चित्रकार ख्रिस मॅककलूर यांनी केली. २५ ऑक्टोबर हा स्पॅनिश चित्रकार पाब्लो पिकासो यांचा जन्मदिवस. १८८१ मध्ये जन्मलेल्या पिकासो यांनी चित्रकलेच्या प्रस्थापित चौकटींना छेद देत आधुनिक कलेला नवे वळण दिले. हा दिवस संयुक्त राष्ट्रांनी अधिकृतरीत्या घोषित केलेला आंतरराष्ट्रीय दिन नसला, तरी कलाकारांच्या योगदानाची दखल घेण्यासाठी जगभरात त्याचे स्मरण केले जाते. कलाकार म्हटले की डोळ्यांसमोर चित्रकाराचे रूप उभे राहते; परंतु कलेचे विश्व त्याहून कितीतरी व्यापक आहे. गायक, वादक, नर्तक, कवी, लेखक, नाटककार, शिल्पकार, छायाचित्रकार, चित्रपट निर्माते आणि हस्तकलाकारप्रत्येक जण आपल्या परीने जगण्याला अर्थ देत असतो. त्यांच्या अभिव्यक्तीची माध्यमे वेगवेगळी असली, तरी मानवी भावभावना व्यक्त करणे, अनुभवांना शब्द किंवा रूप देणे आणि जगाकडे पाहण्याची नवी दृष्टी देणे, हा त्यांच्यातील समान धागा आहे.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेत या कलाविष्कारांचे वैभव ठायीठायी दिसते. वारली चित्रकलेतील साध्या रेषांतून उलगडणारे निसर्गाशी नाते, लावणीतील ठसकेबाज आविष्कार, पोवाड्यातून जागवला जाणारा इतिहासाचा अभिमान, भारुडातून सहजपणे मांडले जाणारे सामाजिक प्रबोधन आणि तमाशाच्या फडातून व्यक्त होणारे लोकजीवनया सगळ्यांत महाराष्ट्राच्या मातीचा गंध आहे. कीर्तनकाराच्या अभंगातून विचारांची ज्योत पेटते, शाहिरीतून जनमनाला आवाज मिळतो, तर मराठी रंगभूमीवरील नाटक माणसाच्या स्वभावाचे आणि समाजातील विसंगतींचे दर्शन घडवते. या कला केवळ मनोरंजन करत नाहीत; त्या समाजाचे अनुभव, लोकस्मृती आणि सांस्कृतिक अस्मिता एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे नेतात.



या परंपरांकडे पाहताना मला जाणवते की कलाकार हा केवळ कलाकृती घडवत नसतो; तो आपल्या काळाची नोंदही घेत असतो. कधी त्याच्या कुंचल्यातून निसर्ग बोलतो, कधी त्याच्या शब्दांतून सामान्य माणसाचे दुःख व्यक्त होते, तर कधी त्याच्या सुरांतून आनंदाला वाट मिळते. कलाकार आपल्याला प्रत्येक वेळी तयार उत्तर देत नाही; पण एखादा प्रश्न मनात रुजवतो. त्या

विजयकुमार कट्टी

प्रश्नाचा मागोवा घेताना आपल्यालाच नव्या जाणिवा होतात. कलेची खरी ताकद कदाचित याच आत्मशोधात दडलेली आहे.

मात्र, कलाकृतीचा आस्वाद घेताना तिच्या निर्मात्याच्या जगण्याकडे आपले दुर्लक्ष होते का, हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. आपण कार्यक्रमात टाळ्या वाजवतो, चित्राचे कौतुक करतो, समाजमाध्यमांवर कलाकृती पुढे पाठवतो; पण कलाकाराच्या मेहनतीचा योग्य मोबदला त्याला मिळतो का, याचा विचार किती वेळा करतो? साहित्याचा खर्च, वर्षानुवर्षांचा सराव, प्रदर्शनासाठी जागेची अडचण, अनिश्चित उत्पन्न आणि काम मिळवण्याची धडपड अनेक कलाकारांच्या वाट्याला येते. कौतुकाने मन भरून येते; पण केवळ कौतुकावर संसार चालत नाही. कलाकाराच्या कलेला दाद देतानाच त्याच्या श्रमांचे मोल ओळखणे आवश्यक आहे. कलाकाराप्रती आदर व्यक्त करण्यासाठी प्रत्येक वेळी मोठे योगदान देण्याची गरज नाही. त्याच्या कामाचे श्रेय त्यालाच देणे, शक्य असल्यास कलाकृती विकत घेणे, कार्यक्रमाचे तिकीट काढून उपस्थित राहणे, स्थानिक कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे किंवा नवोदितांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन देणे या साध्या कृतीही अर्थपूर्ण आहेत. कलाकाराचे नाव विसरून कलाकृतीचा गौरव करणे अपुरे ठरते; कारण त्या कलाकृतीमागे एका माणसाचे श्रम, स्वप्ने आणि जगण्याची धडपड असते.

आज कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापरामुळे कलेच्या क्षेत्रात नवनव्या शक्यता खुल्या होत आहेत. या बदलाकडे पाहताना मला असे वाटते की, कृत्रिम बुद्धिमत्ता कलाकाराची जागा घेईल का, एवढाच प्रश्न विचारण्याऐवजी तिच्या मदतीने कलाकार स्वतःच्या कलेत नवे काय शोधू शकतो, हेही पाहायला हवे. कलाकाराची अनुभूती, त्याच्या जगण्याने घडवलेली संवेदना आणि त्याची स्वतंत्र कलादृष्टी ही त्याच्या निर्मितीची खरी ओळख असते. तंत्रज्ञान नवे पर्याय सुचवू शकते; पण कोणता पर्याय स्वीकारायचा, त्यातून काय व्यक्त करायचे आणि अंतिम कलाकृतीला कोणते रूप द्यायचे, हे कलाकारच ठरवतो.

मला येथे एक साधा विचार महत्त्वाचा वाटतो उत्तर मिळवणे आणि त्या उत्तरातून स्वतःला नवे काही उमगणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. कृत्रिम बुद्धिमत्तेने एखादी कल्पना सुचवली, तर तिचा अर्थ समजून घेणे, दुसरे पर्याय तपासणे आणि आपल्या अनुभवाच्या कसोटीवर ती पडताळणे आवश्यक आहे. या प्रक्रियेतून स्वतःची समज वाढवणे, यालाच मी 'विश्लेषणातून नवे आकलन' असे म्हणतो. तंत्रज्ञानाचा उपयोग तयार उत्तरावर थांबण्यासाठी नव्हे, तर अधिक चांगले प्रश्न विचारण्यासाठी आणि स्वतःच्या सर्जनशीलतेला नवी दिशा देण्यासाठी व्हावा. साधन पर्याय दाखवते; त्या पर्यायांतून स्वतःची वाट निवडण्याचे स्वातंत्र्य कलाकाराकडेच राहते.

कलेची ही सर्जनशीलता व्यावसायिक कलाकारांपुरती मर्यादित नाही. एखादे मूल रंगांशी खेळते, एखादी व्यक्ती आपल्या आठवणी लिहून ठेवते किंवा एखादा नागरिक आपल्या गावातील परंपरेचे छायाचित्र टिपतो, तेव्हाही सर्जनशीलतेचा आविष्कार घडत असतो. या अभिव्यक्तीला प्रोत्साहन देणारे कुटुंब, शाळा आणि समाज पुढील पिढीमध्ये निरीक्षणशक्ती, संवेदनशीलता आणि स्वतंत्र विचारांची जोपासना करू शकतात.

माझ्यासाठी आंतरराष्ट्रीय कलाकार दिन हा केवळ कलाकारांचे अभिनंदन करण्याचा दिवस नाही. त्यांच्या श्रमांची दखल घेणे, महाराष्ट्राच्या समृद्ध लोककलांचे जतन करणे, नव्या कलाकारांना संधी देणे आणि तंत्रज्ञानाचा विचारपूर्वक वापर करणे, हीदेखील या दिवसाची शिकवण आहे. परंपरेचा अभिमान बाळगतानाच नव्या शक्यतांसाठी मन खुले ठेवणे आणि बदल स्वीकारतानाही मानवी सर्जनशीलतेचे मोल जपणे, ही आजची गरज आहे.

कलाकार आपल्याला जग नव्याने दाखवतो. त्याच्या कलेचा आनंद घेताना त्या कलेमागील माणूसही आपल्या नजरेत राहिला पाहिजे. कलाकृतीला दाद देणे हा सन्मानाचा आरंभ आहे; कलाकाराच्या श्रमांना मोल देणे ही त्या सन्मानाची खरी पूर्तता आहे. ही जाणीव आपल्या दैनंदिन व्यवहारात उतरली, तर २५ ऑक्टोबर हा केवळ अभिनंदनाचा दिवस न राहता कला आणि कलाकार यांच्या सन्मानाचे भान जागवणारा दिवस ठरेल. **

हनी सिंगमागे अडचणींचा 'रॅप'

रॅपच्या तालावर चाहत्यांना थिरकवणाऱ्या 'यो यो' हनी सिंगच्या आयुष्यात सध्या वेगळाच सूर उमटतो आहे. रंगमंचावर आपल्या गाण्यांनी धुमाकूळ घालणारा हा गायक आता चौकशीच्या फेऱ्यात अडकला आहे. एका मैफलीत कथित आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी महाराष्ट्र सायबर विभागाने त्याला १६ ऑक्टोबर २०२६ रोजी चौकशीसाठी हजर राहण्याचे समन्स बजावले होते. मात्र, आपण परदेशात असल्याचे सांगत हनी सिंगने २२ ऑक्टोबरपर्यंत मुदत मागितली. त्याची विनंती अधिकाऱ्यांनी फेटाळल्याचे वृत्त आहे. त्यामुळे गायकाच्या पुढील हालचालींकडे लक्ष लागले आहे. गाण्यांमधील बेधडक शैलीसाठी ओळखल्या जाणाऱ्या हनी सिंगसमोर आता कायदेशीर प्रश्न उभे ठाकले आहेत. चाहत्यांना त्याच्या नव्या गाण्यांची उत्सुकता असताना, सध्या त्याच्या चौकशीचीच चर्चा मनोरंजनविश्वात रंगली आहे.

या प्रकरणात हनी सिंगला यापूर्वीही चौकशीसाठी बोलावण्यात आले होते. वृत्तानुसार, ५ ऑक्टोबरला ठरलेल्या चौकशीसाठी तो उपस्थित राहिला नव्हता. त्यानंतर पुन्हा समन्स बजावून १६ ऑक्टोबर ही तारीख देण्यात आली. यावेळीही मुदतवाढ मागितल्याने सायबर विभागाने नाराजी व्यक्त केल्याचे समजते. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, त्याने पुन्हा समन्सकडे दुर्लक्ष केल्यास त्याच्याविरोधात लूक आऊट परिपत्रक जारी करण्याची प्रक्रिया सुरू होऊ शकते. अशा परिपत्रकाचा संबंधित व्यक्तीच्या परदेशप्रवासावर तसेच भारतात प्रवेश करण्याच्या प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो. मात्र, या प्रकरणात असे परिपत्रक प्रत्यक्ष जारी झाल्याची पुष्टी उपलब्ध वृत्तात नाही.



तक्रारदाराने मैफलीतील कथित वक्तव्यांवर आक्षेप घेतल्यानंतर चौकशी सुरू झाली. त्यामुळे आरोपांमागील वस्तुस्थिती तपासातून स्पष्ट होणे महत्त्वाचे आहे.

हनी सिंगसाठी वाद नवे नाहीत. त्याच्या जुन्या 'व्हॉल्यूम १' या गाण्याचाही यापूर्वी वादात समावेश झाला होता. २०२५ मध्ये दिल्लीतील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियमम धील कार्यक्रमात या गाण्याच्या काही ओळी गायल्याचा आरोप याचिकाकर्त्याने केला होता. या प्रकरणात दिल्ली उच्च न्यायालयाने एप्रिल २०२६ मध्ये गाण्याच्या इंटरनेटवरील दुव्यांबाबत निर्देश दिले होते. मे महिन्यातही न्यायालयीन प्रक्रिया पुढे सरकली होती. आता महाराष्ट्रातील नव्या प्रकरणामुळे हनी सिंग पुन्हा चर्चेत आला आहे. मात्र, तक्रार दाखल होणे आणि आरोप सिद्ध होणे या वेगळ्या बाबी आहेत.

बालांगण



ओळख वाद्यांची

पियानो

पियानोचा शोध इटलीतीलबार्टोलोमिओ किं स्टोफोरीयांनी अठराव्या शतकात लावला. पियानोचा गोड, गंभीर आणि भावपूर्ण आवाज विविध प्रकारच्या संगीतात–शास्त्रीय, जॅझ, पॉप, चित्रपटसंगीतात मोठ्या प्रमाणावर वापरला जातो.पियानोमध्ये साधारणत:८८ कीजअसतात. ५२ पांढऱ्या आणि३६ काळ्या. आत लोखंडी फ्रे म असते. त्यावर स्टीलच्या ताराओढलेल्या असतात. की दाबल्यावर हातोड्यासारखे हॅमर तारांवर आपटले जाते आणि त्यामुळे आवाज निर्माण होतो. कीजवर हलके दाबले तर मृदू स्वर आणि जोरात दाबले तर तीव' स्वर मिळतो. पियानो दोन्ही हातांनी वाजवला जातो. उजव्या हाताने प्रामु'याने धून वाजवली जाते.तर डाव्या हाताने साथसंगत दिली जाते. यात असलेल्या'पेडल्स' मुळे स्वर लांबवता किंवा मृदू करता येतात. बिथोवेन, मोझार्ट यांच्यासार'या अनेक महान संगीतकारांनी पियानोवर अप्रतिम रचना केल्या आहेत. आजही पियानो स्टेज शो, चर्च संगीत, चित्रपटसंगीत आणि पाश्चात्त्य संगीतासाठी आवश्यक आहे. ग"ँड पियानो म्हणजे सर्वात मोठा आणि पारंपरिक पियानो.याच्यातारा आडव्या पसरलेल्या असतात.कॉन्सर्ट हॉलमध्ये याचा जास्त वापर होतो. अपराइट पियानोलहान आकाराचा आणि उभा असतो. घरगुती वापर, शाळा किंवा सरावासाठी वापरला जातो. याला जागा लागते. याची किंमतही तुलनेने कमी असते.डिजिटल पियानो हा इलेक्ट्रॉनिक पियानो आहे.याचाआवाज सॉफ्टवेअर आणि स्पीकर्समधून येतो.हा वजनाने हलका आणि पोर्टेबल असतो. वेगवेगळे इफेक्ट्स देऊ शकतो. पियानो आजही अत्यंत लोकप्रिय वाद्य आहे.

फन टाईम

देशोदेशीचे झेंडे



प्रत्येक देशाचा झेंडा असतो. आपल्याला आपल्या तिरंग्याचा खूप अभिमान वाटतो. या तिरंग्यातही बरेच अर्थ दडले आहेत. प्रत्येक देशाच्या झेंड्याची रचना वेगळी, त्यातले रंग वेगळे... प्रत्येक देशाचा झेंडा विचारपूर्वक तयार करण्यात आला आहे. देशोदेशीच्या झेंड्यांविषयी...

स अमेरिकेच्या झेंड्यावर ५० चांदण्या आणि १३ आडव्या पट्टया आहेत. यातल्या ५० चांदण्या म्हणजे अमेरिकेतली ५० राज्यं. सध्याचा अमेरिकेचा झेंडा १९६० मध्ये अस्तित्वात आला.

स ब्रिटन म्हणजे युनायटेड किंग्डमच्या झेंड्याला युनियन जॅक असं म्हटलं जातं. १८०१ मध्ये हा युनियन जॅक अस्तित्वात आला. युनियन जॅकमध्ये तीन वेगवेगळे झेंडे आहेत. हा युनियन जॅक इंग्लंड, स्कॉटलंड आणि आयर्लंड या तीन देशांच्या झेंड्यांचं मिश्रण आहे.

स आपल्या भारताचा तिरंगा २२ जुलै १९४७ मध्ये अस्तित्वात आला. आपल्या तिरंग्यात केशरी, पांढरा आणि हिरवा असे तीन रंग आहेत. मध्यभागी अशोकचक्र आहे. केशरी हा त्यागाचा, पांढरा शांततेचा तर हिरवा समृद्धीचा रंग आहे.

स कॅनडाच्या झेंड्याच्या मध्यभागी एक पान पहायला मिळतं. या पानाला मॅपल लीफ असं म्हटलं जातं. या मॅपल लीफला अकरा टोकं आहेत. हे मॅपल लीफ कॅनडाचं राष्ट्रीय प्रतीक आहे. १९६५ मध्ये कॅनडाचा हा झेंडा अस्तित्वात आला.

स बांगलादेशचा झेंडा १९७२ मध्ये अस्तित्वात आला. हिरव्या रंगाच्या या झेंड्याच्या मध्यभागी लाल रंगाचा गोल आहे. बांगलादेशमधल्या हिरवाईचं प्रतीक म्हणून या झेंड्याचा रंग हिरवा आहे तर त्याच्या मध्यभागी असणारं लाल वर्तुळ बंगालमधल्या उगवत्या सूर्याचं तसंच बांगलादेशच्या स्वातंत्र्यासाठी आपले प्राण अर्पण करणाऱ्या वीरांच्या त्यागाचं प्रतीक आहे.



कॉकेशस पर्वतरांगा

कॉकेशस पर्वतरांग युरेशियामध्ये आहे. याचे स्थान काळा समुद्र आणि कॅस्पियन समुद्र यांच्यामध्ये आहे. या पर्वतरांगेचे दोन भाग आहेत. मोठाकॉकेशस आणि लहान कॉकेशस. मोठ्या कॉकेशसमध्ये खूप उंच शिखरे आहेत. युरोपातील सर्वात उंच शिखर 'माउंट एल्ब्रुस' याच रांगेत आहे. त्याची उंची सुमारे ५६४२ मीटर आहे. लहान कॉकेशस ही रांग थोडीशी कमी उंचीची आहे. कॉकेशस पर्वतरांग म्हणजे युरोप आणि आशिया यांचा सांधाजोड मानला जातो. त्यामुळे अनेक संस्कृती, जमाती आणि परंपरा येथे आढळतात. या प्रदेशात जॉर्जिया, आर्मेनिया, अझरबैजान आणि रशियाचा काही भाग यांचा समावेश होतो. पर्वतरांग असल्यामुळे हवामानात विविधता आढळते. उंच ठिकाणी बर्फ आणि हिम नद्या आहेत. तर दऱ्याखोऱ्यांमध्ये सुपीक जमीन असून शेती केली जाते. या पर्वतरांगेतूनटेरेक, कुबान, कुरो आणि अरास यासार'या अनेक महत्त्वाच्या नद्या उगम पावतात. ही पर्वतरांग समृद्ध जैवविविधतेसाठीही प्रसिद्ध आहे. येथे अस्वल, बिबट्या, लांडगे यांसारखे हिंस्र प्राणी आणि अनेक दुर्मिळ पक्षी आढळतात. कॉकेशस पर्वतरांगेला ऐतिहासिक दृष्ट्या मोठे स्थान आहे. येथे अनेक साम'ाज्यांनी सत्ता गाजवली. प्राचीन काळी व्यापार, संस्कृती आणि विचारांची देवाणघेवाण या मार्गाने होत होती. उंच डोंगर, बर्फाच्छादित शिखरे, दऱ्या आणि नद्या हे सर्व पर्यटकांना आकर्षित करतात. तसेच स्कीईंग, पर्वतारोहण यांसारखे खेळ येथे होतात. येथे राहणाऱ्या लोकांची भाषा, संगीत आणि परंपरा वेगळ्या व वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यामुळे कॉकेशस पर्वतरांग केवळ भौगोलिक दृष्ट्या नाही तर सांस्कृतिक दृष्ट्याही अत्यंत महत्त्वाची मानली जाते.


पर्वत शिखरे



समुद्रातील रहस्यपूर्ण प्रवासी

जपानमधल्या ओसामु गावात तारो नावाचा एक कोळीराहत होता. एक दिवस समुद्रकिनारी त्याच्या जाळ्यात त्याला एक सोनेरी मासा आला. 'मला कृपा करून सोड. मी तुला भरपूर धनसंपती देईन.' सोनेरी मासा म्हणाला. तारोला त्या पैशांचा लोभ सुटला. तो माशाच्या शेपटीला पकडून खोल समुद्रात गेला. त्याला समुद्राच्या खाली पाण्याखाली एक सुंदर राजमहाल दिसला. काही क्षणातच सोनेरी माशाने आपले रूप बदलले. ' मी समुद्राचा राजा आहे. माझे नाव ओटोमाईन. माझ्या राज्यात तुझे स्वागत आहे.'तो म्हणाला. त्याने तारोला आपल्या राजमहालात ठेवून घेतले. काही दिवस गेल्यावर तारो घरी निघाला तेव्हा त्याने त्याला भरपूर धनसंपत्ती दिली. रत्ने, दागदागिने, मोती दिले. तारो समुद्राच्या पाण्यातून वर आला आणि घरी गेला. पण सगळेच बदलले होते. ना त्याचे घर ना त्याची बायको, मुले, मित्र त्याला तिथे कुणीच भेटले नाही. तारोच्या ओळखीचे कुठेही काहीही नव्हते. निराश होऊन तारो गावातल्या बुद्धमंदिरात येऊन बसला. 'तू तारो आहेस ना ?' मान थरथरत असलेल्या एका म्हाताऱ्याने त्याला विचारले. त्याचे सगळे शरीर अगदी जर्जर झाले होते. 'तू इतकी वर्षे कुठे होतास तरी कुठे?' मी सोनेरी माशाबरोबर त्याच्या राज्यात गेलो होतो. त्याने मला भरपूर धन दिले आहे.' तारो म्हणाला. 'आता याचा काय उपयोग ? तू गेलास त्याला १०० वर्षे होऊन गेली. तारो, धन मिळवण्याच्या मोहात तू तुझे बाकी सगळे आयुष्य हरवून बसलास.' म्हातारा म्हणाला. आपण काय केले हे तारोला कळले. पण आता काय उपयोग. बिचारा तारो! समुद्राच्या काठावर जाऊन बसला. 'मला हे धन नको, मला माझे जग परत दे.' तो सोनेरी माशाला हाका मारीत राहिला. पण तो सोनेरी मासा त्याला कधीही परत भेटला नाही.

जपानी लोककथा



प्राणिप्रेम, युद्ध आणि विरह

रशिया–युक्रेन युद्धाच्या धगधगत्या वातावरणात स्वत:चा जीव धोक्यात घालून स्वत:कडील वन्यप्राण्यांना वाचवण्यासाठी धडपडणारे भारतीय वंशाचे डॉ. गिरिकुमार पाटील, ज्यांना 'जॅग्वॉरकुमार पाटील' म्हणूनही ओळखले जाते, त्यांची कहाणी अस्वस्थ करणारी आहे. युक्रेनमधील सेव्हेरोडोनेत्स्क येथे ते नर बिबट्या आणि मादी जॅग्वार यांच्यालह राहत होते. २०१६ पासून युक्रेनचे नागरिक असलेले पाटील यांनी हे प्राणी राजधानी कीव्हमधील एका प्राणिसंग्रहालयातून विकत घेतले होते. त्यांच्यासोबत नर बिबट्या आणि मादी जॅग्वार यांच्या संकरातून जन्मलेला 'लेपजॅग' हा एक दुर्मिळ प्रजातीतील बछडाही होता.



२४ फेब्रुवारी ते ७ सप्टेंबर २०२२ या काळात रशिया–युक्रेन युद्धाच्या सावटाखाली त्यांना अत्यंत कठीण परिस्थितीचा सामना करावा लागला. दररोज होणारे बॉम्बहल्ले, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा आणि अन्नाची कमतरता अशा परिस्थितीही ते त्यांनी पाळलेल्या प्राण्यांसाठी अन्नाची व्यवस्था करत होते. त्यांनी त्यांच्यासाठी सुमारे २०० मीटर लांबीचा सुरक्षित परिसर आणि बॉम्बहल्ल्यांपासून संरक्षण देणारे आश्रयस्थान तयार



करण्यासाठी जवळपास ८० लाख रुपये खर्च केले. मात्र, परिस्थिती बिकट झाल्याने अखेरीस त्यांना तेथून बाहेर पडावे लागले. प्राण्यांपासून दूर जाण्याची वेळ आली, तरी पाटील यांनी त्यांची जबाबदारी सोडली नाही. त्यांनी बिबट्या आणि जॅग्वॉरच्या देखभालीसाठी आणि बछड्याला दूध पाजणाऱ्या काळजीवाहू व्यक्तीची व्यवस्था केली. काही काळानंतर मात्र ही व्यवस्था कोलमडली आणि प्राण्यांना एकटे सोडण्यात आले. त्यानंतर पाटील यांनी विविध बचाव संस्थांशी संपर्क साधत त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवण्याचे प्रयत्न सुरू ठेवले. अखेरीस सप्टेंबर २०२२ मध्ये दोन्ही प्राण्यांना रशियातील सेंट पीटर्सबर्ग येथील प्राणिसंग्रहालयात ठेवण्यात आले. बिबट्याने नव्या वातावरणाशी जुळवून घेतले; परंतु जॅग्वॉर काहीसा अस्वस्थ होता.

मानवता

आंध्र प्रदेशात जन्मलेले पाटील २००७ मध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी युक्रेनमध्ये गेले. त्यांनी लुहान्स्क येथील वैद्यकीय विद्यापीठातून वैद्यकीय पदवी घेतली आणि पुढे अस्थिरोगशास्त्राचे शिक्षण पूर्ण केले. २०१४ पासून ते युक्रेनमध्ये अस्थिरोगतज्ज्ञ म्हणून कार्यरत होते. युद्धाचा अनुभव त्यांच्यासाठी नवा नव्हता; लुहान्स्कमधील संघर्षात त्यांचे घर आणि उपाहारगृहही गमावले गेले होते. तरीही वन्यप्राण्यांविषयीची त्यांची आस्था कायम राहिली. पुढे त्यांनी 'जॅग्वॉरकुमार वाइल्डलाइफ' नावाची वन्यजीवांसाठी काम करणारी संस्था सुरू केली आणि आणखी काही प्राण्यांच्या बचावासाठी प्रयत्न केले. युद्धाने माणसांचे संसार उद्ध्वस्त केले, नाती दुरावली आणि असंख्य जीवांना विस्थापित केले. अशा काळात जॅग्वॉरकुमार पाटील यांची कथा एका वेगळ्याच नात्याची साक्ष देते. माणूस आणि वन्यप्राणी यांच्यात निर्माण झालेली जिव्हाळ्याची बांधिलकी संकटांच्या सीमाही ओलांडू शकते.

वाचा तर खरं

आनंदी राहण्यासाठी...



लोकांना आनंदी, मनमिळावू माणसं खूप आवडतात. दु:खी, उदास, सतत नकारात्मक बोलणाऱ्या लोकांना लांब ठेवलं जातं. म्हणूनच आयुष्यात आनंदी राहणं खूप गरजेचं आहे. आनंदी राहण्यासाठी नेमकं काय करायला हवं? जाणून घेऊ.

- आनंदी राहण्यासाठी निरोगी असणं खूप आवश्यक आहे. तुमची तब्बेत चांगली असेल तर काहीही करता येतं. पोषक आहार घ्या. भरपूर व्यायाम करा. खेळा. यामुळे तुमचं मनही आनंदी राहील.
- मित्रमैत्रिणींमुळे तुम्ही आनंदी राहू शकता. म्हणूनच चांगल्या मित्रमैत्रिणींच्या सोबत राहा. सकारात्मक विचार करणाऱ्या मुलामुलींशी मैत्री करा. इतरांच्या सकारात्मक विचारसरणीमुळे आपल्यालाही बरं वाटतं.
- आजच्या काळात फक्त अभ्यास करून भागणार नाही. तुम्हाला एखादी कला अवगत असायला हवी. तुम्ही चांगला छंद जोपासा. नवं काहीतरी शिका. यामुळे तुमचा उत्साह आणि आत्मविश्वास दोन्ही वाढेल.
- मुलांनो, नेहमी सकारात्मक विचार करत राहा. सकारात्मक विचारांमुळेच आपण पुढे जाऊ शकतो. स्वत:ची इतरांशी तुलना करू नका. इतरांबाबत असूया बाळगू नका.
- ताणतणाव हा आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. ताण दूर ठेवण्यासाठी बरेच उपाय करता येतील. योगासनं, ध्यान करून तुम्ही ताणाला लांब ठेऊ शकता. ताण कमी झाल्यावर तुम्हाला बरं वाटेल.

मूल्यशिक्षण

जगच त्यांची शाळा

हिमाचल प्रदेशातील एका छोट्याशा गावात नेहमीप्रमाणे शाळेची घंटा वाजत नाही, तरीही तीन मुलांचा दिवस सुरू होतो– कधी गणिताच्या उदाहरणांनी, कधी स्वयंपाकघरातील प्रयोगांनी, तर कधी डोंगर–दऱ्यांत फिरताना. १३ वर्षांची जुळी मुलं आणि आठ वर्षांची त्यांची बहीण अशाच वेगळ्या वातावरणात शिकत आहेत. त्यांचे पालक मयूर आणि जॉय सोनटक्के यांनी पारंपरिक शाळेपेक्षा अनुभवांना अधिक महत्त्व देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांनी उभारलेल्या 'नोमॅडगाव' या समुदायात जगभरातून प्रवासी येतात. त्यामुळे मुलांसाठी जेवणाचं टेबलही कधी वर्ग बनतं, तर अनोळखी व्यक्तीसोबत झालेली गप्पाही एखादा नवा धडा शिकवून जाते. कोविड काळात या कुटुंबाने पारंपरिक शालेय शिक्षणापासून दूर जाण्याचा निर्णय घेतला. जॉय यांनी 'अनस्कूलिंग'ची कल्पना पुढे आणली.

मुलांनी ठराविक वयात ठराविक गोष्ट शिकण्यापेक्षा त्यांना स्वत:ची शिकण्याची पद्धत शोधता यावी, हा त्यामागचा विचार आहे. म्हणूनच या मुलांच्या दिनक्रमात पुस्तकांसोबत प्रत्यक्ष अनुभवांनाही तितकंच स्थान आहे. सकाळी गणित आणि इंग्रजीचा अभ्यास होतो; त्यानंतर वाचन, चित्रकला, बेकिंग, स्वयंपाक, खेळ किंवा बाहेर फिरणं असतं. मुलांना एखाद्या विषयाची आवड निर्माण झाली की, पालक त्यांना त्यासाठी आवश्यक साधनं आणि मार्गदर्शन देतात. जुळ्या मुलांना पाठ्यपुस्तकातून इंग्रजी आणि गणित शिकण्यात रस वाटत नव्हता, तेव्हा पालकांनी पद्धत बदलली. लेखन, गोष्टी, शिक्षक आणि आवडीवर आधारित उपक्रमांचा आधार घेतला. घर बांधताना मुलांनी सुतारकाम अनुभवलं, तर भारत आणि व्हिएतनाममधील प्रवासात शेती, सण आणि वेगवेगळ्या संस्कृती जवळून पाहिल्या. घरातील स्वयंपाकही आता त्यांच्या शिक्षणाचा भाग आहे. जेवण बनवताना त्यांना केवळ पाककलेचे धडे मिळत नाहीत, तर जबाबदारी आणि स्वावलंबनही शिकता येतं. भविष्यात त्यांना नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ओपन स्कूलिंग किंवा केंब्रिज आयजीसीएसईमार्फत दहावीची परीक्षा देण्याचा पर्यायही खुला आहे.



या कुटुंबाच्या प्रयोगात सर्वात वेगळी गोष्ट म्हणजे मुलांना जगाशी जोडून शिकण्याची संधी. 'नोमॅडगाव'मध्ये येणारे उद्योजक, कलाकार, अभियंते आणि प्रवासी मुलांचे मित्र, मार्गदर्शक आणि कधी शिक्षकही बनतात. एका इस्रायली ऑटोमेशन अभियंत्यासोबत राहून मुलांनी तंत्रज्ञानासोबतच वेगळी संस्कृती आणि जीवनपद्धतीही जाणून घेतली. कुटुंबाच्या रेस्टॉरंटमध्ये त्यांना पाहुण्यांशी संवाद, संयम, सहकार्य आणि कामाची जबाबदारी समजते. अर्थात, हा मार्ग सोपा नाही. नातेवाईकांकडून प्रश्न उपस्थित होतात आणि समान पद्धतीने शिकणाऱ्या मुलांचा सहवासही कमी मिळतो. तरीही मयूर आणि जॉय यांना आपल्या मुलांमध्ये जिज्ञासा, आत्मविश्वास आणि स्वावलंबन वाढताना दिसत आहे. त्यांच्या मते, शिक्षण म्हणजे फक्त वर्गात बसून पुस्तकातील धडे गिरवणं नाही; आजूबाजूच्या जगाकडे कुतूहलाने पाहणं, अनुभवातून शिकणं आणि गरज पडेल तेव्हा स्वत: शिकता येणं हीच खरी शिकण्याची तयारी आहे.

दोस्त हे मस्त

विश्व बिबट्यांचं



तुम्ही बिबट्या बघितला असेल. विविध प्राणीसंग्रहालयांमध्ये बिबट्या असतो. जंगलातला बिबट्या मानवी वस्तीत आल्याच्या बातम्याही तुम्ही ऐकल्या असतील. बिबट्या भारतासह चीन आणि आफ्रिकेमध्येही आढळतो. आफ्रिकेत काळ्या रंगाचा बिबट्या आढळतो. त्याला ब्लॅक पँथर असं म्हटलं जातं. बिबट्याला छान पोहता येतं. तो नदी, तलावात अगदी सहज पोहू शकतो. बिबट्या झाडावरही चढू शकतो. बिबट्या १० ते १५ वर्षं जगतो.

खादाडी

झक्कास पॉपकॉर्न बार



तुम्हाला पॉपकॉर्न आवडत असतील. मग याच पॉपकॉर्नला ट्विस्ट देऊन तुम्ही मस्तपैकी पॉपकॉर्न बार बनवू शकता. यासाठी पाच कप पॉपकॉर्न, एक कप साखर, अर्धा कप पीनट बटर आणि अर्धा चमचा व्हॅनिला इसेन्स असं साहित्य लागेल. एक भांडं घ्या. त्यात पाणी आणि साखर घालून पाक तयार करून घ्या. आता गॅस बंद करून भांडं खाली काढून घ्या. त्यात पीनट बटर आणि व्हॅनिला इसेन्स घालून नीट मिसळून घ्या. मग या मिश्रणात पॉपकॉर्न घाला. आता एका ट्रेमध्ये किंवा थाळीत पॉपकॉर्न पसरवून घ्या. थोडं थंड होऊ द्या. मग पॉपकॉर्नचे हे बार कापून घ्या. मस्तपैकी खा. संध्याकाळचा खाऊ म्हणून असे बार बनवायला काहीच हरकत नाही.

स्टडी टिप्स

मेंदूला द्या विश्रांती...



खूप अभ्यास करून तुम्ही दमता. खरं तर आपला मेंदू दमलेला असतो. या मेंदूला थोडा निवांतपणा हवा असतो. मग आपण मोबाईल हातात घेतो. गेम्स खेळतो. सोशल मीडिया बघतो. पण यामुळे मेंदूवरचा ताण जास्त वाढू शकतो. त्यामुळे घरी बसून मोबाईलवर गेम खेळण्यापेक्षा तुम्ही मैदानी खेळ खेळा. गाणी ऐका किंवा आवडीचं पुस्तक वाचा.

योगा टाईम

योगा सुरू करताना...



तुम्हालाही योगा करावासा वाटतो का? लहान मुलांसाठीही खास योगवर्ग असतात. पण योगा करताना काही नियमांचं पालन करावं लागतं. सर्वात महत्त्वाचं म्हणजे जेवल्यानंतर लगेच योगा करू नये. जेवल्यानंतर साधारण तीन तासांनी योगा करता येईल. जेवल्यानंतर आपण फक्त वज्रासनात बसू शकतो. त्यामुळे योगा क्लासला जात असाल तर क्लासच्या वेळेच्या तीन तास आधी जेवा.

श्रीलंकेचा ऐतिहासिक विजय

४३० धावांचं लक्ष्य पार करत रचला इतिहास ; इंग्लंडला श्रीलंकेने दिला धक्का

। लाहोर । वृत्तसंस्था ।

पाकिस्तानमध्ये सध्या सुरु असलेल्या ट्राय सीरीजमधील तिसऱ्या सामन्यात एका नवीन विक्रमाची नोंद झाली आहे. रावळपिंडी स्टेडियमवर श्रीलंका आणि इंग्लंड यांच्यात सामना खेळला गेला. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना, कर्णधार हॅरी ब्रूकच्या २०२ धावांच्या खेळीच्या जोरावर इंग्लंडने ५० षटकांत ४२९ धावा केल्या.



लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेने ४३० धावांचे मोठे लक्ष्य गाठले आणि इंग्लंडचा २ विकेट्सने पराभव केला.पवन रत्नायकेच्या १३० आणि दसुन शनाकाच्या ९७ धावांनी विजयात महत्त्वाची भूमिका बजावली.

नाणेफेक गमावून इंग्लंड प्रथम फलंदाजी करण्यासाठी मैदानात उतरला. इंग्लंडने सुरुवातीपासूनच धावांचा वेग कायम ठेवला. टॉम बँटनने संघाला भक्कम ५० धावांचे योगदान दिले, तर जो रूटने ६९ धावांची भर घालून डावाला आधार दिला. दोन्ही फलंदाज बाद झाल्यानंतर कर्णधार हॅरी ब्रुकने सूत्रे हाती घेतली आणि श्रीलंकेच्या गोलंदाजांविरुद्ध आक्रमकपणे धावा केल्या.ब्रुकने २०२ धावांची शानदार खेळी केली. त्याच्या द्विशतकाच्या जोरावर इंग्लंडने ५० षटकांत ४२९/४ अशी मोठी धावसंख्या उभारली.

४३० धावांचे मोठे लक्ष्य गाठताना, अविष्का फर्नांडोच्या खेळीने श्रीलंकेला दमदार सुरुवात करून दिली. तो शतक पूर्ण करण्यापासून केवळ तीन धावा दूर राहिला आणि ९७ धावांवर बाद झाला. त्यानंतर पवन रत्नायकेने सूत्रे हाती घेतली आणि १३० धावांची शानदार खेळी केली. त्याच्या फलंदाजीमुळे श्रीलंका सामना जिंकण्याच्या आशा जिवंत राहिल्या. रत्नायकेनंतर दासुन शनाकानेही महत्त्वपूर्ण योगदान दिले. शतक हुकल्याने ९७ धावा करून तो पॅव्हेलियनमध्ये परतला. मात्र, त्याच्या बाद होण्याने श्रीलंकेच्या अडचणी वाढल्या. संघाला विजयासाठी वेगाने धावा करणे आवश्यक होते आणि विकेट्स सातत्याने पडत होत्या.

सामन्याच्या अंतिम टप्प्यात जनिथलियानागे श्रीलंकेचा विजयाचा नायक ठरला. त्याने अवघ्या २७ चेंडूंमध्ये नाबाद ६१ धावांची खेळी करून इंग्लंडच्या विजयाच्या आशा धुळीस मिळवल्या. त्याच्या आक्रमक फलंदाजीने सामन्याचे चित्र पालटले. अखेर श्रीलंकेने ४९.५ षटकांत ८ विकेट्स गमावून ४३० धावा करत एक ऐतिहासिक विजय नोंदवला.

अर्शदीप सिंगने पूर्ण केलं शतक



मुंबई : भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिला टी सामना क्राइस्टचर्च येथे खेळला जात आहे. श्रेयस अय्यरने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. अंतिम ११ खेळाडूंची घोषणा होताच, भारतीय संघाचा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंगने आपल्या कारकिर्दीतील सर्वात मोठा टप्पा गाठला आहे. चमकदार कामगिरीसह, आता तो एका विशेष एलिट यादीत सामील झाला आहे. या यादीत विराट आणि सूर्यकुमार यादव यांसारख्या दिग्गजांचा समावेश आहे. अर्शदीप सिंगने भारतीय संघासाठी टी-२० फॉरमॅटमध्ये १०० सामने खेळण्याचा पराक्रम केला आहे. भारतासाठी १०० टी-२० सामने खेळणारा तो सातवा खेळाडू ठरला आहे.

दीपक मोकल यांची मुख्य प्रशिक्षकपदी निवड

। रेवदंडा । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानास्पद बातमी असून, ज्येष्ठ क्रीडाप्रेमी तथा डायरेक्ट हॉलीबॉल फेडरेशन ऑफ इंडियाचे जनरल सेक्रेटरी दीपक गजानन मोकल यांची आगामी आंतरराष्ट्रीय हॉलीबॉल स्पर्धेसाठी भारतीय संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदी सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. ओमान व केनिया येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय हॉलीबॉल स्पर्धांमध्ये भारतीय संघाच्या प्रशिक्षणाची महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या डायरेक्ट हॉलीबॉल फेडरेशन ऑफ इंडियाच्या महत्त्वपूर्ण बैठकीत ही निवड करण्यात आली. या बैठकीला विविध राज्यांतील हॉलीबॉल संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. दिल्ली, हरियाणा, महाराष्ट्र, पंजाब, गुजरात, बिहार आणि गोवा या राज्यांतील पदाधिकाऱ्यांनी श्री. मोकल यांच्या अनुभवावर, क्रीडा क्षेत्रातील योगदानावर आणि नेतृत्वगुणांवर विश्वास व्यक्त करत त्यांच्या निवडीला एकमताने मंजुरी दिली. आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून निवड होणे ही मोकल यांच्या क्रीडा क्षेत्रातील कार्याची महत्त्वपूर्ण पावती मानली जात आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय हॉलीबॉल संघ उत्कृष्ट कामगिरी करेल आणि देशाचा नावलौकिक वाढवेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.



मोकल यांच्या या निवडीमुळे रायगड जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. त्यांच्या यशामुळे जिल्ह्यातील हॉलीबॉल खेळाडू आणि क्रीडाप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

डायरेक्ट हॉलीबॉल फेडरेशन ऑफ इंडियाच्या पदाधिकारी व सदस्यवर्गाने दीपक गजानन मोकल यांचे या गौरवशाली निवडीबद्दल हार्दिक अभिनंदन केले असून, त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

मुलींसाठी क्रिकेट संघ निवड चाचणी शिबीर

। रायगड । प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने २४ व २५ ऑक्टोबर रोजी पेण येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रिकेट मैदानावर पंधरा व एकोणीस वर्षाखालील मुलींसाठी संघ निवड चाचणी शिबिराचे आयोजम करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा क्रिकेट अससोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध रवींद्र पाटील व सचिव प्रदीप नाईक यांनी दिली. पंधरा वर्षाखालील मुलींसाठी वयाची अट आहे १ सप्टेंबर २०१२ नंतर जन्मलेल्या मुली व एकोणीस वर्षाखालील मुलींसाठी वयाची अट हि १ सप्टेंबर २००८ नंतर जन्म झालेल्या मुलींसाठी असणार आहे.निवड चाचणी शिबिरासाठी येणाऱ्या सर्व इच्छुक मुलींनी क्रिकेटच्या पांढऱ्या गणवेशत व वयाचा योग्य पुरावा म्हणून आपले आधार कार्ड व जन्माचा दाखला घेऊन उपस्तित राहण्याची सूचना रायगड जिल्हा क्रिकेट अससोसिएशनच्या वतीने करण्यात आली आहे.

निवडक

स्वरा बामगुडेची संघात निवड

माणगाव : रायगड जिल्ह्यातील माणगावच्या क्रीडाविश्वासाठी अभिमानास्पद आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. माणगावची उदयोन्मुख महिला क्रिकेटपटू स्वरा बामगुडे हिची डी. वाय. पाटील महिला क्रिकेट संघात निवड झाली आहे. जिद्द, कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण सराव आणि क्रिकेटवरील अपार प्रेम यांच्या जोरावर स्वराने आपल्या कारकिर्दीत महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. तिच्या या यशामुळे माणगावसह संपूर्ण रायगड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. रायगड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करताना मिळालेल्या अनुभवाचा उपयोग करून स्वराने आपल्या खेळात सुधारणा करण्यावर भर दिला. प्रत्येक सामन्यातून नवे शिकत, सरावातून स्वतःला घडवत आणि मोठ्या संधींचे स्वप्न उराशी बाळगत तिने आपली वाटचाल सुरू ठेवली. डी. वाय. पाटील महिला क्रिकेट संघातील निवड ही तिच्या आजवरच्या प्रयत्नांना मिळालेली महत्त्वपूर्ण पावती मानली जात आहे. आता देशांतर्गत क्रिकेट स्पर्धांमध्ये आपले कौशल्य सिद्ध करण्यासाठी स्वरा सज्ज होत आहे. भविष्यात भारतीय क्रिकेटमध्ये ठसा उमटवून आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे प्रतिनिधित्व करण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी ती प्रयत्नशील आहे.





पुणे क्रिकेट क्लब ठरला डीएसपी विजेता

पुणे : डीएसपी स्पोर्ट्स अँड इव्हेंटस यांच्या वतीने आयोजित पहिल्या डीएसपी करंडक १४ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत अंतिम फेरीत सार्थक पाटील याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर पुणे क्रिकेट क्लब संघाने सार्क क्रिकेट अकादमी संघाचा ४ गडी राखून पराभव करत विजेतेपद संपादन केले. अंतिम सामन्यात पुणे क्रिकेट क्लबच्या सार्थक पाटील, सचिन चव्हाण, मितांशू मंडल, पार्थ हेगिष्टे, हर्ष पाष्टे यांच्या सुरेख गोलंदाजीपुढे प्रथम फलंदाजी करताना सार्क क्रिकेट अकादमीचा डाव ४५.४ षटकात सर्वबाद १८१ धावावर संपुष्टात आला. यात साईराज निश्चित ६३, अवधूत कानडे २२, विश्वजीत शिंदे १९, ओम पवार १४ यांनी धावा केल्या. हे आव्हान पुणे क्रिकेट क्लब संघाने ३८.१ षटकात ६ बाद १८२ धावा करून पूर्ण केले. यात राजवीर राऊत ३२, रोनक गोयल नाबाद ३२, अमरेंद्र यादव २८, सार्थक पाटील २२, सचिन चव्हाण २१ यांनी छोटी पण महत्वपूर्ण खेळी करत संघाला विजय मिळवून दिला.



ऑलिम्पिकवीर खाशाबा पुस्तक भेट

कोल्हापूर : लोकनेते सदाशिवराव मंडलिक राष्ट्रीय कुस्ती संकुलातील मल्लांना खाशाबा जाधव चरित्र पुस्तक भेट देण्यात आली. कुस्तीत अजूनही खाशाबानंतर महाराष्ट्रात ऑलिम्पिक पदक आले नाही, आता खाशाबांचे वारसदार मुरगुडमधून चमकतील असे प्रतिपादन लेखक संजय दुधाणे आज मुरगुडमधील कार्यक्रमात केले. मुरगुडमधील कार्यक्रमात जागतिक रौप्यपदक विजेती अमृता पुजारी हिच्यासह तालमीतील सात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कुस्तीगीरांचा संजय दुधाणे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपनगराध्यक्षा रेखा मांगले, नामदेवराव मेंडके, जयसिंगराव भोसले, माजी नगरसेवक राहूल शिंदे, दिपक शिंदे,राजेंद्र कांबळे, दत्तात्रय मंडलिक, महादेव कानकेकर, प्रकाश तिराळे,दयानंद खतकर, राजेंद्र मकोटे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला खाशाबांनी जिंकलेल्या पदकाच्या कामगिरीला संजय दुधाणे यांनी उजाळा देत पदक विजेत्या महिला कुस्तीगीर अमृता पुजारी, नंदीनी साळुंखे, स्वाती शिंदे, तन्वी मगदूम, यांच्याशी संवाद साधला. यशस्वितेसाठी शारीरिक बरोबरीने मानसिक सकारात्मकता ही तितकीच गरजेची असते. या पैलु प्रत्येक खेळाडूनी नेहमीच लक्ष्यात ठेवावा, असा आग्रही सल्ला दुधाणे यांनी यावेळी दिला. खेळाडूच नव्हे तर जीवन संघर्ष करणाऱ्या प्रत्येकांना ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांचे चरित्र नेहमी प्रेरणादायी ठरेल असे मनोगत कुस्ती प्रशिक्षक दादासो लवटे यांनी व्यक्त केले.



क्रीडा स्पर्धांचे पारितोषिक वितरण

म्हसळा : तालुकास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.आयोजित स्पर्धांमध्ये विविध क्रीडा प्रकारांत यश संपादन करणाऱ्या सुमारे ४०० विजेत्या खेळाडूंना पदके देऊन गौरविण्यात आले तर सांघिक प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या विजेत्या संघांना ट्रॉफी प्रदान करण्यात आल्या. गटशिक्षणाधिकारी हर्षदा भगत यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमाला विस्तार अधिकारी धर्मा धामणकर,अंजुमन कॉलेजचे प्राचार्य अ.रहमान घराडे,तालुका क्रीडा संघटनेचे अध्यक्ष देवराम डावखर,सचिव प्रफुल्ल पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.स्पर्धा समन्वयक रईस शेख यांच्या नेतृत्वाखाली क्रीडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. यावेळी गटशिक्षणाधिकारी हर्षदा भगत यांनी सर्व विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले. खेळाडूंनी जिल्हास्तरीय स्पर्धांमध्येही उत्तम कामगिरी करून तालुक्याचा नावलौकिक वाढवावा अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या.शालेय जीवनात खेळाला महत्त्व असून क्रीडास्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त,संघभावना, आत्मविश्वास आणि खिलाडूवृत्ती विकसित होते हा संदेश या उपक्रमातून अधोरेखित झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक झाकीर हलसंगी यांनी केले तर सूत्रसंचालन प्रफुल्ल पाटील यांनी केले.

लोणेरे येथे तंत्रशास्त्र विद्यापीठात अंतर विभागीय तिरंदाजी स्पर्धा



। माणगाव । प्रतिनिधी ।

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे येथे अंतरविभागीय तिरंदाजी स्पर्धेचे आयोजन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत आणि प्रतिकुलगुरू डॉ. मोहितकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. सचिन पोरे यांच्या हस्ते करण्यात आले.

या स्पर्धेमध्ये विद्यापीठाशी सलग्निक असलेले महाविद्यालयातील खेळाडूंनी सहभाग घेतला. या स्पर्धेसाठी राष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक बाळू ढेबे हे पंच म्हणून उपस्थित होते.

या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा विभागाचे मुख्य समन्वयक डॉ. शिवाजी कराड, क्रीडा समन्वयक प्रा. बालाजी पुलचवाड, प्रा. सिद्धेश जाधव, सहसमन्वयक अविनाश उतेकर, एस. डी. पाटील, प्रशांत ढेपे, अनिल गोरेगावकर, क्रीडा निर्देशक निलेश भोईर, संतोष सावंत, शांतनू भोनकर आणि इतर संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली. या स्पर्धेमध्ये विद्यापीठाशी सलग्निक असलेले महाविद्यालयातील खेळाडूंनी सहभाग घेतला. या स्पर्धेसाठी राष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक श्री बाळू ढेबे हे पंच म्हणून उपस्थित होते.

या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा विभागाचे मुख्य समन्वयक डॉ. शिवाजी कराड, क्रीडा समन्वयक प्रा. बालाजी पुलचवाड, प्रा. सिद्धेश जाधव, सहसमन्वयक अविनाश उतेकर, एस. डी. पाटील, प्रशांत ढेपे, अनिल गोरेगावकर, क्रीडा निर्देशक निलेश भोईर, संतोष सावंत, शांतनू भोनकर आणि इतर संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

क्रीडा स्पर्धेसाठी निवड चाचणी

कल्याण : महावितरणच्या वतीने पुढील महिन्यात कोल्हापूर येथे आयोजित राज्यस्तरीय अंतर परिमंडलीय क्रीडा स्पर्धेसाठी कल्याण आणि कोकण परिमंडळाचा संघ निवड करण्यासाठी २५ ऑक्टोबर रोजी कल्याण येथे निवड चाचणी आयोजित करण्यात आली आहे.सदर निवड चाचणी कल्याण येथील बी.के.बिर्ला म हाविद्यालयाच्या प्रांगणात सकाळी ७.३० पासून तर क्रिकेट स्पर्धा आधारवाडी येथील संतोष क्रिकेट अकादमीत सकाळी ९.३० वाजता आयोजित करण्यात आली आहे.

राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत मुंबई विभागाची चमक

। खांदा । वार्ताहर ।

अहिल्यानगर येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत मुंबई विभागातील पोलीस मुख्यालय कुस्ती संकुलाच्या मल्लांनी उल्लेखनीय कामगिरी केली. या स्पर्धेत वेदांत संपत्ती येळकर याने सुवर्णपदक, तर साहिल राहुल घुगे आणि अनिरुद्ध धनाजी बंडगर यांनी रौप्यपदक पटकावले. याशिवाय चार खेळाडूंनी चौथा क्रमांक मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली. या सातही खेळाडूंची दिल्ली येथे होणाऱ्या राष्ट्रीय अजिंक्यपद कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद, अहिल्यानगर आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्या वतीने राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. नेवासा येथील श्री. दा. ह. घाडगेपाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ही स्पर्धा पार पडली. राज्यभरातून ४०० खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता.मुंबई विभागातून १४ वर्षांखालील मुले फ्रीस्टाइल तसेच १९ वर्षांखालील मुलांच्या फ्रीस्टाइल आणि ग्रीकोरोमन कुस्ती प्रकारांत पोलीस मुख्यालय कुस्ती संकुलाच्या सात मल्लांनी सहभाग घेतला. त्यापैकी तीन खेळाडूंनी पदकांची कमाई केली.

रायगड जिल्हास्तरीय व्हॉलिबॉल क्रीडा स्पर्धा
पीएनपीच्या विद्यार्थ्यांची निवड

। अलिबाग । प्रतिनिधी ।

जिल्हा क्रीडा अधिकारी अलिबाग रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग तालुकास्तरीय शालेय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धा पीएनपी होली चाईल्ड स्कूल वेश्वी अलिबाग शाळेतील विद्यार्थ्यांचे घवघवीत यश संपादन केले.

१४ वर्षा खालील मुली प्रथम क्रमांक, १४ वर्षा खालील मुले, द्वितीय क्रमांक, १७ वर्षा खालील मुली द्वितीय क्रमांक पटकावला, या सर्व विद्यार्थांची रायगड जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत निवड झाली आहे.

या नेत्रदीपक यशाबद्दल पीएनपी संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, होली चाईल्ड एस. एस. सी. बोर्डच्या मुख्याध्यापिका निसर्गा चेवले व उपमुख्याध्यापिका शर्मिला शेटे, क्रीडा मार्गदर्शक अक्षय डाकी व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



राज्य टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धा | अंडर-१७, अंडर-१९ गटांत विजेतेपद

विवान दवेची दुहेरी सुवर्णभरारी

। गांधीधाम । वृत्तसंस्था ।

अवघ्या १४ वर्षांच्या विवान दवेने गुजरात राज्य टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत दुहेरी सुवर्णपदक पटकावत आपली चमक दाखवली. गांधीधाम येथे १६ ते २० ऑक्टोबरदरम्यान झालेल्या या स्पर्धेत विवानने १७ वर्षांखालील आणि १९ वर्षांखालील अशा दोन्ही गटांत सुवर्णपदक जिंकले. आपल्यापेक्षा वयाने मोठ्या आणि अनुभवी प्रतिस्पर्ध्यांना नमवत त्याने ही उल्लेखनीय कामगिरी केली.

विवान दवे हा अदाणी स्पोर्ट्सलाइनच्या गर्व है या क्रीडा उपक्रमाशी संबंधित खेळाडू आहे. यापूर्वी तो १५ वर्षांखालील गटात भारतात दुसऱ्या क्रमांकावर होता. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील सातत्यपूर्ण कामगिरीच्या जोरावर तो आपला खेळ अधिक उंचावत आहे.



यंदाच्या वर्षाच्या सुरुवातीला कानपूर येथे झालेल्या यूटीटी राष्ट्रीय क्रमवारी टेबल टेनिस स्पर्धेत विवानने १७ वर्षांखालील गटात सुवर्णपदक पटकावले होते. आंतरराष्ट्रीय स्तरावरही त्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. उलानबटार येथे झालेल्या डब्ल्यूटीटी यूथ कंटेंडर स्पर्धेत त्याने १५ वर्षांखालील गटात रौप्यपदक, तर ताश्कंद येथील स्पर्धेत याच गटात कांस्यपदक जिंकले होते.

विवानने वयाच्या पाचव्या वर्षी टेबल टेनिस खेळण्यास सुरुवात केली. भविष्यात ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करून देशासाठी सुवर्णपदक जिंकण्याचे त्याचे स्वप्न आहे. अदाणी स्पोर्ट्सलाइनच्या गर्व है उपक्रमांतर्गत त्याला टेबल टेनिसचे साहित्य, क्रीडा उपकरणे आणि स्पर्धांसाठी प्रवासाची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. या मदतीमुळे त्याला सराव आणि कामगिरीवर लक्ष केंद्रित करता येते. विवान १ ऑगस्ट २०२६ पासून या उपक्रमाशी जोडला गेला आहे.

वैयक्तिक व सांघित गटात जेतेपद

२०२५ मध्ये झालेल्या ८७ व्या यूटीटी आंतरराज्य सब-ज्युनिअर आणि कॅडेट राष्ट्रीय टेबल टेनिस अजिंक्यपद स्पर्धेतही विवानने दुहेरी सुवर्णपदकाची कामगिरी केली होती. त्या वेळी त्याने १५ वर्षांखालील वैयक्तिक आणि सांघिक गटांत विजेतेपद मिळवले होते.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)